सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. ०२ एप्रिल २०२६ | वर्ष - ३ रे | अंक ३५३ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### अक्षय कर्डिलेंना उमेदवारी

अहिल्यानगर : भाजप आमदार शिवाजी कर्डिले यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या राहुरी विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. यासाठी भारतीय जनता पक्षाकडून शिवाजी कर्डिलेंचे सुपुत्र अक्षय कर्डिले यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. त्यांच्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस : शरदचंद्र पवार पक्षाचे नेते प्राजक्त तनपुरे शड्डू ठोकण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### एटीएम साठीही शुल्क

मुंबई: १ एप्रिल रोजी, तीन प्रमुख बँकांनी सर्वसामान्यांच्या खिशाला मोठा फटका दिला. आजपासून एटीएम वापरकर्त्यांसाठी महत्त्वपूर्ण बदल लागू केले जात आहेत. नियोजनाशिवाय वारंवार पैसे काढल्यास २३ पर्यंत अतिरिक्त शुल्क लागू शकते. बँकांनी लागू केलेल्या नियमांमध्ये मोफत व्यवहार मर्यादा, शुल्क आणि पैसे काढण्याच्या मर्यादा यांचा समावेश आहे. आता यूपीआय वापरून एटीएममधून पैसे काढल्यास त्याची गणना देखील मोफत व्यवहार मर्यादेत केली जाईल.

### रेल्वे स्थानकावर वाद

मुंबई: मुंबई लोकलच्या मुलुंड रेल्वे स्थानकावर दोन शाळकरी मुलांचा वाद थेट रेल्वेच्या रुळांवर पोहोचला असल्याची धक्कादायक घटना घडली आहे. एका मुलीवरून सुरू झालेला या वादाचं रूपांतर हाणामारीत झालं असल्याची माहिती एक्स पोस्टमधून दिली गेली आहे. समोरून ट्रेन येत असतानाच ही दोन शाळकरी मुलं रुळांवर उतरून हाणामारी करायला लागल्यामुळे स्थानकावर भीतीचं वातावरण पसरलं होतं.

### आजपासून टोल वाढला

पुणे: भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (एनएचएआय) एक एप्रिलपासून टोल दरांत तीन टक्के वाढ जाहीर केली आहे. नव्या दरांची अंमलबजावणी एक एप्रिलपासून होणार आहे; तसेच राष्ट्रीय महामार्गावरील टोल वसुली पूर्णपणे कॅशलेस पद्धतीने करण्यात येणार आहे. पुणे-कोल्हापूर, पुणे-सोलापूर आणि पुणे-नाशिक महामार्गावरील टोलनाक्यांवर हे वाढीव दर लागू होतील. त्यामुळे या महामार्गांवरील प्रवास महागणार आहे.

### तरुणाचा निर्घृण खून

दौंड : दौंड तालुक्यातील राजेगाव येथे जुन्या जमिनीच्या वादातून धक्कादायक घटना घडली आहे. टोळक्याने धारदार शस्त्रांनी वार करत एका तरुणाचा निर्घृण खून केल्याची उघडकीस आली आहे. या प्रकरणी सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राजेगाव इथं राहणाऱ्या विजेंद्र भोसले या तरुणाचा काही व्यक्तींशी जमिनीच्या व्यवहारावरून जुना वाद सुरू होता. हा वाद चिघळत गेला आणि त्यानंतर आरोपींनी विजेंद्र भोसले यांच्यावर हल्ला चढवला.

### पती - पत्नीची आत्महत्या

**बंगळुरु :** ३२ वर्षीय आयटी अभियंता भानू चंदर रेड्डी याने राहत्या अपार्टमेंटमध्ये आयुष्य संपवल्यानंतर अवघ्या काही मिनिटांतच, त्याच निवासी संकुलाच्या १८ व्या मजल्यावरुन उडी घेत त्याची ३१ वर्षीय पत्नी बिबी शाझिया सिराज हिनेही जीवनयात्रा संपवली. कर्नाटकातील उत्तर बंगळुरुच्या कोथनूर भागात ही हादरवणारी घटना घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका आयटी कंपनीत कार्यरत असलेली बिबी शाझिया सिराज त्याच दिवशी सकाळी हैदराबादहून परतली होती. पती बेडरुमचा दरवाजा उघडत नसल्याने आणि वारंवार फोन करुनही प्रतिसाद देत नसल्याने सकाळी साधारण ७.३० वाजता तिने इमारतीच्या सुरक्षा रक्षकांना घरात बोलावलं. दरवाजा तोडून सर्वांनी आत प्रवेश केला असता, त्यांना भानू चंदर रेड्डी हा छताच्या पंख्याला लटकलेल्या अवस्थेत आढळला. खोलीत एक चिठ्ठीही सापडली. पती गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळल्यानंतर अवघ्या वीस मिनिटांतच, शाझियाने त्यांच्या अपार्टमेंटच्या १८ व्या मजल्यावरून उडी मारली.

# आयटी क्षेत्राचा 'ब्लॅक वेन्सडे'

## तब्बल ३० हजार कर्मचाऱ्यांना एका झटक्यात कंपनीकडून मिळालं नारळ!

### सुमारे १२ हजार भारतीय कर्मचाऱ्यांची नोकरी गेली

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०१ एप्रिल :** सकाळची शिफ्ट सुरू होण्याआधीच आलेल्या एका ई-मेलने आयटी क्षेत्रात खळबळ उडवली. काहींची शिफ्ट सुरू झाली होती, तर काही कामावर जाण्याच्या तयारीत होते आणि तेवढ्यातच इनबॉक्समध्ये आलेल्या ई मेलने हजारो कर्मचाऱ्यांच्या पायाखालची जमीनच सरकली.

सुरुवातीला अनेकांना हा एप्रिल फूलचा विनोद वाटला. पण काही मिनिटांत फोन, मेसेजेस सुरू झाले आणि वास्तव समोर आलं. हा खरोखरच layoff चा मेल होता. जागतिक आयटी कंपनी ओरॅकल कॉर्पोरेशन (Oracle Corporation) ने एकाच झटक्यात जगभरातील तब्बल ३० हजार कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केलं. कंपनीच्या एकूण स्टाफपैकी सुमारे १८% कपात करण्यात आली आहे.




यातील सर्वाधिक फटका भारताला बसला असून, सुमारे १२ हजार भारतीय कर्मचाऱ्यांची नोकरी गेली आहे. त्यामुळे आयटी क्षेत्रासाठी आजची सकाळ 'ब्लॅक वेन्सडे' ठरली आहे.

कर्मचाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, पहाटे ५ ते ६ च्या दरम्यान कंपनीकडून मेल आला. त्या मेलमध्ये थेट सांगण्यात आलं की तुमची भूमिका आता 'शिर्वीप-वरपीं (अनावश्यक) झाली आहे. धक्कादायक बाब म्हणजे, काही कर्मचाऱ्यांनी १५-२० वर्षे कंपनीत काम केलं होतं, तरीही कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांना नोकरीवरून काढून टाकण्यात आलं आहे. मेल वाचताच अनेकांचे लॅपटॉप आणि सिस्टम ॲक्सेस देखील तात्काळ बंद करण्यात आले.

भारतामध्ये ओरॅकल कॉर्पोरेशन या कंपनीचे जवळपास ३० हजार कर्मचारी होते, त्यापैकी ४०% म्हणजेच १२ हजार लोकांना बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला. सोशल प्लॅटफॉर्म्सवर कर्मचाऱ्यांनी सांगितलं की; काही टीम्समध्ये ५०% पेक्षा जास्त कपात करण्यात आली, तर एका मॅनेजरच्या २० जणांच्या टीमपैकी ६ जणांना एकाच वेळी मेल आला.

याआधी Amazon सारख्या कंपन्यांनीही अशाच प्रकारचे कर्मचारी कपात केली होती. या सगळ्या प्रकारामुळे आयटी क्षेत्रात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. नवीन नोकऱ्या कमी मिळत असताना, आधीच कामावर असलेल्यांनाही अचानक बाहेर पडावं लागत असल्याने कर्मचारी चिंतेत आहेत. एकंदरीत, AI चा वाढता वापर आणि कंपन्यांचे बदलते धोरण यामुळे आयटी क्षेत्रात मोठे बदल होण्याची चिन्हं दिसत आहेत.

## लाडक्या बहिणींना दिलासा!

### ३० एप्रिलपर्यंत करु शकतात eKYC, आदिती तटकरेंची माहिती

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०१ एप्रिल :** लाडकी बहीण योजनेसाठी ई-केवायसी करण्याची शेवटची मुदत ३१ मार्च २०२६ रोजी म्हणजे काल संपली होती. पण आता लाडक्या बहिणींसाठी पुन्हा एकदा एक मोठी बातमी आहे. लाडक्या बहिणींना आता आपली ई-केवायसी करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. आता ई-केवायसीची शेवटची मुदत ३० एप्रिल २०२६ आहे. त्यामुळे लाडक्या बहिणींना दिलासा मिळाला आहे. राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांनी याबाबत माहिती दिली आहे.



**काय आहे लाडकी बहीण योजना?**

विधानसभा निवडणुकीआधी सरकारकडून जाहीर करण्यात आलेल्या लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून गरजू महिलांच्या बँक खात्यावर प्रत्येक महिन्याला १५०० रुपये निधी जमा करण्यात येतो. या लोकप्रिय योजनेचा फायदा महायुती सरकारला चांगल्या पद्धतीने झाला, जे आता आपल्यासमोर आहे. मात्र, या योजनेत बोगस लाभार्थीसुद्धा याचा फायदा घेत असल्याचं सरकारच्या निदर्शनास आलं. फक्त आणि फक्त अडीच लाखांचे उत्पन्न असणाऱ्यांसाठीच असलेल्या या योजनेत भल्याभल्या सरकारी महिला कर्मचाऱ्यांनी देखील लाभ घेतल्याचं समोर आलं. या चुकीच्या प्रकारांवर अंकुश लावण्यासाठी ई-केवायसीची संकल्पना अंमलात आणली गेली, आणि बोगस लाभार्थ्यांना या योजनेतून गेट-आऊट करण्याची योजना आखली.

**ई-केवायसीची मुदत वाढवली**

त्यानुसार ई-केवायसीसाठी ३१ डिसेंबर २०२५ची शेवटची मुदत देण्यात आली. मात्र, त्यादरम्यान देखील महिलांना अनेक अडचणींना सामोरं जावं लागलं. नेमकं त्याचवेळी या संकेतस्थळात तांत्रिक अडचणी येऊ लागल्या आणि बऱ्याच महिलांच्या ई-केवायसी करण्यापासून वंचित राहिल्या. तरीही १ कोटी ७० लाख महिलांना ई-केवायसी करण्यात यश आलं. मोठी बाब म्हणजे, अनेक महिलांनी कुटुंबातील व्यक्ती सरकारी नोकरीत आहे किंवा नाही यासाठी देण्यात आलेल्या पर्यायांतून चुकीचा पर्याय निवडल्याने अनेक महिलांचा १५०० रुपयांचा हफ्ता आपोआप बंद झाला. दरम्यान, अशा महिलांच्या तक्रारीनंतर किंवा ज्यांची ई-केवायसी राहिलीय, अशा महिलांसाठी पुन्हा ३१ मार्च २०२६ची मुदत देण्यात आली, ती मुदत देखील काल मंगळवारी संपली. मात्र, त्याचदरम्यान, आता पुन्हा ही मुदतवाढ करुन ३० एप्रिल २०२६ करण्यात आली आहे.

## एप्रिलच्या पहिला आठवड्यात १७ राज्यांमध्ये मेघगर्जना होणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशाच्या अनेक भागांमध्ये वातावरणात बदल होत आहेत. यामुळे या आठवड्यात वायव्य भारतात पाऊस सुरू राहण्याची शक्यता आहे. देशाच्या मध्य भागात ६ एप्रिलपर्यंत मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची शक्यता असून, २ एप्रिलपर्यंत गारपिटीचीही शक्यता आहे.

**या भागात पावसाची शक्यता**

हवामान विभागाच्या अंदाजानुसार,पूर्व राजस्थानमध्ये मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह (ताशी ३०-५० किमी वेगापर्यंत) हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरामध्येही पाऊस आणि सोसाट्याचा वारा वाहू शकतो. याव्यतिरिक्त, विदर्भ, झारखंड, छत्तीसगड आणि ओडिशा येथे हवामानात बदल होईल. वाऱ्याचा वेग ताशी ४०-५० किमी असू शकतो आणि पाऊसही पडू शकतो. गारपिटीचीही शक्यता आहे. याव्यतिरिक्त, २ आणि ३ एप्रिल रोजी गुजरात आणि महाराष्ट्रात हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. यासोबतच, ३०-६० किमी वेगाने वारे वाहू शकतात. महाराष्ट्रात विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे. ३ आणि ४ एप्रिल रोजी उत्तराखंड, जम्मू-काश्मीर-लडाख-गिलगिट-बाल्टिस्तान-मुझफ्फराबाद आणि हिमाचल प्रदेशमध्ये पाऊस व हिमवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. तसेच, ३ एप्रिल रोजी जम्मू आणि काश्मीरमधील काही ठिकाणी तर ३ व ४ एप्रिल रोजी हिमाचल प्रदेशमध्ये गारपिटीची शक्यता आहे.



३ आणि ४ एप्रिल रोजी पंजाब, हरियाणा, चंदीगड, दिल्ली व पश्चिम उत्तर प्रदेशमध्ये पाऊस आणि मेघगर्जनेसह पावसाचा इशारा देण्यात आला आहे. सोसाट्याचा वारा वाहण्याचीही शक्यता आहे. केरळ, कर्नाटक आणि तेलंगणामध्ये ३ आणि ४ एप्रिल रोजी हलका ते मध्यम पाऊस पडू शकतो, तसेच वाऱ्याचा वेग ताशी ३०-५० किमी पर्यंत पोहोचू शकतो. उत्तर प्रदेशातील अनेक जिल्ह्यांमध्ये मंगळवारी पाऊस झाला. या पावसामुळे कानपूरसह अनेक जिल्ह्यांमध्ये तापमान कमी झाले असून, उकाड्यापासून दिलासा मिळाला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, बुधवारी अनेक राज्यांमध्ये ढगाळ वातावरण राहील आणि आठवड्याच्या अखेरीस पावसाच्या दुसऱ्या फेरीची शक्यता आहे.

### भारताला दिलासा, एलपीजी टँकरने चतुराईने पार केली होर्मुझची सामुद्रधुनी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** इराणवर अमेरिका आणि इस्रायलने केलेल्या हल्ल्याला एक महिना उलटूनही, युद्ध शमण्याची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत. या संघर्षामुळे जगभरात खळबळ उडाली आहे. या संघर्षामुळे बहुतेक जहाजे होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये अडकली आहेत, परंतु भारताला काहीसा दिलासा मिळाला आहे. भारतीय ध्वज असलेल्या एलपीजीने भरलेल्या एका जहाजाने होर्मुझची सामुद्रधुनी सुरक्षितपणे पार केली आहे. 'पाईन गॅस' नावाचे हे भारतीय ध्वज असलेले एलपीजी टँकर जहाज, युद्ध सुरू होण्याच्या एक दिवस आधी, २८ फेब्रुवारी रोजी संयुक्त अरब अमिरातीच्या (ण-ए) रुवैस बंदरातून येणार होते आणि एका आठवड्याच्या आत भारतात पोहोचण्याची अपेक्षा होती. मात्र, होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाण्यासाठी केवळ काही निवडक जहाजांनाच परवानगी देण्यात आली आहे, त्यामुळेच या एलपीजीने भरलेल्या जहाजाला ही सामुद्रधुनी सुरक्षितपणे पार करण्यासाठी जवळपास तीन आठवड्यांचा कालावधी लागला. जे जहाज भारतात एका आठवड्यात पोहोचायचे, ते आता तीन आठवड्यांत पोहोचले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गॅस चीफ ऑफिसर सोहन लाल यांनी युद्धाच्या भीषण दृश्यांचे वर्णन केले आहे. भारतीय एलपीजी जहाजावरील २७ कर्मचारी तीन आठवडे भीतीच्या छायेत राहिले. होर्मुझमध्ये अडकलेले असताना, त्यांना दररोज आपल्या डोक्यावरून क्षेपणास्त्रे आणि ड्रोन उडताना दिसत होते.

## द्रुतगती मार्गामुळे प्रवासाचा वेळ कमी होईल : गडकरी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान मोदींनी नुकतंच अहमदाबाद-धोलेरा ग्रीनफिल्ड द्रुतगती मार्गाचे उद्घाटन केले. आज, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी एक्सवर या द्रुतगती मार्गाच्या वैशिष्ट्यांविषयी माहिती देताना म्हटले आहे की, यामुळे प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल.

काय म्हणाले नितीन गडकरी?

मंत्री नितीन गडकरी यांनी एक्सवर पोस्ट करत म्हटले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरातमध्ये १०९ किमी लांबीच्या, चार पदरी अहमदाबाद-धोलेरा ग्रीनफिल्ड द्रुतगती मार्गाचे (NE-08) उद्घाटन केले. अहमदाबाद आणि उदयोन्मुख धोलेरा प्रदेशादरम्यान अखंड संपर्क अधिक मजबूत करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या द्रुतगती मार्गामुळे प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होतो आणि धोलेरा विशेष गुंतवणूक क्षेत्र (उ्डखठ) तसेच



आगामी धोलेरा आंतरराष्ट्रीय विमानतळावर पोहोचणे सुलभ होते.

गडकरी म्हणाले, सध्याच्या शहरी मार्गांवरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी हा द्रुतगती मार्ग तयार करण्यात आला आहे. या द्रुतगती मार्गामुळे वाहतूक सुरळीत होईल आणि वाहनांमुळे होणारे प्रदूषण कमी होण्यास मदत होईल. गुंतवणूक आकर्षित करून आणि रोजगाराच्या संधी निर्माण करून आर्थिक विकासाला गती देण्यासाठी हा मार्ग सज्ज आहे.

याव्यतिरिक्त, हा मार्ग मालवाहतूक आणि व्यापाराला गती देईल, लोथलसारख्या प्रमुख ठिकाणांना उत्तम कनेक्टिव्हिटी प्रदान करेल आणि संपूर्ण गुजरातमध्ये औद्योगिक, प्रादेशिक आणि पर्यटन विकासाला चालना देईल.

नितीन गडकरी म्हणाले की, पंतप्रधानांनी गुजरातमध्ये १०९ किलोमीटर लांबीच्या, चार पदरी अहमदाबाद-धोलेरा ग्रीनफिल्ड द्रुतगती मार्गाचे (एनई-०८) उद्घाटन केले. हा मार्ग चार टप्प्यांमध्ये विकसित करण्यात आला आहे. टप्पा १ - २२ किमी लांबीचा सरदार पटेल रिंग रोड - सिंधरेज गाव विभाग टप्पा २ - २६.५ किमी लांबीचा सिंधरेज गाव - वेजल्का गाव विभाग टप्पा ३ - २२.५ किमी लांबीचा वेजल्का गाव - डीएसआयआर झोन (अहमदाबाद जिल्हा) विभाग टप्पा ४ - ३८ किमी लांबीचा डीएसआयआर झोन (अहमदाबाद जिल्हा) - अढेलई गाव (भावनगर जिल्हा) विभाग

## गडचिरोलीत ९ जहाल माओवाद्यांचे आत्मसमर्पण; शस्त्रसाठा जप्त

### छत्तीसगडच्या सुकमा २ मुली नक्षलवादी आल्या शरण

**तभा वृत्तसेवा**

**गडचिरोली, दि. ०१ एप्रिल :** गडचिरोली पोलीस दल आणि उठझऋच्या संयुक्त मोहिमेला मोठे यश मिळाले आहे. मंगळवार ३१ मार्च रोजी ९ जहाल माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. यामध्ये ३ वरिष्ठ एसीएम (-उच्) स्तरावरील माओवाद्यांचा समावेश असून, या सर्वांवर मिळून ३० लाख रुपयांचे बक्षीस जाहीर होते.

या कारवाईत विशेष बाब म्हणजे दोन महिला माओवाद्यांनी अत्याधुनिक शस्त्रांसह शरणागती पत्करली. शांती वंजा वड्डे हिने एके-४७ रायफल आणि ३० जिवंत काडतुसांसह आत्मसमर्पण केले, तर सुक्की बामी कुंजाम हिने कार्बाईन रायफलसह हिंसेचा मार्ग सोडला.

आत्मसमर्पणानंतर मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेजवळील कुमनार व गुंडापुरी जंगल परिसरात पोलिसांनी मोठी कारवाई करत शस्त्रसाठा जप्त केला. यात एसएलआर रायफल, वॉकीटॉकी, डेटोनेटर आणि पेनड्राइव्ह यांचा समावेश आहे. गडचिरोली प्रमाणे छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात नक्षलविरोधी अभियानांतर्गत जानिला उर्फ मडकम हिंडमे (३०) आणि सोनी उर्फ मडवी कोसी (२४) या दोन महिला नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली आहे, ज्यांच्यावर प्रत्येकी ८ लाख रुपयांचे बक्षीस होते. हे आत्मसमर्पण 'नक्षलमुक्त बस्तर' मोहिमेचा भाग असून यामुळे स्थानिक नक्षल चळवळीला मोठा धक्का बसला आहे.

## भोंदू खरातला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

**तभा वृत्तसेवा**

**नाशिक, दि. ०१ एप्रिल :** नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात याच्या पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर आज म्हणजेच बुधवार १ एप्रिल रोजी त्याला न्यायालयात हजर करण्यात आले होते. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर खरातला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. अशोक खरातला पहिल्या गुन्ह्यात न्यायलयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

सध्या एसआयटीकडून अशोक खरातची चौकशी सुरु आहे. या चौकशीत अनेक धक्कादायक माहिती समोर आली. अशोक खरातविरोधात नवनव्या तक्रारी दाखल होत आहेत. अशोक खरातने केलेलं लैंगिक शोषण, अनेकांना घातलेला आर्थिक गंडा आणि इतर अनेक कारनाम्यांची जंत्री वाढतच चालली आहे. त्यामुळे अशोक खरातची कोठडी वाढवण्याची मागणी एसआयटीकडून करण्यात आली. अशोक खरातवर दाखल असणाऱ्या अत्याचाराच्या पहिल्या गुन्ह्यात याधी तीनवेळा त्याला पोलीस कोठडी सूनवण्यात आली होती.

अशोक खरात याच्याविरुद्ध अत्याचाराचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. नाशिकमध्ये सरकारवाडा पोलिसांत हा गुन्हा दाखल करण्यात आला होता. अशोक खरात याने एका ३५ वर्षीय महिलेवर गुंगीचे औषध देऊन बलात्कार केल्याच्या आरोपाखाली त्याच्यावर कारवाई करण्यात आली आहे. बुधवार १८ मार्च रोजी खरात याला पहाटे तीन वाजताच्या सुमारास गुन्हे शाखेकडून ताब्यात घेण्यात आले. अशोक खरात हा सिन्नर तालुक्यात मिरगाव येथील ईशान्येश्वर मंदिर ट्रस्टचा अध्यक्ष आहे. तो मर्चंट नेव्हीतून निवृत्त झाला आहे. गेल्या काही वर्षांमध्ये कॉस्मॉलॉजी एक्स्पर्ट आणि अंकशास्त्रज्ञ म्हणून तो नावारुपाला आला. अनेक बडे राजकीय नेते, सेलिब्रिटी आणि उद्योजक त्याच्याकडे मार्गदर्शनासाठी जातात. मात्र, त्याला बलात्काराच्या आरोपाखाली अटक करण्यात आल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.



सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## पंचायत समिती कार्यालय सिल्लोड येथे तंबाखू मुक्त ची प्रतिज्ञा घेण्यात आली



**सिल्लोड प्रतिनिधी** | तंबाखूमुक्त अभियान निमित्त पंचायत समिती कार्यालय सिल्लोड येथे माननीय गटविकास अधिकारी पंचायत समिती सिल्लोड रत्नाकर पगार यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यालयातील सर्व विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी यांना तंबाखूमुक्त अभियानाची शपथ देण्यात आली. यावेळी सहाय्यक प्रशासन अधिकारी दिपक गावंदे, तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर नासेर खान, कृषी अधिकारी सुनील सूर्यवंशी, विस्तार अधिकारी (पंचायत )साहेबराव शेळके, राधाकिसन चौधरी, विस्तार अधिकारी कृषी जोगेंद्र अहिरराव , राजेंद्र लांडगे, विश्वास बनसोडे, सहाय्यक लेखा अधिकारी उमेश मिसाळ, स्वच्छ भारत मिशन ग्रामीण गट समन्वयक केशवकांत बुलबुले व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. सुनंदा खणसे यांचा होमिओपॅथीक परिषदेत सहभाग

**पैठण प्रतिनिधी** | पणजी इथे आयोजित इंडियन होमिओपॅथिक मेडिकल असोसिएशनच्या परिषदेत पैठणच्या डॉ. सुनंदा खणसे यांनी शोध पत्र सादर केले.




२९ मार्च गोवा पणजी येथील कला अकॅडमी मध्ये आयोजित इंडियन होमिओपॅथिक मेडिकल असोसिएशन च्या परिषद मध्ये पैठण येथील डॉ. सुनंदा खणसे यांनी डायबिटीस नेप्रोपॅथी संबंधी शोध पत्र सादर केले व होमिओपॅथिक औषधाचा वापर करून आपण पेशंटला कसे बरे करू शकतो याविषयी मार्गदर्शन केले, मधुमेहाचा वाढता प्रादुर्भाव आणि किडनीवर मधुमेहामुळे होत असलेल्या परिणामाने अनेक गुंतागुंतीच्या समस्या किंवा किडनी खराब होणे असे अनेक समस्या रुग्णांना जाणवतात त्यासाठी होमिओपॅथिक औषध किती प्रभावी आहे हे त्यांनी बऱ्या केलेल्या केसेस तिथे प्रस्तावित केल्या व भविष्यात होमिओपॅथी अशा पेशंटसाठी वरदान ठरू शकते अशी माहिती दिली. या कॉन्फरन्स साठी भारतातील विविध प्रांतातील अनेक डॉक्टर उपस्थित होते मराठवाड्यातुन पैठण येथील डॉ. सुनंदा खणसे , डॉ. दिगंबर खणसे हे उपस्थित होते तसेच गोव्याचे गव्हर्नर पशुपती अशोक गजपती राजू यांनी विशेष उपस्थिती लावली तसेच श्री विश्वजीत राणे हेल्थ मिनिस्टर ऑफ गोवा,श्री चंद्रकांत कवळेकर कला अकॅडमी चे अध्यक्ष, कॅन्सर तज्ञ डॉ. फारुख मास्टर डॉ. नंद गोपाल, आयएच.ए.म.ए चे डायरेक्टर, डॉ.सान्वी नाईक तसेच संपूर्ण भारतातील ३४ डॉक्टरांनी आपल्या शोध पत्र सादर केले.

## प्रा कृष्णा लांडगे यांना इंग्रजी विषयात पी.एच.डी.



तभा वृत्तसेवा

पैठण दि ०१ :- डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने पैठण तालुक्यातील आवडे उंचेगावचे प्रा कृष्णा भारतराव लांडगे ( विनायकराव पाटील कनिष्ठ महाविद्यालय, वैजापूर) यांना इंग्रजी विषयात नुकतीच पीएचडी जाहीर केले. श्री मुक्तानंद महाविद्यालय, गंगापूर येथील इंग्रजी विषयाचे प्राध्यापक डॉ दादासाहेब साळुंके यांच्या मार्गदर्शनात "मायथॉलॉजिकल इंटरप्रिटेशन ऑफ आमिष त्रिपाठीज नॉव्हेल्स : अ क्रिटिकल स्टडी या विषयावर शोधप्रबंध सादर केला त्यास विद्यापीठाने मान्यता दिली ; याबद्दल त्यांचे सर्व सहकारी मित्र मार्गदर्शक तसेच ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

## पैसाबाजार सीपीएल २.०: तुमच्या क्रेडिट स्कोअरसह आकर्षक बक्षिसे जिंका

मुंबई : पैसाबाजार, भारतातील सर्वात मोठे आर्थिक मार्केटप्लेस आणि मोफत क्रेडिट स्कोअर प्लॅटफॉर्म, क्रेडिट प्रीमियर लीग (सीपीएल) २.० घेऊन पुन्हा एकदा परत आले आहे. या उपक्रमांतर्गत देशभरातील सर्वाधिक क्रेडिट स्कोअर असलेल्यांना ओळखले जाईल आणि पुरस्कृत केले जाईल.गेल्या दहा वर्षांपासून, पैसाबाजारने आपल्या मोफत क्रेडिट स्कोअर उपक्रमाद्वारे भारतात क्रेडिट जागरूकता वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या उपक्रमाने लाखो लोकांना क्रेडिट मिळवण्यासाठी, ते समजून घेण्यासाठी आणि त्यांची क्रेडिट स्थिती सुधारण्यासाठी मदत केली आहे. क्रेडिट जागरूकता अधिक आकर्षक, सहभागी आणि कृती-आधारित बनवण्याच्या उद्देशाने, सीपीएलहे या प्रयत्नातील पुढील पाऊल आहे.

## वी' चा महाराष्ट्रात ५जी विस्तार

नांदेड-पुणे, नागपूर, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर यांसारख्या प्रमुख शहरांमध्ये ५जी सेवांना मिळालेल्या उस्फुर्त प्रतिसादानंतर, देशातील आघाडीची टेलिकॉम कंपनी 'वी' आता महाराष्ट्रातील इतर भागांमध्ये आपल्या ५जी सेवांचा वेगवान विस्तार करत आहे. राज्यातील आपले नेटवर्क अधिक मजबूत करण्यासाठी, कंपनीने ८ महत्त्वाच्या शहरांमध्ये ५जी सेवा सुरू केल्याची घोषणा आज केली आहे. यामध्ये कोल्हापूर, वसई, नांदेड, जळगाव, सातारा, मालेगाव, शिर्डी आणि धुळे यांचा समावेश आहे.आपल्या नियोजित विस्तार योजनेचा भाग म्हणून, मे २०२६ पर्यंत 'वी' आपली ५जी सेवा अकोला, मिरज, चंद्रपूर, सोलापूर, उल्हासनगर, भिवंडी, अहिल्यानगर, अमरावती, लातूर आणि गोवा यांसह आणखी दहा शहरांमध्ये सुरू करणार आहे.

## महाराष्ट्र उद्योग संचालनालयाशी सहयोग

छत्रपती संभाजीनगर— वॉलमार्ट वृद्धीने आज महाराष्ट्र शासनाच्या उद्योग संचालनालयाबरोबर त्यांच्या उपक्रम भागीदार आयडियाज टू इम्पॅक्ट फाउंडेशनच्या माध्यमातून सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. ही भागीदारी संपूर्ण महाराष्ट्रात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी (एमएसएमई) वाढीच्या नवीन संधी निर्माण करण्यासाठी तयार करण्यात आली आहे. डिजिटल शिक्षण सुविधा आणि व्यवसाय साधने देऊन एमएसएमईंना देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत विस्तार, व्याप्ती वाढवण्यास आणि प्रगती करण्यास मदत करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. मुंबई येथे एक एप्रिल रोजी या करारावर स्वाक्षरी करण्यात आली असून भारतातील एक लाख एमएसएमईंना २०२८ पर्यंत सक्षम करण्याच्या वॉलमार्ट वृद्धीच्या मोहिमेतील हा महत्त्वाचा टप्पा आहे.

# 'पपई'वरून वाद चिघळला; आश्रमात शेतकऱ्याला बेदम मारहाण, गावकऱ्यांचा संताप उसळला

तभा वृत्तसेवा

कन्नड : तालुक्यातील मुंगसापूर (जेहुर) येथील ब्रम्हश्री जनार्दन स्वामी आश्रम परिसरात पपई विक्रीच्या कारणावरून शेतकऱ्यावर झालेल्या मारहाणीच्या घटनेनंतर परिसरात तणाव निर्माण झाला आहे. या प्रकरणी कन्नड ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आज (दि. 01 एप्रिल) जेहुर गावकऱ्यांनी आंदोलन करत तीव्र निषेध व्यक्त केला.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी बबन जयवंतराव पवार (वय 59, रा. जेहुर) हे आश्रम परिसरात पपई विक्री करत होते. यावेळी मुकुंद शंकर पाटील ऊर्फ बापू महाराज (रा. ब्रम्हश्री जनार्दन स्वामी आश्रम, मुंगसापूर), संजय नवनाथ फोलाने, आकाश रावसाहेब गोडसे, आकाश नवनाथ फोलाने, रविंद्र रावसाहेब गोडसे (सर्व रा. तांदुळवाडी ता. कन्नड) व इतर तिघांनी एकत्र येत त्यांना विरोध केला.

वाद वाढताच आरोपींनी फिर्यादीची कॉलर पकडून फरपटत आश्रमात नेले. तेथे बापू महाराज यांनी लाकडी पादुकांनी मारहाण केली, तर इतरांनी लाकडी दांड्याने मारहाण करत जखमी केले. "तुला संपवून टाकतो, कुटुंबालाही सोडणार नाही" अशा शब्दांत जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याचे फिर्यादीने तक्रारीत नमूद केले आहे.

घटनेनंतर आज जेहुर गावात संतापाची लाट उसळली. गावकऱ्यांनी एकत्र येत रस्त्यावर उतरून आंदोलन केले. "शेतकऱ्यावर हात उचलणाऱ्यांना कठोर शिक्षा झालीच पाहिजे," अशी एकमुखी मागणी करत गावकऱ्यांनी घोषणाबाजी केली. काही काळ परिसरात तणावपूर्ण शांतता होती.

या प्रकरणी सर्व आरोपींविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक डॉ.रामचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हेडकॉन्स्टेबल संदीप कनकुटे करत आहेत.

# धगधगत्या प्रसंगांवर मात करण्याचे विद्यार्थ्यांना धडे



तभा वृत्तसेवा

पैठण दि ०१ :-आपत्तीच्या क्षणी घाबरण्याऐवजी धैर्य, तत्परता आणि योग्य कृती कशी करावी, याचे जिवंत उदाहरण विद्यार्थ्यांना पाहायला मिळाले, ते शाळेत आयोजित करण्यात आलेल्या अग्निशमन मॉकड्रीलमुळे. या प्रभावी उपक्रमामुळे संपूर्ण परिसरात सुरक्षिततेचा संदेश घुमला.

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई द्वारा संचलित आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिर येथे अग्निशमन दलाच्या अधिकारी व जवानांसह प्रत्यक्ष अनुभव व प्रात्यक्षिक दाखवण्यात आले.

या प्रसंगी अग्निशमन अधिकारी जुम्मा तडवी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या मॉकड्रीलमध्ये प्रमुख अग्निशमन (जवान ) विमोचक अनिल सातपुते, संतोष पवार, चालक देविदास पाटील तसेच तुळशीदास वखरे, बाळू पवार आणि दिशांत वनवे यांनी धडाकेबाज प्रात्यक्षिके सादर केली. गॅस गळतीमुळे लागलेली आग, विद्युत आगीसारख्या गंभीर प्रसंगांवर कशी नियंत्रण मिळवायची, याचे थरारक प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांसमोर सादर करण्यात आले.धुराचे लोट, सायरनचा आवाज आणि क्षणार्धात आगीवर नियंत्रण मिळवणारी टीम पाहून विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकतेसोबतच आत्मविश्वासही निर्माण झाला. प्रत्येक क्षणात सजगता आणि शिस्त किती महत्त्वाची आहे, याची जाणीव या मॉकड्रीलमधून प्रकर्षाने झाली.यावेळी विद्यार्थ्यांमध्ये कुतूहलाने निर्माण झालेल्या प्रश्नांची उत्तरे देऊन मुलांच्या शंकांचे निराकरण अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी केले.

कार्यक्रमास स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ. पद्मकुमार कासलीवाल, विजय चाटुपळे तसेच केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी यांची उपस्थिती लाभली.

या मॉकड्रीलमुळे विद्यार्थ्यांच्या मनात भीतीऐवजी सजगतेची ज्योत प्रज्वलित झाली असून, सुरक्षित भविष्यासाठी हा उपक्रम एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन श्रीमती उज्वला कुटे यांनी केले.

"आपत्ती कधीही सांगून येत नाही, पण प्रसंगावधान,योग्य कृती आपल्या हातात असते," असा संदेश देत अग्निशमन अधिकारी तडवी यांनी विद्यार्थ्यांना धैर्य, संयम आणि तात्काळ कृती यांचे महत्त्व पटवून दिले.

## न भूतो न भविष्यती! विश्वशांतीसाठी ५ लाख कुटुंबांचा 'नवकार' एल्गार ३०९ कोटी जपाचा ऐतिहासिक टप्पा पार!

छत्रपती संभाजीनगर: "नवकार करे बेडापार" या श्रद्धेचा आणि सामूहिक शक्तीचा एक अद्भूत चमत्कार आज संपूर्ण विश्वाने अनुभवला आहे. जागतिक शांततेसाठी सकल जैन समाज, 'नवकार फाऊंडेशन' आणि 'जितो' (JITO) च्या वतीने राबवण्यात येत असलेल्या १००८ कोटी नवकार महामंत्र जपानुष्ठानाला उदंड प्रतिसाद लाभला असून, अवघ्या एका दिवसांत महावीर जयंतीच्या दिवशी ३०९ कोटींहून अधिक जपाचा महान टप्पा ओलांडला गेला आहे. या आध्यात्मिक महाकुंभात ५ लाखांहून अधिक जैन आणि अजैन कुटुंबांनी सहभागी होऊन एक नवा जागतिक विक्रम प्रस्थापित केला आहे.

३१ जानेवारी रोजी महावीर जयंतीचे औचित्य साधून 'हर घर नवकार' अभियानांतर्गत प्रत्येकाने ११ माळा जप करण्याचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत देश-विदेशातील घराघरांतून सकारात्मक ऊर्जेचा प्रवाह वाहू लागला. विशेष म्हणजे, केवळ जैन समाजच नव्हे तर हजारो अजैन बांधव आणि सामाजिक संस्थांनीही या शांतता यज्ञात आपली आहुती दिली. २५ हजार साधू-साध्वीजींच्या पावन आशीर्वादाने आणि प.पू. गच्छाधिपती अभयदेवसुरीश्वरजी महाराजांच्या प्रेरणेने या उपक्रमाला आता लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

या ऐतिहासिक संकल्पाला यशस्वी करण्यासाठी सकल जैन समाज राष्ट्रीय अध्यक्ष विजयबाबू दर्डा, सकल जैन समाज अध्यक्ष राजेंद्र बाबूजी दर्डा आणि जितो इंटरनॅशनलचे पृथ्वीराज कोठारी यांचे भक्कम पाठबळ लाभले आहे. प.पू. आचार्य मोक्षरत्न सुरेश्वरजी म.सा. आणि कोटा संप्रदायाचे साध्वी प.पू. सिद्धीसुधाजी म.सा. यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम सुरू आहे. पारदर्शकतेसाठी वापरण्यात आलेल्या क्यूआर कोड (QR Code) प्रणालीमुळेच ३०९ कोटींचा हा आकडा अचूकपणे समोर येऊ शकला आहे.

## आज साधना सप्ताहःनोंदणी-प्रशिक्षण कार्यशाळा

छत्रपती संभाजीनगर, दि.१(जिमाका)- भारत सरकार क्षमता विकास आयोग आणि कर्मयोगी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२ ते ८ या दरम्यान 'साधना सप्ताह' राबविण्यात येणार आहे. राज्य शासनातील अधिकारी- कर्मचारी यांना I Got कर्मयोगी या प्लॅटफॉर्मवर किमान ४ तासाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाची सुरुवात आणि या प्रशिक्षणासाठी ऑनलाईन नोंदणी व प्रत्यक्ष प्रशिक्षण करण्याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी गुरुवार दि.२ रोजी सकाळी १० वा. कार्यशाळा आयोजीत करण्यात आली आहे. स्मार्ट सिटी सभागृह, आमखास मैदानाजवळ, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर येथे ही कार्यशाळा होणार आहे. या कार्यशाळेस सर्व विभागप्रमुख, कार्यालयप्रमुखांनी उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे. क्षेत्रीय व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांना सहभागी होता यावे यासाठी ऑनलाईन सहभागाची सुविधाही उपलब्ध करण्यात येईल,असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# जिल्हा पाणी व स्वच्छता समिती बैठक 'जलजीवन मिशन'साठी कालबद्ध कार्यक्रम राबवा-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर, दि.१(जिमाका)- जिल्ह्यात जलजीवन मिशन अंतर्गत करावयाची कामे कालबद्ध कार्यक्रम राबवून पूर्ण करावीत,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज संबंधित यंत्रणांना दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज जिल्हा पाणी व स्वच्छता समितीच्या बैठकीत जलजीवन मिशनअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण पाणीपुरवठा योजनांचा आढावा घेण्यात आला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत, कार्यकारी अभियंता शामकांत वारे, वरिष्ठ भूवैज्ञानिक जीवन बेडवाल तसेच सर्व उपअभियंता, कनिष्ठ अभियंता उपस्थित होते.

बैठकीत माहिती देण्यात आली की,जिल्ह्यात एकूण १२४४ गावांसाठी ११६४ योजना मंजूर असून त्यापैकी ७०२ योजना पूर्ण झाल्या आहेत. सध्या या योजनांची एकूण भौतिक प्रगती सुमारे ६०.३१ टक्के आहे. मंजूर योजनांची अंदाजपत्रकीय किंमत ७४३.८१ कोटी रुपये असून आतापर्यंत ३२३.५० कोटी रुपये खर्च झाले आहेत. उर्वरित योजना पूर्ण करण्यासाठी ४२०.३१ कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले. तसेच काही ठिकाणच्या कामांसाठी वस्तू व सेवांच्या वाढलेल्या दरांमुळे तसेच तांत्रिक बदलांमुळे सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्याची गरज असल्याचे स्पष्ट करण्यात आले. जिल्ह्यात एकूण ८६० योजनांमध्ये विविध कारणांमुळे सुधारणा प्रस्तावित आहेत. बैठकीत जलसेवा आकलन, तांत्रिक मान्यता, तसेच नळजोडणी प्रगतीचा आढावाही घेण्यात आला.

तालुकानिहाय आढाव्यात गंगापूर, पैठण व वैजापूर या तालुक्यांमध्ये प्रगती समाधानकारक असून इतर तालुक्यांमध्ये कामांची गती वाढवण्याच्या सूचना देण्यात आल्या. जिल्हाधिकारी स्वामी यांनी निर्देश दिले की, जेथे योजनेचे काम हे ७५ ते ९९ टक्के इतके झाले आहे अशा ठिकाणी प्राधान्याने काम पूर्ण करावे. शाळा,अंगणवाडी, ग्रामीण रुग्णालये येथे नळ जोडणी प्राधान्याने पूर्ण करावी. जेथे कामांना अकारण विलंब होत असेल तेथे कंत्राटदारांना कारणे दाखवा नोटीस बजावा. कामे पूर्ण झाली असूनही योजना हस्तांतरीत करण्यात अडचणी असतील तेथे विशेष ग्रामसभांचे आयोजन करुन योजना हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करा,असे निर्देश देण्यात आले. या संदर्भात येत्या १० एप्रिल रोजी पुन्हा आढावा घेण्यात येईल,असेही सांगण्यात आले.

उर्वरित कामे कालबद्ध कार्यक्रम राबवून वेळेत पूर्ण करावीत व सर्व गावांना सुरक्षित,शाश्वत पाणीपुरवठा सुनिश्चित करावा. शासनाच्या अन्य यंत्रणांद्वारे प्रत्यक्ष पाहणी करुन वस्तुस्थिती दर्शक अहवाल सादर करावा. योजनेचे जलस्रोत असणाऱ्या ठिकाणी जलपुनर्भरण प्रक्रिया प्राधान्याने राबवावी,असेही त्यांनी सांगितले.

## सोयगाव तालुक्यातील मोबाईल टॉवर चे काम सुरु करा - ईद्रीस मुलतानी यांची मागणी



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३१ मार्च

दिल्ली येथे भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रीस मुलतानी यांनी केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांची भेट घेऊन सोयगाव तालुक्यातील जगप्रसिध्द अजिंठा लेणी सहित,मोलखेडा, महाल ब्धा,टिटवी,चारूमूर्ती,रवळा,ढा बा या गावांमध्ये मोबाईल टॉवर नसल्यामुळे कुठल्याही प्रकारची रेंज नाही. सोयगाव तालुका हा दुर्गम भागातील व सरकारने डोंगरी क्षेत्र घोषित केलेला तालुका आहे. त्यामुळे या गावातील लोकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. आधुनिक युगामध्ये इंटरनेट शिवाय कुठलेही काम होत नाही.मग ग्रामीण भागातील घरकुलांचा सर्वे असो, दवाखाना संबंधित सर्वे असो,बँकिंग क्षेत्रातले विषय असो, शैक्षणिक क्षेत्रातील विद्यार्थी मोबाईल लॅपटॉवर अभ्यास करतात.त्यांनाही हा त्रास सहन करावा लागतो. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये प्रामुख्याने हीच मागणी जनतेची होती.त्यावेळी त्यांना आश्वासन देण्यात आले होते.

माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांना केंद्रीय मंत्रिमंडळातला अनुभव असून त्यांच्या माध्यमातून हा विषय मार्गी लावू असे आश्वासन जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत दिले होते.त्याची पूर्तता म्हणून केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांची भेट घेऊन या गावातील नवीन टावरचे काम तातडीने पूर्ण करावे,अशा प्रकारचे निवेदन माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या पत्रावर देऊन त्यांची याविषयी फोन द्वारे चर्चा करून दिली. त्यामुळे त्यांनी सोयगाव तालुक्यातील जिथे जिथे आवश्यकता भासेल तिथे टावर चे काम सुरू करण्याचे आश्वासन दिले.हे टावर जर पूर्ण झाले तर या भागातील नेटचा प्रॉब्लेम पूर्णपणे मिटेल.जगप्रसिद्ध अजिंठा लेणी येथे जगभरातून अनेक पर्यटक येतात पण लेणीमध्ये रेंज नसल्यामुळे त्यांना अडचणींचा सामना करावा लागत होता. म्हणून या ठिकाणी लवकरात लवकर टावर चे काम सुरू करावे अशी मागणी केली. त्या संदर्भात त्यांनी आश्वासन दिले की लवकरात लवकर काम सुरू करण्याचा शब्द दिला.

## जागतिक आरोग्य दिनानिमित्त कलाकारांचा आरोग्य विषयक संदेश

छत्रपती संभाजीनगर -जागतिक आरोग्य दिनानिमित्त कलाकारांनी दिलेला मुख्य संदेश स्पष्ट आणि ॲक्शन-ओरिएंटेड आहे—उत्तम आरोग्यासाठी मोठ्या गुंतवणुकीपेक्षा सस्टेनेबल आणि कन्सिस्टंट सवयी अधिक परिणामकारक ठरतात. &TV वरील 'घरवाली पेड़वाली' आणि 'भाबीजी घर पर हैं 2.0' या मालिकांमधील कलाकारांनीही यावर भर दिला आहे. नियमित व्यायाम, संतुलित आहार, पुरेशी झोप आणि मानसिक आरोग्याकडे लक्ष देणे ही चार मूलभूत स्तंभ प्रणाली म्हणून स्वीकारणे आवश्यक आहे. दैनंदिन दिनक्रमात लहान बदल—जसे की 30 मिनिटांची फिजिकल ॲक्टिव्हिटी, प्रोसेस्ड फूड टाळणे, हायड्रेशन मेंटेन करणे आणि माइंडफुलनेसचा सराव—दीर्घकालीन आरोग्य परिणाम सुधारतात. त्याचबरोबर, स्वतःसाठी वेळ काढणे, सकारात्मक विचारसरणी विकसित करणे आणि ताण-तणाव व्यवस्थापनावर फोकस ठेवणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. एकंदरीत, हेल्थ मॅनेजमेंट हा सतत चालणारा प्रोसेस असून, साध्या पण सातत्यपूर्ण सवयींमुळे जीवनमान लक्षणीयरीत्या उंचावू शकते.

# माणुसकी समूहाचा नववा वर्धापन दिन व ची.राम पंडित यांचा वाढदिवस रक्तदान शिबिराने व सेवा गौरव पुरस्कार सोहळ्याने सपन्न



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१ एप्रिल

माणुसकी समूहाचा नवव्या वर्धापन दिन व चि.राम पंडित यांच्या वाढदिवस मोठ्या थाटात रक्तदान शिबिराने व सेवा गौरव पुरस्कार सोहळ्याने झाला सपन्न या कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून व संत गाडगेबाबांचे पुजन करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.शरद सोनवणे यांनी केले,कार्यक्रमांमध्ये विविध क्षेत्रातील मान्यवरांना सेवा गौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सचिन कुंभार वरिष्ठ पोलिस निरीक्षक हे होते व प्रमुख पाहुणे म्हणून शामसुंदर कौठाळे वरिष्ठ पोलिस निरीक्षक,अमोल सातोडकर सहायक पोलीस निरिक्षक,

भगतसिंह दरक संचालक हायफिल्ड एजी-केम प्रा.लि,

मिराबाई देविदास पंडित,सुनिता खंडागळे पं.स.सभापती,मुक्ताराम पाटील गव्हाणे,भरत चौधरी उद्योजक,यांच्या हस्ते सेवा गौरव पुरस्कार देवुन पुरस्कारार्थिंना सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमासाठी विशेष आकर्षण ठरले ते जूनियर चार्ली सोमनाथ स्वभावणे यांनी सावधान सावधान पोलीस है अपने साथी या गीतातून मुख अभिनयातुन आपली कला सादर करून प्रमुख पाहुण्यांची मने जिंकली.कार्यक्रमात अध्यक्षिय भाषणात उपस्थिताना मार्गदर्शन करित सचिन कुंभार वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांनी गाडगेबाबा यांचे चरणावर आधारित माणसात देव असणे गरजेचे आहे,तसेच काम माणुसकी समूह करत आहेत.गाडगे बाबा यांना अनेक जण नाव ठेवत होते,त्यांना आम्ही पहिले नाही मात्र सुमित पंडित यांचे काम तसेच असल्याने आधुनिक काळातील ते गाडगे महाराज आहेत अस म्हणावे लागेल.चहाचीहि अपेक्षा न ठेवता हि मंडळी काम करतात कोणाला शुभेच्छा देखील मनातून देण्याची वृत्ती राहिलेली नाही,असा काळात मनापासून सेवा करण्याचे काम माणुसकी समूह सुमित पंडित आणि पूजा पंडित करत असल्याने त्यांच्या कामाची दखल घेण्याची गरज आहे आमच्या पोलीस खात्याची नाळ त्यांच्याशि जुळलेली आहे.तसेच शामसुंदर कौठाळे वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांनी मार्गदर्शक करतांना.म्हणाले की सुमित पंडित व पुजा पंडित यांचे माणुसकीचे कार्य हे मानवतेचे सर्वश्रेष्ठ कार्य सु-लक्ष्मी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या व माणुसकीचा नवव्या वर्धापन दिनानिमित्त एकत्र आलेलो आज सकाळीच रक्तदानाच्या पवित्र कार्याने सुरुवात होऊन पुढे विविध क्षेत्रात काम केलेल्या लोकांचा सत्कार करण्यात आला सुमित पंडित यांच्या कार्य मी गेल्या चार वर्षांपासून पाहात आहे. मनोरुग्णासाठि काम करने कठिन आहे त्याच्या साठी कोन्हिच काम करायला तयार नाही बेवारसांचे कीतीतरी अंत्यविधी ह्या सुमित ला वेळेचे बंधने नाही हे काम पोलीसांचे आहे पण सुमित अर्धा रात्री सुमित मदतीसाठी धावून येतो कुष्ठरोग निर्मूलन आणि मानवतेची सेवा ह्या एका वेगळ्या विषयात हा आवलीया काम करत आहे. त्याला त्याच्या कार्यात त्याची सहचरणी ही तेवढ्याच त तोलामोलाची साथ देत आहे. येथे मला महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले दापत्यांची आठवण होत आहे. सुमित व पूजाताई हे आजच्या काळातील फुले आहे.मानव सेवाचा विचार करताना,आपल्याला महात्मा बुद्ध,महात्मा बसवेश्वर,संत सेना महाराज,चोखामेळा,संत गाडगे महाराज,आणि बाबा आमटे यांसारख्या थोर व्यक्तींनी केलेल्या महान कार्याची आठवण होते.

मानवतेची शिकवण आणि समाजकार्य,आजच्या काळातील सुमित पंडित माणुसकीचे तारणहार मतिमंद, बेघर,वृद्ध अपंग माजाने दूर लोटलेल्यांना सुमित पंडित यांनी स्वाभिमानाने जगण्यासाठी आश्रय मिळवून दिला.जटवडा रोड,छत्रपती संभाजी नगर सारख्या ठिकाणी पंडित दांपत्याने यांची निर्मिती केवळ एक आश्रम नव्हे,तर ती एक क्रांती आहे.असे उपस्थीतांना आव्हान केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
https://epaper.dainiktarunbharat.com/



## संक्षिप्त...

### निस्वार्थ सेवेतून जनतेचा विश्र्वास मिळतो - विधानसभा परिषद सभापती राम शिंदे



**तभा वृत्तसेवा**

**औसा :** समाजातील दुर्बल घटकांना न्या मिळवून देण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे काम करावे.निस्वार्थ सेवेतून जनतेचा विश्र्वास जिंकता येतो. आणि हीच जनता कार्यकर्त्यांच्या पाठिशी उभी राहते.असा कानमंत्र विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना दिला. औसा येथे आयोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय मंडळ प्रशिक्षण महाअभियानात राम शिंदे यांचा कार्यकर्त्यांशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. आ. अभिमन्यू पवार, कासारशिरशी मंडळाचे मंडळ अध्यक्ष नाना धुमाळ उपस्थित होते.

सभापती राम शिंदे म्हणाले, समाजातील वंचित आणि शोषित घटकांपर्यंत शासनाच्या योजना प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी भाजप कार्यकर्त्यांनी निस्वार्थ व समर्पित भावनेने काम करावे. भारतीय जनता पार्टी कार्यकर्त्यांची पार्टी असल्याचे अधोरेखित असून या पक्षात सामान्य कार्यकर्त्यालाही न्याय मिळतो. मी स्वतः २००५ मध्ये सरपंच निवडणुकीत पराभूत झालो, मात्र पक्षाने माझ्यावर विश्र्वास ठेवून २००९ मध्ये विधानसभेची उमेदवारी दिली आणि मी आमदार झालो, असे सांगत त्यांनी कार्यकर्त्यांच्या कष्टांचे महत्त्व स्पष्ट केले. आज अनेक सामान्य कार्यकर्ते आमदार, खासदार आणि मंत्री पदांवर कार्यरत असल्याचे त्यांनी नमूद केले.

तसेच आमदार अभिमन्यू पवार यांनी शेतरस्त्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी केलेल्या कामाचा उल्लेखही त्यांनी केला. कार्यकर्ते अधिक सक्षम व्हावेत, त्यांच्यात जनसेवेची व देशभक्तीची भावना निर्माण व्हावी. यासाठी भारतीय जनता पार्टी विविध प्रशिक्षण अभियान राबवित असल्याचेही राम शिंदे यांनी स्पष्ट केले. या प्रशिक्षण उपक्रमांमुळे कार्यकर्त्यांना संघटनात्मक बळकटी मिळून ते अधिक प्रभावीपणे जन-तेची सेवा करू शकतात, असे त्यांनी सांगितले, भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते. या महाअभियानातून कार्यकर्त्यांना प्रेरणा व दिशा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

### नागप्पा परशेट्टे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**

**कासार शिरसी :** निलंगा तालुक्यातील कासार शिरसी येथील जेष्ठ नागरिक तथा सेवानिवृत्त मुख्याध्यापक कै.



नागप्पा विरभद्रप्पा परशेट्टे वय वर्ष ७५ यांचे सोमवार दि. ३० मार्च रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दि. ३१ रोजी येथील लिंगायत स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्र्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा, जावई ,सुन, नातवंडे असा परिवार आहे.

### मोफत प्रमाणपत्र वितरण



**तभा वृत्तसेवा**

**जळकोट :** दिनांक ३० मार्च २०२६ जळकोट शहरातील व्यवसायिक मुद्रांक विक्रेते बळीराम नामवाड आणि कविता नामवाड यांच्या उदयगिरी पेपर मार्ट आणि ऑनलाईन सर्विसेस या व्यापारी संकुलात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना या योजनेची मोफत संचिका मौजे करंजी येथील लाभधारक व्यंकटराव तुळशीराम पांचाळ यांना त्यांच्या वैद्यकीय उपचारासाठी प्रमाणपत्र देण्यात आले यावेळी भारतीय नवनिर्माण लहुजी सेनेचे सेना प्रमुख.मा. पी.एस. मोतेवाड, अड. श्यामसुंदर गवळे , सहशिक्षक विद्यासागर भाले यांच्यात हस्ते वितरित करण्यात आली.

### केंद्रे दाम्पत्याचा 'एज्युकॉन पुरस्कारा'ने सन्मान

**तभा वृत्तसेवा**

**जळकोट :** मराठवाडा विभागात शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल 'नवभारत'च्यावतीने आयोजित शैक्षणिक सन्मान सोहळ्यात राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे व अध्यक्षा के. ए. जायेभाये यांना मंगळवारी 'एज्युकॉन पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

छत्रपती संभाजीनगर येथील हॉटेल ट्रीट इम्पोरियल या ठिकाणी राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे व शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते केंद्रे दाम्पत्याला सन्मानपत्र व ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून 'नवभारत' वृत्त समुहाचे अध्यक्ष ए. श्रीनिवास, जनरल मॅनेजर कल्याण पांडे, लातूर आवृत्ती प्रमुख जयप्रकाश दगडे, महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर, कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडीगावे, दयानंद शिक्षण संस्थेचे विशाल लाहोटी, अजिंक्य सोनवणे, प्रणव शहा, ॲड. जांबुवंतराव सोनकवडे, ॲड. कंचनमाला संगवे यांची उपस्थिती होती.

# प्राध्यापकांच्या गुणवत्ते मधूनच संस्थेची शैक्षणिक ओळख निर्माण होतेः डॉ कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. ०१ एप्रिल :** महाविद्यालयातील प्राध्यापकांनी आपल्या स्वतःच्या शैक्षणिक विकासामध्ये केलेले संशोधन, प्रकाशन आदी कार्याची नोंद असणारे विद्वान आयडी तयार करणे आवश्यक आहे. प्राध्यापकांची विद्वान आयडी म्हणजे संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेची खरी ओळख असते. असे डॉ जगदीश कुलकर्णी यांनी कार्यशाळेत व्यक्त केले मत.



येथील विचार विकास मंडळ संचलित महात्मा गांधी महाविद्यालयातील गुणवत्ता हमी कक्ष अंतर्गत ग्रंथालय विभाग व ज्ञानस्रोत केंद्र स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने, 'Building scholarly Identities for Institutional Visibility: - Hands on Workshop on VIDWAN and IRINS' अर्थात 'संस्थेच्या दृश्यमानतेसाठी शैक्षणिक ओळख निर्माण करणे' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेचे उद्घाटक डॉ जगदीश कुलकर्णी यांनी संशोधन, प्रकाशन, ई-जर्नल्स, पेटंट, शोधगंगा, प्लॅगीरिझम तसेच विद्वान डेटाबेस व आयआरआयएनएस या विषयावर विस्तृत व सखोल मार्गदर्शन केले व प्राध्यापकांच्या शैक्षणिक गुणवत्तेची नोंद असलेली विद्वान आयडी म्हणजेच संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेची खरी ओळख असते असे म्हणाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा संस्थेचे अध्यक्ष अँड किशनराव बेंडकुळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात, ग्रंथालयाचा अधिक फायदा घेऊन प्राध्यापकांनी दर्जेदार संशोधन निर्माण करावे असे आवाहन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ व्ही. पी. पवार यांनी संशोधनातील नवीन प्रवाह याविषयी माहिती दिली. विचारपीठावर सिनेट सदस्य डॉ. विनोद माने, आयक्यूएसी समन्वयक डॉ. अनिल जाधव, ग्रंथपाल डॉ. एस. आर. सुळसुळे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ एस आर. सुळसुळे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ अनिल जाधव यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. यादव सूर्यवंशी यांनी केले. आभार डॉ. के. एन. शिवलकर यांनी मानले. सदरील कार्यशाळेस महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व संशोधक विद्यार्थी यांची बहुसंख्य उपस्थिती होती.

## स्व. मुरलीधरराव पोतदार पुण्यस्मरणार्थ विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण

**तभा वृत्तसेवा**

**जळकोट, दि. ०१ एप्रिल :** जळकोट तालुक्यातील वांजरवाडा येथील श्री संत गोविंद स्मारक विद्यालयाचे कर्तव्यदक्ष, शिस्तप्रिय.. तितकेच मनमिळाऊ आदर्श व्यक्तीमत्व.. गुरूजी.. पंचक्रोशीतील एक प्रामाणिक व्यक्तिमत्व शाळेसाठी निस्वार्थी भूमिका ठेवणारे..माजी मुख्याध्यापक कै. मुरलीधररावजी पोतदार गुरुजी.. यांचे पाचवे पूण्यस्मरण दिना निमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

ज्येष्ठ पत्रकार . विवेक पोतदार यांनी आपल्या वडिलांच्या (स्व.मुरलीधरराव पोतदार) पाचव्या पुण्यस्मरणार्थ मंगळवारी विद्यार्थ्यांना हे शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले.

वांजरवाडा येथील श्री संत गोविंद स्मारक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बालाजी शिंदे हे होते यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समितीचे प्रशासन अधिकारी सचिन काडवादे उपस्थित होते. तर यावेळी पंचायत समितीचे अरविंद पाटील, एच.एम. शेख, श्री डंबाळे, मिलिंद कांबळे, श्रीकांत कुलकर्णी, जेष्ठ पत्रकार विवेक पोतदार, माधव हासुळे, बालाजी दहिफळे, कुंभारे, मल्लिकार्जुन राजुरे, ज्ञानोबा टेकाळे, महेश



अकुलवार, अल्लाउद्दीन चौधरी, पत्रकार माधव होनराव, कर्मचारी निळकंठ टाले आदि उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. सूत्रसंचालन माधव होनराव यांनी तर आभार माधव हासुळे यांनी मानले.

## सुगावच्या कावडीचा हिप्पळगाव येथील शंभू महादेवाच्या मंदिरात विवाह सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ, दि. ०१ एप्रिल :** अनंतपाळ तालुक्यातील हिप्पळगाव येथे प्रती वर्षाप्रमाणे याही वर्षी शंभू महादेवाच्या यात्रेचे आयोजन करण्यात आले होते.सकाळपासूनच शंभू महादेवाच्या दर्शनासाठी मंदिरात भाविकांची गर्दी होती.मंदिरात तरुण मंडळाकडुन विद्युत रोषणाई, फुलांची सजावट, रांगोळी, विविध प्रकारच्या सजावटीने मंदिर सजवण्यात आले होते.सायंकाळी ४:३०वाजता चाकुर तालुक्यातील सुगाव येथील कावडीचा आज शिरूर अनंतपाळ तालुक्यातील हिप्पळगाव येथे सायंकाळी ४:३० मि. विवाह सोहळा संपन्न करण्यात आला .या विवाह सोहळ्यासाठी थेरगाव,रापका,आरी,कांबळगा,देवंगरा, सावरगाव तसेच हिप्पळगाव येथील बाहेरगावी नोकरीसाठी गेलेल्या गावकऱ्यांनी विशेष सहभाग घेतला होता.



प्रति वर्षीप्रमाणेच यंदाही शिरूर अनंतपाळ तालुक्यातील हिप्पळगाव येथे महादेव पार्वती विवाह सोहळ्याचे आयोजन समस्त गावकऱ्यांनी एकत्र येऊन केले होते.

पिढचानपिढचा चालत आलेली मानाची अशी कावड म्हणून सुगाव येथील कावडीचा व महादेवाचा सर्व प्रथम वेळेवर विवाह लावण्यात येतो. त्याच पध्दतीने यंदाही आज दिनांक ३० मार्च २०२६ रोजी ठिक ४:३० मिनिटांनी विवाह सोहळा संपन्न झाला. हिप्पळगाव व परिसरातील भाविक भक्तांनी आज महादेव पार्वती विवाह सोहळ्यानिमित्त हजारो भाविक भक्त उपस्थित होते.

## इंग्रजी भाषा ही जागतिक ज्ञानाची गुरुकिल्ली - डॉ. रामप्रसाद लखोटिया

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ०१ एप्रिल :** आजच्या जागतिकीकरणाच्या युगात जगाशी प्रभावीपणे संवाद साधण्यासाठी इंग्रजी हीच प्रमुख भाषा असून तीच जागतिक ज्ञानाची गुरुकिल्ली बनली आहे, असे मत महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे सचिव तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. रामप्रसाद लखोटिया यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र उदयगिरी



महाविद्यालयातील इंग्रजी विभागाच्या वतीने बी.ए. तृतीय वर्ष व एम.ए. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. रामप्रसाद लखोटिया होते. प्रमुख पाहुणे म्हणून ग्रंथपाल डॉ. एल. बी. पेन्सलवार उपस्थित होते. व्यासपीठावर इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. संजीव सूर्यवंशी, प्रा. राजा मुदूडगे, प्रा. प्रविण अंबेसंगे, प्रा. व्ही. डी. काकनाळे, प्रा. ए. सी. बिरादार आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. संजीव सूर्यवंशी यांनी करून दिला तसेच इंग्रजी विभागामार्फत 'कम्युनिकेशन अँड स्पोकन इंग्लिश' या उपक्रमांतर्गत नियमित वर्ग तसेच प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविण्यात येतो. या संधीचा विद्यार्थ्यांनी लाभ घेऊन आपल्या भविष्यासाठी भक्कम पायाभरणी करावी, अशी माहिती सांगितली. यावेळी मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे ग्रंथपाल डॉ. एल. बी. पेन्सलवार म्हणाले, विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण आणि जागतिक स्तरावर प्रगती साधण्यासाठी इंग्रजी भाषेचे ज्ञान अत्यंत आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी आत्मविश्र्वासाने इंग्रजी आत्मसात करून उपलब्ध संधींचा लाभ घ्यावा. यावेळी लिटररी असोसिएशनच्या वतीने भित्तीपत्रक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत बी.ए. द्वितीय वर्षातील कु. ऋतुजा कप्ते व कु. आसावरी अपसिंगेकर यांनी प्रथम क्रमांक मिळविला. क्षीरसागर अभिजीत व विशाल कांबळे यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. मान्यवरांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय समारोपात डॉ. लखोटिया यांनी विद्यार्थ्यांना पदवी शिक्षणाच्या सुरुवातीपासूनच इंग्रजी भाषेवर लक्ष केंद्रित करण्याचा सल्ला दिला. प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षात सातत्याने परिश्रम घेऊन या भाषेवर प्रभुत्व मिळविल्यास शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रात यश मिळविणे अधिक सुलभ होते, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. विजयालक्ष्मी प्रसन्ने यांनी केले, तर आभार प्रा. शिवनंदा रोडगे यांनी मानले. कार्यक्रमास प्रा. प्रवीण अंबेसंगे, प्रा. बालाजीप्रसाद घाळे, प्रा. विजयालक्ष्मी प्रसन्ने, प्रा. शिवनंदा रोडगे, प्रा. शादूल शेख यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

## जिप सभापती सौ. शिवकन्या गोडभरले यांचे आ. रमेशअप्पा कराड यांच्याकडून अभिनंदन



**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. ०१ एप्रिल :** लातूर जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापतीपदी भाजपाच्या सौ. शिवकन्याताई महेंद्र गोडभरले यांची बिनविरोध निवड झाली असून या निवडीबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील रेणापूर तालुक्यातील खरोळा जिल्हा परिषद गटातून बहुमताने विजयी झालेल्या भाजपाच्या सौ. शिवकन्याताई महेंद्र गोडभरले यांची लातूर जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी बिनविरोध निवड झाली. निवड जाहीर झाल्यानंतर भाजपाच्या संवाद कार्यालयासमोर फटाके फोडून नूतन सभापती शिवकन्याताई गोडभरले यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी नूतन सभापती सौ. शिवकन्याताई गोडभरले यांचा यथोचित सत्कार करून अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील अंगणवाडीसह महिलांचे व इतर प्रश्र्नाची निश्र्चितपणे सोडवणूक होईल अशी अपेक्षा व्यक्त केली.

याप्रसंगी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, जिप सदस्य महादेव साळुंखे, सौ. छायाताई पद्माकर चिंचोलकर, महेंद्र गोडभरले, प्रताप पाटील, सुरज शिंदे, अनिल भिसे, राजकिरण साठे, प्रताप राऊतराव, सुरेंद्र गोडभरले, लक्ष्मण यादव, निवृत्ती चिद्रे, सुधाकर काळे, रमाकांत फुलारी, चंद्रकांत कातळे, संतोष चव्हाण, रुपेश काळे, अशोक सावंत, राजू मानमोडे, शुभम खोसे, वैभव मगर, बालाजी गवळी, नारायण राठोड, पुरी महाराज, बालाजी मानमोडे, दिलीप पाटील, प्रशांत रायनूळे यांच्यासह अनेकांनी नवनिर्वाचित सभापती सौ. शिवकन्याताई महेंद्र गोडभरले यांचे अभिनंदन केले.

# पशुवैद्यक महाविद्यालयाचे रासेयो शिबीर तोंडार येथे उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ०१ एप्रिल :** पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर तर्फे आयोजित सात दिवसीय राष्ट्रीय सेवा योजना विशेष कार्यक्रम शिबीर तोंडार (ता. उदगीर) येथे मोठ्या उत्साहात पार पडले. या शिबीरामध्ये चतुर्थ वर्षाच्या ५७ विद्यार्थी स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अनिल भिकाने, माजी संचालक विस्तार शिक्षण, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर हे उपस्थित होते तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाच्या सहयोगी अधिष्ठाता डॉ. राजश्री गंदगे या उपस्थित होत्या. उद्घाटनप्रसंगी मंचावर गावचे सरपंच श्री. भरत कोचेवाड, श्री. नीळकंठ बिरादार (ग्रामपंचायत सदस्य),




श्री. राजेंद्र पाटील (माजी पंचायत समिती सदस्य), श्री. रामेश्र्वर बिरादार (ग्रामपंचायत सदस्य), श्री. माधव पाटील इत्यादी उपस्थित होते.

शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ. अनिल भिकाने यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणामध्ये हवामान बदलाच्या काळात शाश्र्वत शेतीतून शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी व पर्यायाने शाश्र्वत ग्रामविकासासाठी जलसंधारण, मृदासंधारण, वृक्ष संवर्धन, पशुपालन व दुग्धव्यवसायाचे अनन्यसाधारण महत्व असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. राजश्री गंदगे यांनी पशुपालकांच्या उन्नतीसाठी महाविद्यालय देत असलेल्या योगदानाबद्दल उपस्थिताना माहिती दिली.

सात दिवसीय विशेष कार्यक्रम शिबिरादरम्यान जनावरांसाठी गोचीडनाशक औषधाची फवारणी, जंतनाशक औषधाचे वाटप, पाळीव श्र्वानांसाठी रेबीज प्रतिबंधक लसीकरण, तणावमुक्त जीवनशैली, घरगुती पद्धतीने दुग्धजन्य पदार्थनिर्मिती, मुरघास निर्मिती, जलसंधारण व नैसर्गिक शेती इत्यादी विषयांवर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. तसेच या शिबिरामध्ये पाळीव पशुंसाठी मोफत पशुरोगनिदान व उपचार शिबीर आयोजित करण्यात आले.

या सात दिवसीय राष्ट्रीय सेवा योजना विशेष कार्यक्रम शिबीरादरम्यान विविध कार्यक्रम आयोजीत करण्यासाठी श्री. महादेव गोमारे, डॉ. अनिल पाटील, डॉ. सुरेश घोके, डॉ. गोपाल भारकड, डॉ. अशोक भोसले, डॉ. प्रफुल्ल पाटील, डॉ. प्रशांत मसारे, डॉ. मत्स्यगंधा पाटील, डॉ. संतोष चोपडे, डॉ. प्रवीण सावळे, डॉ. विवेक खंडाईत, डॉ. नरेंद्र खोडे, डॉ. शरद आव्हाड, डॉ. प्राजक्ता जाधव, डॉ. बालाजी कोंडरे व डॉ. अनिकेत नावकर तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. संभाजी चव्हाण यांनी महत्वपूर्ण योगदान दिले.

## अग्रलेख...

# जनगणना : वर्तमान आणि भविष्यासाठी..

कोणत्याही राष्ट्राची खरी संपत्ती म्हणजे त्या राष्ट्रातील नागरिक. देशाची ताकद, त्याच्या क्षमता आणि भविष्य नागरिकांवर अवलंबून असते. देश म्हणजे केवळ भौगोलिक सीमारेषा नसतात; तर त्या सीमांमध्ये जगणारी माणसं, त्यांच्या डोळ्यातील स्वप्नं, त्यांचा संघर्ष आणि भविष्याच्या दिशेने धावणाऱ्या कोट्यवधी आकांक्षा असतात. त्यामुळेच देशाची खरी ओळख त्याच्या लोकसंख्येत अर्थात नागरिकांच्या संख्येत आणि स्वरूपात दडलेली असते. खरे म्हणजे जनगणनेच्या माध्यमातून घेतलेली लोकसंख्येची नोंद म्हणजे त्या देशाच्या स्पंदनांची नोंद असते. जनगणना म्हणजे निव्वळ माणसांची मोजणी नसते; ती देशाच्या विकासाचा, बदलणाऱ्या सामाजिक संदर्भांचा आणि आर्थिक जडणघडणीचा जिवंत आरसा असते. त्यामुळे देशभरात आजपासून सुरू होत असलेली जागतिक पातळीवरील सर्वात मोठी जनगणनेची प्रक्रिया ही भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाची पायरी आहे.

जवळपास दीड दशकानंतर म्हणजे २०११ नंतर ही जनगणना होत आहे. २०२१ मध्ये नियोजित असलेली जनगणना कोरोनाच्या महामारीमुळे पुढे ढकलावी लागली. मागील १५ वर्षांच्या काळात देशात अनेक महत्त्वाचे बदल घडले. लोकसंख्येत वाढ झाली, शहरीकरणाचा वेग झपाट्याने वाढला, रोजगाराच्या संधींसाठी लोक गावाबाहेर पडले, प्रत्येकाच्या हातात सोशल मीडियामुळे माध्यम आलं, डिजिटल क्रांतीचा विस्तार झाला. अशा अनेक बदलांमुळे देशाचे सामाजिक आणि आर्थिक चित्र बरेच बदलले आहे. या नव्या सामाजिक आणि आर्थिक वास्तवाचे अचूक प्रतिबिंब जनगणनेतून आपल्याला मिळू शकेल. जनगणना म्हणजे प्रत्येक नागरिकांची माहिती संकलित करून देशाची खरी संख्यात्मक, सामाजिक आणि आर्थिक स्थिती जाणून घेण्याचा व्यापक आणि शास्त्रीय प्रयत्न असतो. यात वय, लिंग, शिक्षण, व्यवसाय, निवास, कौटुंबिक माहिती, स्थलांतर यांसारख्या अनेक गोष्टींचा समावेश असतो. त्यामुळे जनगणनेतून मिळणारी ही माहिती आकडेवारीहून अधिक काही सांगत असते. त्या विविध ठिकाणी जगत असलेल्या मानवी समुदायांच्या बोलक्या कथा असतात. या कथांमधून विकासाची, विषमतेची, प्रगतीची आणि आव्हानांची जाणीव देशाला होत असते. कोणत्याही राज्यकर्त्यांसाठी आणि प्रशासनासाठी जनगणना म्हणजे विकासाचे नियोजन करण्यासाठीचा मूलभूत पाया असतो. देशाची एकूण लोकसंख्या किती, ती कुठे आणि कशी विभागली गेली आहे, कोणत्या वयोगटातील लोक जास्त आहेत, शिक्षणाचे प्रमाण किती, रोजगाराची स्थिती काय, निवास कुठे अशा देशाच्या भविष्याला आकार देणाऱ्या अनेक प्रश्नांची उत्तरं जनगणनेतून मिळतात. बालकांच्या संख्येच्या प्रमाणात शाळा-दवाखाने, वृद्धांच्या संख्येनुसार आरोग्यसेवा आणि सामाजिक सुरक्षेवर काम करण्याची आवश्यकता असते. एखाद्या शहरात झपाट्याने लोकसंख्या वाढत असल्यास पायाभूत सुविधांवर ताण येतो. अशा वास्तव परिस्थितीचा योग्य अंदाज घेण्यासाठी जनगणना महत्त्वाची असते. याशिवाय, संसाधनांचे योग्य आणि न्याय्य वाटप करण्यासाठी जनगणना हा महत्त्वाचा आधार असतो.

देशातील पाणी, अन्न, वीज, निवारा यांसारखी संसाधने मर्यादित असतात. त्यामुळे ती कुठे आणि किती प्रमाणात द्यायची, याचा निर्णय जनगणना आकडेवारीच्या माध्यमातून घेता येतो. कोणत्या भागात कोणत्या सुविधांची कमतरता आहे, हे स्पष्ट होते. त्यामुळे विकासाच्या योजना अधिक परिणामकारक आणि समतोल पद्धतीने राबविता येतात. शहरी किंवा ग्रामीण भागातील नियोजन अधिक चांगल्या पद्धतीने आणि दूरदृष्टीने करता येते. समाजातील दुर्बल घटकांपर्यंत शासनाच्या योजना पोहोचविण्यासाठीही जनगणनेचा फायदा होतो. गरिबी, अशिक्षितता, बेरोजगारी, सामाजिक विषमता अशा समस्यांचे खरे स्वरूप समजून घेण्यासाठी जनगणनेची माहिती उपयोगी येते. या माहितीच्या आधारे सरकार विशेष योजना आखून त्या घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे जनगणना ही सामाजिक न्याय साध्य करण्यासाठीही आवश्यक असते. निवडणूक प्रक्रियेतही लोकसंख्येच्या आधारे मतदारसंघांची रचना आणि पुनर्रचना केली जाते. जनगणनेमुळे लोकसंख्येची वयोगटानुसार रचना, महिला-पुरुष प्रमाण, स्थलांतराचा कल आणि साक्षरतेचा दर स्पष्ट होतो.

यामुळे सरकारला सामाजिक सुरक्षा योजना, सार्वजनिक वाहतूक, ऊर्जा वापर तसेच पायाभूत सुविधांची उभारणी यासाठी योग्य दिशा मिळते. कृषी, उद्योग, अन्नसुरक्षा आणि पर्यावरण यांसारख्या क्षेत्रांतील बदलांचाही अभ्यास करता येतो.

आजच्या काळात 'डेटा' हा विकासाचा आधार बनला आहे. पण केवळ डेटा संकलित करणे पुरेसे नाही; तो समजून घेणे, त्याचे बारकाईने विश्लेषण करणे आणि त्यावर आधारित निर्णय घेणे अधिक महत्त्वाचे आहे. कोणतेही धोरण आखताना किंवा निर्णय घेताना अचूक आणि विश्वासार्ह माहिती गरजेची असते. जनगणना ही अशीच माहिती पुरविणारी सर्वात मोठी आणि व्यापक प्रक्रिया आहे. या माहितीच्या आधारेच प्रशासन अधिक पारदर्शक, जबाबदार आणि परिणामकारकपणे काम करू शकते. जनगणनेचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ती प्रत्येक नागरिकाच्या अस्तित्वाची अधिकृत नोंद करते. देशातील प्रत्येक व्यक्ती ही शासनाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे, याची जाणीव जनगणनेच्या माध्यमातून होते. त्यामुळे नागरिकांचा शासनावर विश्वास वाढतो. आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीनेही जनगणना उपयुक्त ठरते. पूर, दुष्काळ, भूकंप किंवा महामारी यांसारख्या संकटांच्या वेळी कोणत्या भागात किती लोक राहतात, त्यांची स्थिती काय आहे, याची माहिती असल्यास मदतकार्य अधिक जलद आणि प्रभावीपणे करता येते.

जनगणना ही केवळ सरकारी प्रक्रिया नव्हे. तीत सहभागी होणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. अनेक वेळा लोक माहिती देताना टाळाटाळ करतात किंवा चुकीची माहिती देतात. मात्र, असे केल्यास संपूर्ण आकडेवारीवर परिणाम होतो आणि त्याचा परिणाम विकास योजनांवर होऊ शकतो. त्यामुळे प्रत्येकाने प्रामाणिकपणे आणि सहकार्याच्या भावनेने जनगणनेत सहभाग नोंदविणे आवश्यक आहे. जनगणनेच्या प्रक्रियेत गोपनीयतेचाही आदर राखला जातो. नागरिकांनी दिलेली माहिती ही केवळ सांख्यिकीय वापरासाठीच असते; कुणाच्या वैयक्तिक वापरासाठी नसते. त्यामुळे नागरिकांनी कोणतीही भीती न बाळगता माहिती द्यायला हवी. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात भाषा, जात, धर्म, संस्कृती, जीवनशैली यातील विविधता समजून घेण्यासाठीही जनगणना मदत करते. कोणत्याही समाजाचा खरा चेहरा त्याच्या लोकसंख्येत दिसतो. त्यामुळेच जनगणना ही भूतकाळ, वर्तमानकाळ आणि आपल्या भविष्याला जोडणारी साखळी आहे. त्यातून आपल्याला कळते की, आपण कुठे होतो, सध्या कुठे आहोत आणि पुढे कुठे जाऊ शकतो. त्यामुळे ती केवळ एक शासकीय मोहीम नसून देशाच्या प्रवासाला दिशा देण्यासाठी आवश्यक अशी व्यापक प्रक्रिया आहे. आज सुरू होणारी ही जनगणना देशाला येणाऱ्या काळात देशाला नवी दिशा देईल. त्यातून विकासाला गती मिळेल आणि समतोल प्रगती नक्कीच साधली जाईल. जनगणनेतून केवळ वर्तमानच पुढे येत नाही, तर आपल्या भविष्याला आकारही दिला जात असतो. त्यामुळे वर्तमानासह भविष्यासाठीही ती गरजेची आहे आणि आपल्या साऱ्यांचे सहकार्यही तेवढेच आवश्यक आहे..

## विशेष


# नवे ऊर्जा धोरण 'गेमचेंजर' ठरणार!

प्रा. सुखदेव बखळे

भारताच्या ऊर्जा क्षेत्राला नव्या दिशेने नेण्याच्या उद्देशाने ऊर्जा मंत्रालयाने जाहीर केलेले राष्ट्रीय वीज धोरण हा एक महत्त्वपूर्ण आणि दूरदृष्टी असलेला दस्तावेज ठरणार आहे. 'विकसित भारत २०४७' या ध्येयाच्या पृष्ठभूमीवर तयार करण्यात आलेले हे धोरण अंतिम झाल्यानंतर २००५ मध्ये अधिसूचित करण्यात आलेल्या विद्यमान राष्ट्रीय वीज धोरणाची जागा घेणार आहे. एकेकाळी गंभीर मानली जाणारी वीजपुरवठ्याची समस्या मोठ्या प्रमाणावर सुटली असून देशातील जवळपास सर्व गावे आणि इच्छुक घरांपर्यंत वीज पोहोचविण्यात यश आले आहे. सार्वत्रिक विद्युतीकरणाचा हा टप्पा गाठल्यानंतर आता लक्ष गुणवत्ता, विश्वासार्हता आणि शाश्वततेकडे वळले आहे. या धोरणानुसार २०४७ पर्यंत देशातील एकूण वीज निर्मिती क्षमतेपैकी ८० टक्क्यांहून अधिक क्षमता जीवाश्म इंधनांवर अवलंबून नसलेल्या स्रोतांमधून येईल तसेच एकूण वीज उत्पादनापैकी सुमारे दोन-तृतीयांश वीज अशा स्वच्छ ऊर्जास्रोतांमधून निर्माण होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्याचबरोबर देशातील एकूण ऊर्जा वापरामध्ये विजेचा वाटा सध्याच्या तुलनेत दुप्पट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

या मसुदा धोरणात संसाधन पर्याप्ततेवर विशेष भर देण्यात आला आहे. या अंतर्गत वितरण कंपन्या आणि राज्यस्तरीय 'लोड डिस्पॅच' केंद्रे आपल्या पातळीवर संसाधन नियोजन करतील आणि त्यांना राज्य वीज नियामक आयोगांच्या नियमांचे मार्गदर्शन मिळेल. वीज वितरण क्षेत्रातील आर्थिक शाश्वततेचा प्रश्न हा या धोरणाचा गाभा मानला गेला आहे. अनेक राज्यांमध्ये वीज दर हे पुरवठ्याच्या खर्चापेक्षा कमी ठेवले जात असल्यामुळे महसुलात सातत्याने तूट निर्माण होत असून कर्जाचा बोजा वाढत आहे. या समस्येवर तोडगा म्हणून खर्चानुसार दरनिर्धारण, योग्य वेळी दरवाढीची अंमलबजावणी आणि तांत्रिक तसेच व्यापारी तोट्यांमध्ये कपात यावर भर देण्यात आला आहे. नियामकांकडून दर निर्धारणात विलंब झाल्यास स्वयंचलित दरवाढीची तरतूद करण्याचाही प्रस्ताव आहे. यामुळे वितरण कंपन्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्याचा प्रयत्न आहे.

नव्या धोरणात नूतनीकरणक्षम ऊर्जेला केंद्रस्थानी ठेवण्यात आले असून सौर आणि पवन ऊर्जेच्या वाढत्या वापरासोबत येणाऱ्या तांत्रिक आणि व्यवस्थापनाच्या आव्हानांवर उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत. ऊर्जा साठवण तंत्रज्ञानाचा वापर, बाजाराधारित यंत्रणा आणि पायाभूत सुविधांचे योग्य नियोजन याद्वारे वीज प्रणाली अधिक स्थिर आणि लवचीक करण्याचा प्रयत्न दिसून येतो. नूतनीकरणक्षम ऊर्जेच्या वाढत्या वापरामुळे निर्माण होणाऱ्या चढ-उतारांशी जुळवून घेण्यासाठी पारंपरिक वीज प्रकल्प अधिक लवचीक



बनवण्याची गरज अधोरेखित करण्यात आली आहे तसेच अशा प्रकल्पांचा वापर केवळ वीजनिर्मितीसाठीच नव्हे, तर औद्योगिक प्रक्रियांसाठीही करण्याच्या शक्यता तपासण्याचा प्रस्ताव आहे. आण्विक ऊर्जेच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर विस्ताराचे संकेत देण्यात आले आहेत. २०४७ पर्यंत आण्विक ऊर्जा निर्मितीचे १०० गीगावॉट क्षमतेचे लक्ष्य ठेवण्यात आले असून लहान आणि प्रगत अणुभट्ट्यांचा वापर वाढविण्यावर भर दिला आहे. औद्योगिक क्षेत्रालाही अणुऊर्जेचा वापर करण्याची परवानगी देण्याचा विचार या धोरणात मांडण्यात आला आहे. जलविद्युत क्षेत्राला यात धोरणात्मक महत्त्व देण्यात आले आहे. हवामान बदल आणि जलसुरक्षेच्या पृष्ठभूमीवर जलसाठा प्रकल्पांची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे. अशा प्रकल्पांमुळे पूरनियंत्रण, सिंचन आणि स्थिर वीजपुरवठा या तिन्ही बाबींमध्ये फायदा होऊ शकतो.

वीज बाजारपेठेच्या दृष्टीने अधिक पारदर्शक, स्पर्धात्मक आणि समावेशक व्यवस्था निर्माण करण्यावर भर देण्यात आला आहे. लहान उत्पादकांना संधी देणे, करार प्रक्रियेचे सुलभीकरण आणि बाजारावर प्रभाव टाकणाऱ्या घटकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी मजबूत यंत्रणा उभारण्याचे उद्दिष्ट या धोरणातून दिसून येते. प्रसारण यंत्रणेच्या बळकटीकरणासाठी दीर्घकालीन नियोजनाची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली असून 'सेंट्रल इलेक्ट्रिसिटी ऑथॉरिटी'ला यासाठी पाच आणि दहा वर्षांचे आराखडे तयार करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. वाढत्या नूतनीकरणक्षम ऊर्जेच्या समावेशासाठी आणि मुक्त प्रवेश प्रणालीला चालना देण्यासाठी मजबूत प्रसारण नेटवर्क आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. ग्रीड व्यवस्थापनात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, ऊर्जा साठवण प्रणालींचा समावेश आणि संस्थात्मक सुधारणा याद्वारे वीज प्रणाली अधिक कार्यक्षम करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. याचबरोबर सायबर सुरक्षेलाही विशेष महत्त्व देण्यात आले असून वीज क्षेत्रातील सर्व माहिती देशातच साठवण्याची सक्ती आणि सायबर हल्ल्यांना तोंड देण्यासाठी सक्षम यंत्रणा उभारण्यावर भर हे उपाय योजण्यात आले आहेत. डेटा शेअरिंगला प्रोत्साहन देऊन नवोन्मेष आणि तंत्रज्ञानाधारित उपायांना चालना देण्याचा प्रयत्नही या धोरणात दिसून येतो.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल साधनांचा वापर करून वीज क्षेत्र अधिक सक्षम आणि कार्यक्षम बनविण्याचा स्पष्ट प्रयत्न या मसुद्यातून जाणवतो. एकूणच राष्ट्रीय वीज धोरण भारताच्या ऊर्जा क्षेत्राला अधिक स्वच्छ, सक्षम, तांत्रिकदृष्ट्या प्रगत आणि बाजारकेंद्रित बनविण्याचा व्यापक आराखडा मांडते; मात्र या धोरणाचा खरा कस लागणार तो त्याच्या अंमलबजावणीत. राज्य सरकारे आणि वीज वितरण कंपन्या या धोरणातील तरतुदी प्रभावीपणे राबवू शकतील का आणि त्यातून सेवा गुणवत्तेत तसेच आर्थिक स्थितीत अपेक्षित सुधारणा घडवून आणू शकतील का, हेच आगामी काळात निर्णायक ठरणार आहे. गेल्या दोन दशकांमध्ये भारताने वीज क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. एकेकाळी अंधारात असलेली गावे आता उजळली आहेत. उद्योगधंद्यांना सातत्यपूर्ण वीजपुरवठा मिळू लागला असून ऊर्जा ही विकासासाठी महत्त्वाची गरज बनली आहे. तथापि, या यशामागे काही गंभीर समस्या दडलेल्या आहेत. वितरण कंपन्यांचे वाढते कर्ज, अपुरे दरनिर्धारण, वीज चोरी आणि तांत्रिक तोटे या समस्यांनी संपूर्ण व्यवस्थेला आर्थिकदृष्ट्या कमकुवत केले आहे. त्यामुळेच नव्या धोरणात आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि कार्यक्षमतेवर विशेष भर देण्यात आला आहे. या धोरणातील सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे ऊर्जा स्रोतांबाबतचा दृष्टिकोन. पारंपरिकरीत्या भारताची वीज निर्मिती मोठ्या प्रमाणावर कोळसा आणि इतर जीवाश्म इंधनांवर आधारित होती; परंतु हवामान बदलाच्या वाढत्या संकटाच्या पृष्ठभूमीवर आणि आंतरराष्ट्रीय बांधिलकी लक्षात घेता आता या अवलंबित्वात मोठी घट करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

आगामी काळात सौर, पवन, जल आणि अणुऊर्जा यांसारख्या स्वच्छ स्रोतांचा वापर झपाट्याने वाढवण्याचा मानस या धोरणातून स्पष्ट होतो. जीवाश्म इंधनावर आधारित पारंपरिक वीज प्रकल्प पूर्णपणे बंद होणार नाहीत; पण त्यांची भूमिका बदलणार आहे. भविष्यात हे प्रकल्प 'बेसलोड' पुरवठादार न राहता 'बॅकअप' आणि 'ग्रीड स्थिरता' राखण्यासाठी वापरले जातील. यामुळे नूतनीकरणक्षम ऊर्जेतील चढउतार सांभाळणे शक्य होईल. याचबरोबर या प्रकल्पांचा अधिक कार्यक्षम वापर करण्यासाठी लवचीक बनवण्यावर भर दिला जात आहे. त्यातूनच औद्योगिक प्रक्रियांसाठी उष्णतेचा वापर कवा शीतकरणासाठी वाफेचा उपयोग करण्यासारखे पर्याय पुढे येऊ शकतात.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

विजय निचकवडे

# अखाद्य वनस्पतींचे जंगलातील वास्तव!

आम्ही काल्पनिक जगात अधिक रमतो. म्हणून तर असं केलं तर तसं होईल आणि आपला हेतू साध्य होईल, यावर आमचा दृढ विश्वास असतो. पण खरंच आपण जे करायचं, त्यावर लक्ष केंद्रित करून काम करतो का हो? हे एवढ्यासाठीच म्हणावसं वाटतं, कारण मानव आणि हिंस्र प्राणी संघर्ष हे न सुटलेले कोडे असल्यागत चर्चेची गुऱ्हाळे रंगतात आणि त्या मंथनातून निघतो, तो कोंबड्या, बकऱ्या सोडण्याचा सार! हे किती वास्तवाशी सुसंगत हा प्रश्नच आहे. पण या मंथनात जंगलातील अखाद्य वनस्पतींमुळे खंडीत होत चाललेली अन्न साखळी आणि त्याचे दुष्परिणाम यांना जागा नसेल तर वन आणि व्याघ्र संवर्धन न संपणाराच विषय आहे.

वास्तवाची जाणीव ठेवून केलेल्या कार्याच्या सफलतेचे प्रमाण नक्कीच चार भिंतींच्या आड बसून केलेल्या नियोजनापेक्षा अधिकच असते. आमच्या बाबतीतील अनेक गोष्टींचे नियोजन दूर कुठेतरी बसलेले प्रशासनातील अधिकारी करतात. लोकप्रतिनिधी, राज्यकर्त्यांचा त्याला दुजोरा असतो आणि मग कागदे रंगविली जातात. मानव आणि जंगलातील हिंस्र प्राणी हा संघर्ष वर्षानुवर्ष चालत आलेला विषय आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत जंगलाच्या बाहेर न भटकणारा प्राणी आता थेट गावात काय, लोकांच्या स्वयंपाकघरापर्यंत पोहोचला आहे. बिबट गावात आल्याच्या आणि वाघाने शेतात येऊन मानवाचा बळी घेतल्याच्या घटना नवीन नाहीत. मग आम्ही अनेक वर्षांपासून हा संघर्ष संपावा म्हणून रंगविलेल्या कागदांचे काय? त्याचे निघालेले फलित काय, असा प्रश्न उपस्थित केला गेला तर उत्तर शून्यच म्हणावे लागेल. आठवडाभरात दोन घटना घडल्या. यात एकाचा जीव गेला. एक महिला मृत्यूशी झुंज देत आहे. त्यांचा दोष काय तर ते शेतात काम करीत होते. तिथे वाघोबा आले आणि हल्ला केला? वाघ गावाकडे का आला किंवा येतो, याची अनेक कारणे असतील. ती शोधून त्यावर उपाययोजनाही होतात. म्हणून बिबट, वाघ जंगलाच राहावे म्हणून बकऱ्या जंगलात सोडण्याची कल्पना आमच्या मंत्रिमहोदयांच्या डोक्यात येते आणि त्यावर चर्चाही रंगतात. हे किती वास्तवाला धरून परिस्थिती सापेक्ष आहे, हे यासाठी आपल्या कल्पनेचा विस्तार करणाऱ्यांनाच माहीत. पण कधी वस्तुस्थितीचा विचार नियोजन करताना होतो का हो?

जंगलात एक अन्न साखळी असते. तृणभक्षी प्राणी म्हणजे हरीण, सांबार, नीलगाय, गवा हे जंगलात वाढणारे गवत म्हणजेच तृण खाऊन जागतात. त्यांची शिकार करून वाघ, बिबट यासारखे हिंस्र प्राणी आपली उपजीविका चालवितात. आज नवेगाव, नागझिरा, ताडोबा या राष्ट्रीय दर्जाच्या व्याघ्र प्रकल्पांची अवस्था काय? खरंच तेथे तृणभक्षी प्राण्यांसाठी अन्न शिल्लक आहे का? आज शाकाहारी प्राण्यांसाठीच्या गवताची जागा अखाद्य वनस्पतींनी घेतली. ताडोबात लॅटोना कॅमेरा, युपॅरोशियम अशा अखाद्य विषारी वनस्पती फोफावल्या. नवेगाव-नागझिरा प्रकल्पात रान तुळस, महाडोर, तरोटा यांनी आपले अस्तित्व निर्माण करून तृणाला हद्दपार केले. कधीकाळी १० ते १२ टक्के असलेल्या या वनस्पतींनी आपले साम्राज्य एवढे वाढविले की, आज व्याघ्र प्रकल्पाचा ६० ते ७० टक्के भाग याच वनस्पतींनी काबीज केला. परिणामी तृणभक्षींचे अन्न संपले आणि तृणभक्षी प्राणीही! गवत नसल्याने त्याचे दुष्परिणाम शाकाहारी प्राण्यांवर झाले. त्यांची संख्या कमी झाली. परिणामी वाघ-बिबटच्या अन्नाचा प्रश्न निर्माण होऊन नाईलाजाने हे प्राणी पाळीव असलेल्या गाय-म्हैस या गावातील प्राण्यांकडे आणि मानवावर हल्ला करण्याकडे वळले. अन्न साखळी विस्कळीत झाली आणि पर्यावरणाचे चक्रही फिरले. भारतातील अनेक व्याघ्र प्रकल्पांमध्ये या अखाद्य वनस्पतींनी वाढविलेला व्याप आज व्याघ्र आणि वनसंवर्धनासाठी धोक्याची घंटा ठरत आहे. अशा अखाद्य वनस्पती नवेगाव-नागझिरा प्रकल्पातून समूळ नष्ट करण्याची मागणी काही वर्षांपूर्वी केली खरी; पण हजारो किलोमीटर दूर, चार भिंतीत बसलेल्या प्रशासनातील अधिकाऱ्यांना तो विषय निरर्थक वाटला असावा. मात्र आज जेव्हा एका व्याघ्र प्रकल्पातून नागझिरा अभयारण्यात ५०० हरीण आणण्याचा निर्णय घेतला गेला, तेव्हा त्याचे महत्त्व नक्कीच पटले असावे! अखाद्य वनस्पतीमुळे तृणभक्षींना मिळणारे पोषक मूल्य संपले. अशा वनस्पतींची घनता वाढल्याने जंगलात प्राण्यांच्या अधिवासाचा प्रश्न उपस्थित झाला. ज्यांचा काहीच उपयोग नाही, अशा वनस्पतीला आम्ही गोंजारत असताना दुसरीकडे मात्र आमची जैवविविधता नष्ट होण्याच्या दिशेने वाटचाल सुरू झाली आहे. विचारांचे स्वातंत्र्य आम्हाला आहे. यातूनच नवनवीन कल्पना उदयास येतात. हे करताना अनेक समस्यांचे मूळ काय? याचेही मंथन होणे गरजेचे आहे. नाहीतरी भविष्यात आम्हाला अखाद्य वनस्पतीच्या जंगलात जंगल पर्यटन करण्याची वेळ येईल आणि प्राण्यांसाठी गावाच्या शेजारी निवारे उभे करावे लागतील.

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# श्रीमद्भागवत महापुराण


प्रा. दिलीप जोशी

भारतीय वाङ्मयाचा मुकुटमणी म्हणजे श्रीमद्भागवत महापुराण होय. भक्ती, ज्ञान आणि वैराग्याची सुंदर गुंफण म्हणजे भागवत पुराण आहे. याशिवाय सर्व शास्त्र, साहित्य, व्याकरण, कला, काव्य याचा एकत्रित सागर म्हणजे भागवत होय. 'विद्यावतां भागवते परीक्षा' असे उगाच म्हटले नाही.

हे पुराण साक्षात विष्णूंनी ब्रह्मदेवांना, ब्रह्मदेवांनी देवर्षी नारदांना, नारदांनी महर्षी व्यासांना सांगितले. व्यासांनी त्याची रचना केली. १२ स्कंध म्हणजे भाग, ३२५ अध्याय आणि १८ हजार श्लोक असलेले हे भागवत पुराण व्यासांनी आपला पुत्र शुक महामुनींना सांगितले. शुकदेवांनी हे पुराण मुख्यतः मृत्यूच्या दारात असलेल्या परीक्षित राजांना सांगितले. म्हणूनच जगावे कसे? हे गीता सांगते आणि मरावे कसे? हे भागवत सांगते. 'गीता भागवत करिती श्रवण, अखंड चिंतन विठोबाचे !' हे जीवनाचे सूत्र असावे.

भागवत महापुराणातील दशम स्कंध भागवताचा प्राण आहे. या स्कंधात भगवान श्रीकृष्णाच्या लीला वर्णन आहे. प्रथम स्कंधात भागवत माहात्म्य आणि भक्तीचा महिमा दिला आहे. परीक्षिताचा जन्म, त्यांचा दिग्विजय आणि त्यांना श्रृंगी ऋषींचा शाप असा कथाभाग आहे. दुसऱ्या स्कंधात ब्रह्मांड उत्पत्ती, विराट स्वरूप, राजा परीक्षिताचे विविध प्रश्न आणि शुकाचार्यांचा कथारंभ दिला आहे. तृतीय स्कंधात उद्धवांनी केलेले भगवंतांचे बाललीला वर्णन, वराह अवतार कथा, हिरण्यकश्यपू, हिरण्याक्ष कथाभाग इत्यादी दिले आहे. चतुर्थ स्कंधात दक्ष यज्ञ, सती कथा, ध्रुव चरित्र, पृथु चरित्र, राजा पुरंजन उपाख्यान दिले आहे. पंचम स्कंधात भरत चरित्र, सागर, पर्वत, नदी, पाताळ, नरक यांची स्थिती दिली आहे. सहाव्या स्कंधात आजामेळ उपाख्यान, दधीची ऋषी आणि वृत्रासुर कथा, देवता, मनुष्य, पशू, पक्षी यांची जन्मकथा आहे.

सातव्या स्कंधात हिरण्याक्ष, हिरण्यकश्यपू वध, प्रल्हाद चरित्र दिले आहे.



आठव्या स्कंधात मन्वंतर कथा, गजेंद्र मोक्ष, समुद्रमंथन, हलाहल प्राशन, मोहिनी रूप, वामन अवतार प्रयोजन दिले आहे. नवम स्कंधात च्यवन, अंबरीश, इक्ष्वाकू, चंद्रवंश, ययाती अशा विविध राजवंशाचे चरित्र दिले आहे. दशम स्कंध महत्त्वाचा असून भगवान पूर्णपूर्णावतार योगेश्वर श्रीकृष्णाचे यथासांग चरित्र दिले आहे. एकादश स्कंधात मुख्यतः यदुवंश संहार दिला आहे.

बाराव्या स्कंधात विभिन्न युगांचे वर्णन, चार प्रकारचे प्रलय, मार्कंडेय कथा, भगवंताचे अंग, उपांग, आयुधांचे रहस्य आणि अखेर श्रीमद्भागवताची महिमा दिली आहे. स्वत: वेदव्यासांनी या पुराणाचे माहात्म्य सांगताना-

'इदं भागवतं नाम पुराणं ब्रह्मसम्मितम् ।
उत्तमश्लोकचरितं चकार भगवानृषिः ॥

या पुराणाला वेदाचा दर्जा देऊन भगवंताच्या चरित्राने परिपूर्ण म्हटले आहे.

'सर्ववेदेतिहासानां सारं सारं समुद्धृतम् ।
स तु संश्रावयामास महाराजं परीक्षितम् ॥

शुकदेवांनी राजा परीक्षिताला सर्व वेद आणि आपला इतिहास कथन केला आहे. जेव्हा कथेला सुरुवात होणार होती तेव्हा सर्व देवता अमृत कुंभ घेऊन शुकदेवांजवळ आल्या आणि म्हणाल्या, हा अमृतकुंभ घेऊन राजा परीक्षिताला द्या आणि भागवत कथा आम्हाला सांगा. तेव्हा ते देवांना म्हणाले, अहो! कुठे कथा आणि कुठे अमृत? चिंतामणी आणि काचेच्या मण्यांची तुलना होईल का? भागवत कथा म्हणजे चिंतामणी आणि अमृत म्हणजे काचमणी. स्वयं भगवान विष्णु ब्रह्मदेवांना सांगतात-

'यः पठेत् प्रयतो नित्यं, श्लोक भागवतं सुत ।
अष्टादशपुराणानां फलमाप्नोति मानवः ।'

प्रतिदिन एक श्लोक वाचला तरी १८ पुराणांचे फळ मिळते. एकेक अक्षर कपिला गाय दानाचे पुण्य मिळते. अर्धा श्लोक एक सहस्र गोदानाचे पुण्य देते.

'जन्माद्यस्य यतोऽन्वयादितरतश्चार्थेष्वभिज्ञः स्वराट्
तेने ब्रह्म हृदा य आदिकवये मुह्यन्ति यत्सूरयः।
तेजोवारिमृदां यथा विनिमयो यत्र त्रिसर्गोऽमृषा
धाम्ना स्वेन सदा निरस्तकुहकं सत्यं परं धीमहि ॥'

भागवत पुराणाचा प्रारंभीचा हा श्लोक परम् सत्य असलेल्या परब्रह्म परमात्म्याचे ध्यान करतो.

'नामसंकीर्तनं यस्य सर्वपापप्रणाशनम् ।
प्रणामो दुःखशमनस्तं नमामि हरिं परम् ॥'

भागवत महापुराणाचा समारोपीय असलेल्या या श्लोकातून त्या परम् सत्यस्वरूपाला श्रीहरी संबोधून नमन केले आहे. भागवतातील नारायण कवच सर्व विघ्न हरण करणारे, सर्वत्र विजय, आरोग्य आणि ऐश्वर्य देणारे आहे. यात दिलेले पुंसवन व्रत मनोकामना पूर्तीसाठी, गजेंद्र स्तवन ऋणमुक्ती, पयोव्रत संतानप्राप्तीसाठी दिले आहे. भागवत महापुराण अद्भुत, अलौकिक आणि अवर्णनीय प्रासादिक ग्रंथ आहे. अभ्यासकांसाठी अभ्यास ग्रंथ, उपासकांसाठी उपास्य ग्रंथ, भक्तांसाठी भक्तिरससुधा आहे.

थोडक्यात श्रीमद्भागवत महापुराण साक्षात श्रीविष्णुस्वरूप असून ज्याच्या पठन अथवा श्रावणाने चारही मुक्ती साधण्याचा मार्ग प्रशस्त होतो. शांती, भक्ती, द्वैताद्वैत, सकाम निष्काम कर्म, साध्य, साधन आणि सिद्ध ज्ञान, प्रेमा भक्ती याचे रहस्य कळते. थोडक्यात ऐहिक आणि पारलौकिक ऐश्वर्य देणारा अद्वितीय ग्रंथ म्हणजे श्री भागवत पुराण होय.

९८२२२६२७३५

## आयुर्वेद, अध्यात्म आणि हनुमंताचा आदर्श

आत्ताची युद्धजन्य परिस्थिती पाहता समाजात सर्वांच्याच मनाचे मानसिक स्वास्थ ढासळलेले आहे. आधुनिक विज्ञान युगात आपण ॲलोपॅथीवर भर देतो. कारण त्याने आपल्याला तत्काळ बरे वाटते. त्यामुळे आयुर्वेद व अध्यात्म दोन्हीही आत्मसात करण्याची गरज आहे. आपल्याला हनुमंतांनी संजीवनीच्या माध्यमातून आयुर्वेदाचे महत्त्व स्पष्ट करून सांगितले आहे. आत्ताची परिस्थिती पाहता, आपणही आवश्यक अशा आयुर्वेदिक वनस्पती घरी लावून त्याचा उपयोग करून घेऊ शकतो. उदा. अडुळसा, पुदिना, तुळस, कोरफड, गवती चहा, आलं, हळद यांसारख्या वनस्पती आपण सहज घरी लावू शकतो. या वनस्पती केवळ औषधी गुणांनी समृद्ध नसून आपले आरोग्य नैसर्गिक पद्धतीने टिकवून ठेवण्यास मदत करतात. चैत्र पौर्णिमा म्हणजे हनुमान जयंती. रामायणातील एक प्रसंग आहे- रावणाशी युद्ध सुरू असताना मेघनादाने लक्ष्मणावर लक्ष केंद्रित करून त्यांच्या हृदयावर बाण चालवला व लक्ष्मण मूर्च्छित झाले. रामचंद्र दुःखी झाले. तेव्हा सुशेण वैद्य समोर आले व म्हणाले, 'रामा, चिंता करू नको. आपल्याकडे संजीवनी बुटी ही वनस्पती आहे; पण ती खूप दूर आहे. सूर्योदयाच्या आधी द्रोणागिरी पर्वतावर जाऊन ती आणली, तरच लक्ष्मणाचे प्राण वाचू शकतील.' जवळच उभे असलेले हनुमान पुढे आले. ते प्रभू रामचंद्रांसमोर उभे राहून म्हणाले, 'प्रभू, मला आज्ञा द्यावी.' आज्ञा घेऊन 'जय श्रीराम' म्हणत ते द्रोणागिरी पर्वताकडे उड्डाण केले. पर्वतावर अनेक दिव्य वनस्पती असल्यामुळे संजीवनी बुटी कोणती, हे हनुमंताला कळेना; तेव्हा त्यांनी संपूर्ण पर्वतच उचलून सुशेण वैद्यांकडे आणला. सुशेण वैद्यांनी संजीवनी बुटीचा लेप लक्ष्मणाला लावला व काही क्षणांतच लक्ष्मण उठून बसले. तेव्हा या हनुमान जयंतीला आपण प्रार्थना करूया... 'हे हनुमंता, तुझ्यासारखी दास्यभावना, तत्परता, समयसूचकता व शक्ती आम्हाला प्राप्त होऊ दे. आम्ही घेत असलेल्या आयुर्वेदिक औषधांना गुण येऊ दे आणि या युद्धजन्य परिस्थितीत, आपत्कालात आम्हाला योग्यरीत्या लढा देऊन आमचा विजय होऊ दे.'

**रमा देशमुख**

## वाचक पत्रे

### निसर्ग हाच मानवाचा तारणहार

राज्यातील संपत चाललेले कोळशाचे साठे, सर्वत्र चालू असलेली बेसुमार जंगलतोड, भूगर्भातील पाणी, बेसुमार नाना प्रकारची प्रदूषणे, जागतिक वाढते तापमान बदल हे सर्व पाहता पर्यावरणाच्या बाबतीत गेल्या २०-२५ वर्षांचा आढावा किंवा अभ्यास लक्षात घेतला तर मानवाच्या निसर्गातील अति हस्तक्षेपामुळे आज आपण विनाशाच्या पार उंबरठ्यावर येऊन ठेपलो आहोत. निसर्ग व पर्यावरण हाच मानवी जीवनाचा खरा आधार आहे. उद्या निसर्गच नष्ट झाला तर जीवन तरी कुठे? आणि कस असणार. जीवसृष्टीचा वापर नीट व्यवस्थित हवा असेल तर निसर्ग व मानव यांचे एकमेकाशी असलेले परस्पर संबंध विचारात घेणे महत्त्वाचे आहे. करोडो वर्ष तो मानव जातीला देतच आला. यापुढेही देतच राहील या सर्व गोष्टींचा विचार करणे खूप गरजेचे आहे. निसर्गच हा मानवाचा तारणहार आहे, याचा विसर पडत चालला आहे का? आता प्रश्न आहे तो निसर्गाने तरी अजून द्यायचे किती? आणि आपण ओंजळीत घ्यायचे किती?

**लोकेश बापट**/पुणे

### वैचारिक प्रदूषण

आजकाल आपल्याच समाजात राहून आपल्याच सण-परंपरांना 'अंधश्रद्धा' किंवा 'पर्यावरणपूरक नाही' असे ठरवणारा एक वर्ग निर्माण झाला आहे. यांना आपण 'अर्बन नक्षली' म्हणतो. हे लोक जाणीवपूर्वक हिंदू धर्मातील त्रुटी शोधून त्यावर प्रहार करतात, पण अन्य धर्मीयांच्या बाबतीत मात्र हेच लोक 'पुरोगामी' राहतात. दुसरीकडे 'पाकिस्तान जिंदाबाद'च्या घोषणा दिल्या जातात, पण हे बुद्धिवंत चकार शब्दही काढत नाहीत. हा एक प्रकारचा वैचारिक नक्षलवाद आहे. या वैचारिक प्रदूषणापासून वाचण्यासाठी आणि आपल्या धर्माचे खरे स्वरूप समजून घेण्यासाठी जनजागृतीची नितांत गरज आहे. याचसाठी हडपसर येथे ५ एप्रिलला हिंदू धर्मजागृती सभा होत आहे. वैचारिक लढाई जिंकण्यासाठी आणि आपली संस्कृती जपण्यासाठी या सभेला उपस्थित राहणे, हे प्रत्येक हिंदूचे कर्तव्य आहे.

**अपर्णा जगताप**/पुणे

### पाईप गॅसचे दर कमी करावेत

पाईपद्वारे गॅसचा पुरवठा करा असे राज्याचे मंत्री उदय सामंत यांनी गॅस कंपन्यांना आदेश दिले आहेत. पाईप गॅसपेक्षा सिलेंडरचा गॅस स्वस्त आहे. म्हणूनच गृह रचना सोसायट्या तसेच उद्योजक पाईप गॅस घेण्याचे टाळत आहेत. खरे तर पाईप गॅस सिलेंडरपेक्षा बराच स्वस्त मिळणे गरजेचे आहे. पाईप गॅसमध्ये सिलेंडर भरण्याचा, वाहतुकीचा, वितरक नेमण्याचा आणि त्याचे कमिशन, ग्राहकाचे घरी नेऊन सिलेंडर देण्याचा तसेच ग्राहकाला अनामत रक्कम आदी खर्च करावा लागत नाही. शासनाने गॅस कंपन्यांना पाईप गॅस स्वस्तात उपलब्ध करून देण्याचे आदेश द्यावेत.

**ॲड. बळवंत रानडे**/पुणे ९८८१४७३५८०

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# माजलगावात महावीर जन्म कल्याणक महोत्सव साजरा



तभा. वृत्तसेवा

**माजलगाव, प्रतिनिधी** | माजलगाव शहरात भगवान महावीरांचा जन्म कल्याणक महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प.पू.आचार्य मुनी श्री पवित्रसागरजी महाराज व मुनी श्री प्रशांतसागरजी महाराज यांची विशेष उपस्थिती लाभली.

महोत्सवानिमित्त शहरातील झेंडा चौक येथील जैन मंदिरातून सकाळी ९ वाजता भव्य मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली. ही मिरवणूक डॉ. आंबेडकर चौक, शिवाजी महाराज चौक मार्गे पुढे जात राजस्थानी मंगल कार्यालय येथे विसर्जित झाली. मिरवणुकीत भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत भगवान महावीरांच्या जयघोषाने वातावरण भक्तिमय केले.

यावेळी मुनी श्री पवित्रसागरजी महाराज यांनी जैन धर्म व भगवान महावीरांच्या शिकवणीवर मार्गदर्शनपर प्रवचन देत अहिंसा, सत्य आणि संयम या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमादरम्यान समाजातील चिमुकल्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच जन्मकल्याणक महोत्सवानिमित्त माजलगाव ब्लड सेंटर यांच्यावतीने रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते, ज्याला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी परिश्रम घेतले.

# उष्मघातापासून बचाव, लक्षणे आणि उपाययोजना

तभा. वृत्तसेवा

**बीड,दि,०१** | येणाऱ्या काही दिवसामध्ये आपल्या भागात उष्णतेची लाट जाणवू शकते, उष्मघात होऊ नये यासाठी नागरिकांनी प्रतिबंधात्मक उपायांवर भर द्यावा उष्माघाताची लक्षणे आढळून झाल्यास तातडीने रुग्णाच्या शरीराचे तापमान खाली आणण्यासाठी जवळच्या रुग्णालयात उपचार करुन घ्यावा.

या उष्णतेच्या काळात उष्माघात होऊ नये. यासाठी नागरिकांनी प्रतिबंधात्मक उपायांवर भर देणे गरजेचे आहे. उष्मघात उपचारासाठी शासकीय रुग्णालयांत सज्जता ठेवण्यात यावी अशा सूचना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिल्या आहेत. उष्मघात होण्याची कारणे साधारणत: पुढील आहेत. यात उन्हामध्ये शारिरीक श्रमाचे, मजूरीचे कामे फार वेळ करणे, कारखान्याचे बॉयलर रुममध्ये काम करणे, काच कारखान्यातील काम करणे, जास्त तापमानाच्या खोलीत काम करणे, घट्ट कपड्यांचा वापर करणे, उष्णतेशी अथवा तापमानातील वाढत्या परिस्थितीशी सतत संबध येणे. उष्मघाताची लक्षणे जाणवू लागल्यास तातडीने रुग्णाच्या शरीराचे तापमान खाली आणण्यासाठी जवळच्या रुग्णालयात उपचार करुन घ्यावेत. यासाठी उष्माघात उपचारांसाठी शासकीय रुग्णालयात सज्जता ठेवण्यात यावी.

# भाजपाची एसआयआर साठी तगडी फिल्डिंग

## गेवराई तालुक्यात पून्हा भाजपाचा आमदार होईल : भाजपा नेते सुनिल राणे

### गेवराईत बुथ प्रमुखांची बैठक

तभा. वृत्तसेवा

**गेवराई दि. ३१** | मतदार शुद्धीकरणाची मोहीम कोणत्याही पक्षाची नाही तर, ती आपल्या देशासाठी असून, सर्व मतदार याद्यांच्या शुद्धीकरणाची मोहीम काळाची गरज असून, गेवराई मतदारसंघात भारतीय जनता पक्षाला स्वतःच्या स्वकर्तृत्वावर जिंकायचे असेल तर, भाजपाचा प्रत्येक कार्यकर्ता सक्रिय झालाच पाहिजे. तरच, गेवराई मतदारसंघात पून्हा भारतीय जनता पक्षाचाच आमदार होईल. त्यासाठी, बुथ प्रमुखांनी, पक्षाच्या कार्यकर्त्यांनी एसआयआर चे काम प्रमाणीकपणे करावे, असे आवाहन भारतीय जनता पक्षाचे राज्य सरचिटणीस माजी आमदार सुनिल राणे यांनी येथे बोलताना केले आहे.



गेवराई येथील भारतीय जनता पक्षाच्या संपर्क कार्यालयात, मंगळवार ता. ३१ रोजी भारतीय जनता पार्टी २२८ - गेवराई विधानसभा एसआयआर बुथ प्रमुख मार्गदर्शन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर शंकरराव देशमुख, युवा नेते बाळराजे पवार, जिपचे माजी सभापती युद्धाजीत पंडित, विधानसभा समन्वयक श्रीकांत सानप, ॲड. रासकर, नवनाथ शिराळे, सुरवसे काका, रोहित पंडित, शिवराज पवार, यशराज पंडित, नपचे उपाध्यक्ष ॲड. घुंबार्डे, ॲड. सुरेश हाते, पीटी चव्हाण, बाबा पिसाळ, सचिन दाभाडे यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना राणे म्हणाले की, गेवराई तालुक्यातील बोगस मतदान आणि मतदार शोधून काढण्याची जबाबदारी आपली आहे. ही छोटी गोष्ट नाही. हे काम देशासाठी करायचे आहे. कारण,

मेलेली माणसे मतदानाच्या दिवशी जिवंत होतात, हे वास्तव चित्र मुंबई विधानसभा निवडणुकीत दिसून आले होते. देशातल्या बिहार, बंगाल सारख्या राज्यात ही दुबार आणि बोगस मतदार सापडले होते. ही बाब गंभीर आहे. याकडे, आपण सर्वांनी लक्ष दिले पाहिजे. मतदार यादीचे शुद्धीकरण म्हणजे एसआयआर आहे. देशात या आधी सुद्धा हे काम झाले होते. मात्र, मतदार याद्यांमध्ये असंख्य चुका आजही आहेत. अनेक ठिकाणी वीस लाखाच्या वर मतदार बोगस आणि दुबार सापडले होते. असे निरिक्षण ही राणे यांनी नोंदविले. बीड जिल्ह्यात आल्याचा आनंद व्यक्त करून, जुन्या आठवणींना उजाळा देत, स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या मेहनतीने पक्ष वाढल्याचे, राणे यांनी सांगितले. एसआयआर साठी, गेवराई समन्वयक माजी नगरसेवक भरत गायकवाड यांनी बुथ प्रमुखाच्या माध्यमातून गेवराई मतदार संघात चांगले काम केल्याचे सांगून, त्यांचे कौतुक केले. एसआयआर योजना कोणत्याही पक्षाची नाही तर, ती आपल्या देशासाठी असून, मतदार याद्यांचे शुद्धीकरणाची मोहीम आवश्यक असून, गेवराई मतदारसंघात भारतीय जनता पक्षाला स्वतःच्या स्वकर्तृत्वावर जिंकायचे असेल तर, भाजपाच्या प्रत्येक कार्यकर्त्यांवर सक्रिय होण्याची जबाबदारी आहे. गेवराई मतदारसंघात पून्हा भारतीय जनता पक्षाचाच आमदार होईल. त्यासाठी, एसआयआर चे काम प्रमाणीकपणे करा, असे आवाहन ही शेवटी राज्य सरचिटणीस माजी आमदार सुनिल राणे यांनी केले आहे. यावेळी यावेळी

बाळासाहेब सानप, ज्ञानेश्वर भाले, पी.टी. माजी नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, एजाज भाई मेंबर, अमन सुतार, सभापती शाहेदाद भाई, यशराज पंडित, श्रीकांत सानप, शिनुभाऊ बेद्रे, ब्रह्मदेव धुरंधरे, संजय आंधळे सर, बद्दुशेठ, सभापती महेश सौंदरमल, किशोर धोंडलकर, श्याम कुंड, अशोक थोरत, तालेब हरबट, नवनाथ धुरंधरे,

मुश्ताक कुरेशी, खदीर बागवान, मुन्नाशेट, पांडुरंग थडके, संदीप लगड, संजय जाधव, राजाभाऊ आर्दड, शेख युनूस, युनूस कुरेशी, रामनाथ दाभाडे, साईनाथ सुरवसे, शेख महमंद, राजेश टाक, अनवर पठाण, माऊली वादे, जगन पवार, अमोल एम सुतार , यांच्यासह तालुक्यातील सर्व बुथ प्रमुखांची उपस्थिती होती. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, बाळराजे पवार, माजी सभापती युद्धाजीत पंडित, श्रीकांत सानप यांची मार्गदर्शनपर भाषण झाली. सूत्रसंचालन पत्रकार सुशिल टकले यांनी केले. नपचे आभार गटनेते ॲड. राजेंद्र राक्षसभुवनकर यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.

# विशेष संक्षिप्त पुनरिक्षणाच्या (SIR) पूर्व तयारीसाठी बीड तालुक्यात दोन दिवसीय विशेष कैम्प चे आयोजन

बीड, दि,01, (जिमाका):-, मा. भारत निवडणूक आयोगाचे आदेशान्वये आगामी विशेष संक्षिप्त पुनरिक्षणाच्या (SIR) पूर्व तयारीचे अनुषंगाने सद्याच्या मतदार यादीतील मतदारांचे यापूर्वी झालेल्या (सन-2005) विशेष संक्षिप्त पुनरिक्षणाच्या अंतिम यादीतील मतदारांशी Mapping करण्याचे काम व इतर खालील कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश आहेत.

1 सन 2024 ची मतदारयादी 2005 च्या मतदार यादीशी जुळविण्याचे काम (Mapping) करणे, 2 संभाव्य दुबार मतदार नोंदी (DSE) पडताळणी, 3 फ़ोटो नुसार संभाव्य दुबार मतदार नोंदी (PSE) पडताळणी, 4 अस्पष्ट, धुसर, अमानविय फोटो, अताकीक फोटो (Blur Photo) बदलणे, 5 Book A Call To BLO ची कामे प्रगती पथावर आहेत.

बीड तालुक्यातील 457 भागासाठी (230- बीड विधानसभा मतदार संघासाठी 345, 228 गेवराई विधानसभा मतदार संघासाठी 71 व 232 केज विधानसभा मतदार संघासाठी 41) एकुण 457 मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांच्या नियुक्त्या केल्या असून वरील कामे चालु आहेत. बीड तालुक्यातील नागरिक आणि मतदारांनी वरील काम करुन घेण्यासाठी तालुक्यातील सर्व मतदान केंद्र स्तरीय अधिकारी (BLO) दिनांक 04 एप्रील 2026 आणि दि. 05 एप्रील 2026 रोजी आपल्या मतदान केंद्रावर कार्यलयीन वेळेमध्ये (सकाळी 9:45 ते सायंकाळी 6:15 पर्यंत) थांबुन विशेष कैम्पचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी सर्व नागरीकांनी मतदारांनी आपल्या प्रभागाचे गावचे मतदान केंद्रावर जावून मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांचेशी संपर्क करुन त्यांना आपली 2005 चे मतदार यादीतील माहीती व इतर अनुषंगीक माहिति पुरवून आपली नावे मॅप करून घ्यावीत. बीड तालुक्यातील सर्व नागरिक आणि मतदारांनी या कॅम्पचा लाभ घ्यावा, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी केले आहे.

# जिल्हयासाठी 3 स्थानिक सुट्टया जाहिर

**बीड, दि,०१** | जिल्हाधिकारी बीड यांच्या अधिकारात असणा-या वर्षातील ३ स्थानिक सुट्टयांबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुसार चालु वर्षात ३१ ऑगस्ट २०२६ सोमवार रोजी तिस-या श्रावणी सोमवारी पहिली स्थानिक सुट्टी असणार आहे.

ज्येष्ठगौरी पूजन शुक्रवार दि. १८ सप्टेंबर २०२६ रोजी दुसरी स्थानिक सुटी असेल. त्यानंतर ६ नोव्हेंबर २०२६ रोजी धनत्रयोदशी निमित्ताने जिल्हयासाठी तिसरी स्थानिक सुटी असेल.

# छत्रपती शिवाजी महाराज चौक ते अशोक नगर मेल रस्त्याच्या कामाच्या तात्काळ जलद गतीने काम करण्यास भाग पाडावे

## हा नागरिकांना रहदारीसाठी रस्ता मोकळा करावा

**बीड प्रतिनिधी** | छत्रपती शिवाजी महाराज चौक ते अशोक नगर पर्यंत चाललेल्या मेल रस्त्याच्या कामाच्या संबंधित गुट्टेदाराला प्रशासनाने कडक आदेश देऊन तात्काळ जलद गतीने काम करण्यास भाग पाडावे हो नागरिकांना रहदारीसाठी रस्ता मोकळा करावा व मेन रस्ता महामार्ग तात्काळ जलद गतीने जुनी पूर्वीचे सिमेंट रोडची कामेही तात्काळ मार्गे लावावेत व सध्या चाललेले रस्त्याचे बोगस काम माती टाकून या रस्त्यावर माती टाकण्यात येऊ नये चांगल्या प्रकारे मुरूम भरण्यात यावा आणि या भागाचे इंजिनिअर यांनी देखील चांगल्या प्रकारे या कामाकडे लक्ष घालावे व कुठेही रस्त्याच्या बाबतीत बोगसगिरी होऊ नये याची दक्षता केवी या रस्त्यावर पाणी देखील मारल्या जात नाही पाणी मारून रस्त्याचे चांगल्या प्रकारे बुलडोझरने दबाई करावी चांगला रस्ता मजबूत करावा होय रस्त्याच्या कामाच्या बाबतीत कुठेही बोगसगिरी करू नये असे आव्हान देखील या निवेदनाद्वारे भाजपा नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील पाटील यांनी केले आहे

सध्या बीड शहरातून मेन भागामध्ये सुरू असलेल्या म्हणजे श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून ते अशोक नगर पर्यंत सध्या मेन रोडचे काम चालू आहे या रोडचे काम अतिशय दर्जेदार व्हावे आणि मंद गतीने चाललेले काम हे जलद गतीने प्रशासनाने करण्यासाठी संबंधित गुत्तेदाराला कडक सूचना द्याव्यात आणि सर्व नागरिकांना रहदारीसाठी हा मेन रोड तात्काळ उपलब्ध करून द्यावा असे आवाहन प्रसिद्ध पत्रकाच्या माध्यमातून भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा श्री नवनाथ जी अण्णा शिरोळे पाटील यांनी केले आहे आणि हा रस्ता अतिशय दर्जेदार आणि चांगल्या प्रकारे करावा कुठेही या रस्त्यावर खड्डे असू नयेत चांगल्या प्रकारे क्वालिटीचा रस्ता नागरिकांच्या रहदारीसाठी संबंधित गुत्तेदाराने करावा त्याच्यासाठी जिल्हा प्रशासनाने या रस्त्याकडे लक्ष घालावे व संबंधित गुत्तेदारांकडून चाललेल्या रस्त्याचे मंद गतीचे काम जलद गतीने करून द्यावे कारण भविष्यामध्ये लवकरच आता येणाऱ्या मे महिन्यामध्ये पावसाळा सुरू होत आहे म्हणून पावसाळ्यामध्ये या रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्या कुठल्याही नागरिकांना या रस्त्यावरून जाण्या येण्यासाठी त्रास होऊ नये चांगल्या प्रकारे त्यांना या ठिकाणाहून रहदारी करता यावी याची दक्षता देखील संबंधित गुत्तेदारांनी आणि प्रशासनाने घ्यावी असे आव्हान या प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून भारतीय जनता पार्टीचे नेते मा श्री नवनाथ अण्णा शिरळे पाटील यांनी केले आहे

# माजी सैनिक हल्ला प्रकरणी सखोल चौकशी व दोषीवर कठोर कारवाई करा

## जय जवान आजी माजी सैनिक संस्थेची निवेदनाद्वारे मागणी

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)** | जिल्ह्यातील बीड शहराच्या कालिकानगर परिसरातील रहिवासी माजी सैनिक जालिंदर सदाशिव सानप यांच्यावर अज्ञात व्यक्तीने प्राणघातक हल्ला केला आहे. हि घटना अत्यंत गंभीर व निंदनीय आहे. या घटनेने बीड जिल्ह्यातील माजी सैनिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. तेव्हा या प्रकरणी सखोल चौकशी व दोषीवर कठोर कारवाई करावी अशी मागणी जय जवान आजी माजी सैनिक संस्थेचे अध्यक्ष कॅप्टन पांडुरंग रघुनाथराव शेप, संस्था पदाधिकारी आणि सभासद यांनी उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांना मंगळवारी दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.



चर्चेनंतर सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषीवर कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन उपविभागीय अधिकारी यांनी निवेदकांना दिले. सदरील निवेदनाच्या प्रति माहितीस्तव जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षक, बीड यांना देण्यात आल्या आहेत. निवेदन देताना जय जवान आजी माजी सैनिक संस्थेचे अध्यक्ष कॅप्टन पांडुरंग रघुनाथराव शेप, कॅप्टन शेख उस्मान, सुभेदार आबासाहेब हाके, नायक बाबासाहेब केंद्रे, नायक अरविंद तपसे, नायक अंकुश काळे, बी.एच.एम. राधाकिशन कुंडगर, नायक महेश्वर सोळुंके, नायक यशवंत व्हावळे, नायक शंकर थोरात, सुभेदार संभाजी वाघमारे, नायक शिवाजी गंगणे, हवालदार सर्जेराव शिरसठ, नायक युवराज भुंबे, नायक महारूद्र गौरशेटे, नायक प्रकाश शिंदे यांच्यासह शेकडो माजी सैनिक, महिला व विद्यार्थी उपस्थित होते.

घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार, बीड शहरातील कालिकानगर परिसरात राहणारे जालिंदर सानप हे ९ मार्च रोजी त्यांच्या दुचाकीवरून जात असताना रस्त्यावर उभ्या असलेल्या चहाच्या गाड्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण झाला होता. तेव्हा गाडी बाजूला घेण्यास सांगितल्यावरून त्यांचा चहाविक्रेत्याशी वाद झाला. या वादातून संतप्त झालेल्या आरोपींनी सानप यांच्यावर लोखंडी रॉडने हल्ला केला. तसेच त्यांच्या अंगावर उकळता चहा फेकला. या हल्ल्यात ते गंभीर भाजले असून त्यांच्यावर रूग्णालयात उपचार करण्यात आले. दरम्यान, या प्रकरणात पोलिसांनी कारवाईस विलंब केल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करीत सदरील घटनेच्या निषेधार्थ जय जवान आजी माजी सैनिक संस्थेच्या वतीने उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांना मंगळवार, दिनांक २४ मार्च रोजी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, जिल्ह्यातील बीड शहराच्या कालिकानगर परिसरातील (गल्ली क्र.१८), बालेपीर येथील रहिवासी माजी सैनिक जालिंदर सदाशिव सानप यांच्यावर अज्ञात व्यक्तीने प्राणघातक हल्ला केला आहे. हि घटना अत्यंत गंभीर व निंदनीय आहे. या घटनेने बीड जिल्ह्यातील माजी सैनिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. देशसेवेसाठी संपूर्ण आयुष्य अर्पण केलेल्या एका माजी सैनिकावर अशा प्रकारचा हल्ले होणे हि अत्यंत दुर्दैवी, निषेधार्य बाब आहे. अशा प्रकारांमुळे माजी सैनिकांवर होणारे अन्याय, अत्याचार वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर प्रकरणाची सखोल व नि:ष्पक्ष चौकशी करून दोषीवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

# माजलगाव शहरातील मतदारांनी एस आय आर मॅपिंग करून घ्यावे : विनायक रत्नपारखी

## मतदार यादीतील नावे वगळली जाणार

तभा. वृत्तसेवा

**माजलगाव, दि. ३१ (प्रतिनिधी)** | बीड जिल्ह्यात सध्या विशेष पुनरनिरीक्षण अभियान कार्यक्रमांतर्गत सुरू असलेल्या (SIR )या महत्त्वपूर्ण विषयावर पूर्वतयारी मोहिमेत सर्व मतदारांनी आपल्या मतदार यादीतील माहितीची तपासणी करून घ्यावी व आपले नाव मतदार यादीत निश्चित करून घ्यावे, तसे न केल्यास आपले मतदार यादीतील नाव वगळण्यात येतील असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे माजलगाव शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले आहे.

सध्याच्या मतदार यादीत काही ठिकाणी दुबार नोंदी असल्यामुळे संबंधित मतदारांना अनेक ठिकाणी मतदानाची नोंद दिसून येते. त्यामुळे प्रत्येक मतदाराचे नाव देशात फक्त एका ठिकाणीच असावे, यासाठी निवडणूक आयोगाने हा कार्यक्रम राबविला आहे. या कार्यक्रमासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले असून माजलगाव मतदारसंघातही प्रत्येक ठिकाणी बीएलओ (BLO) नेमण्यात आले आहेत. मतदारांनी आपल्या संबंधित बीएलओ मार्फत मतदार यादीतील मतदानाची खात्री करून घ्यावी व



त्याच अनुषंगाने माजलगाव शहरातील सर्व मतदारांनी आपली SIR मॅपिंग प्रक्रिया पूर्ण करावी. मतदारांनी SIR मॅपिंग न केल्यास मतदार यादीतील नाव वगळले जाण्याची शक्यता आहे व त्यामुळे आपण मतदानापासून व अनेकांना मिळणाऱ्या शासकीय सुविधा पासून वंचित राहू शकतात त्यामुळे मतदारांनी आपले नाव मतदार यादी मध्ये राहण्यासाठी बी एल ओ यांना आपली माहिती द्यावी असे आवाहन विनायक रत्नपारखी यांनी केले आहे.

# शिव अंश हनुमान

चैत्र पौर्णिमा तिथीनुसार हनुमान जन्मोत्सव सूर्योदयापूर्वी मोठ्या उत्साहाने ,आनंदाने साजरा केला जातो. शेंदूर जे भक्ती शक्तीचे प्रतीक आणि मोगऱ्याचे तेल जे दैवी ऊर्जा आकर्षित करण्याचे प्रतीक मानले जाते त्याचे लेपन केले जाते .पुष्पहार, धूप ,दीप, श्रीफळ, भिजवलेली हरभऱ्याची डाळ, गुळ, मुरमुरे ,लाडू ,बुंदी इत्यादीचा नैवेद्य दाखवून मनोभावे नामस्मरण केले जाते.. वायुपुराण आणि शिवपुराण मध्ये हनुमान अवतार हे भगवान शंकराचे अकरावे रुद्रावतार मानले आहे . शंकर सुवन म्हणजेच शिवाचा अंश म्हटले आहे .तसेच हनुमानाला पवनपुत्र म्हणजेच वायू देवाचे आध्यात्मिक पुत्र मानले जाते, अंजनी पुत्र केसरी नंदन.. अंजनी आणि केसरी यांचे पुत्र, संकटमोचन संकटातून तारणारे, रामभक्त, चिरंजीवी ,शक्ती ,भक्ती आणि युक्ती यांचे प्रतीक





मानले जाते. जेव्हा भगवान विष्णूंनी प्रभू श्री रामाच्या रूपामध्ये अवतार घेतला तेव्हा भगवान शंकराने राम भक्ती प्राप्त करण्यासाठी हनुमानाचा अवतार घेतला. भगवान विष्णूंची सेवा करण्याचा संकल्प शंकराने हनुमानाच्या रूपातून पूर्ण केला. हनुमान हे शिव अंश असून देखील ते शंकराचे भक्त होते.

हनुमानाच्या निस्वार्थ भक्तीने नकारात्मक शक्तींचा नाश होतो, ग्रहदोष ,अडथळे, भीती दूर होते , इच्छापूर्ती ,संरक्षण ,यश, दैवी आशीर्वाद ,कीर्ती प्राप्त होते. त्याचबरोबर हनुमान चालीसा दररोज पठण किंवा श्रवण केली असता आत्मशक्ती आणि भक्ती वाढते , मनातील भीती, नकारात्मक विचार, अडथळे, शत्रू दूर होण्यास मदत होते आणि यश व सिद्धी प्राप्त होते .

."ओम हन हनुमते नमः " या हनुमान मंत्राचा जप केला असता संकटातून सुटका मिळते आणि मनुष्यास शक्ती प्रदान होते. हा मंत्र अत्यंत प्रभावी आहे. त्याचबरोबर "भीमरूपी महारुद्रा वज्र हनुमान मारुती वनारी अंजनी सुता रामदूता प्रभंजना " या मंत्रामध्ये देखील प्रचंड शक्ती आहे .भक्त कसा असला पाहिजे याचे उत्तम उदाहरण म्हणजे हनुमान ,शक्ती कशी असली पाहिजे याचे उत्तम उदाहरण म्हणजे हनुमान, संकटामध्ये साथ देऊन कार्य सिद्धीस कसे नेले पाहिजे याचे उत्तम उदाहरण म्हणजे हनुमान.... मनुष्याचे कुठलेही कार्य सिद्धीस जाण्यासाठी शक्ती ,युक्ती आणि भक्तीची अत्यंत आवश्यकता असते. जसे कुठलीही कार्य असले तरी मानसिक आणि शारीरिक शक्तीची आवश्यकता असते, केवळ शक्ती असून पुरेसे नाही तर त्यासोबत युक्ती म्हणजेच बुद्धीचातुर्य असणे गरजेचे आहे आणि या शक्ती आणि युक्ती सोबत भक्ती , देवावरची श्रद्धा ,प्रार्थना देखील आवश्यकता आहे. म्हणूनच आपण सर्वजण आज हनुमान जन्मोत्सवानिमित्त केवळ चांगल्या गोष्टीची रुजवन करून शक्ती, युक्ती (बुद्धी) आणि भक्ती वाढविण्याचा संकल्प करूयात. .. जय हनुमान.. जय जय हनुमान..

**- सौ .अश्विनी वासुदेवराव टेकाळे (जोशी) बीड.|**

# सुभाषचंद्र बोस आपदा व्यवस्थापन 2027 पुरस्कारासाठी अर्ज करावेत

तभा. वृत्तसेवा

**बीड, दि,०१, (जिमाका)** | राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, भारत सरकार, यांचे मार्फत आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था यांना सुभाषचंद्र बोस आपदा प्रबंधन पुरस्कार देवून सन्मानित केले जाणार आहे.

आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात आपत्ती प्रतिबंध, आपत्ती पूर्वतयारी, आपत्ती सौम्यीकरण, शोध व बचाव कार्य, आपत्ती प्रतिसादाचे कार्य, मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन अनुषंगाने संशोधन, नाविन्यपूर्ण संकल्पना आणि आपत्तीपूर्व सूचना प्रणाली या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था सुभाषचंद्र बोस आपदा प्रबंधन पुरस्कार २०२७ करिता ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावेत.

अर्ज कोण करु शकतात :

सदर पुरस्कारासाठी आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात कार्य करणारी भारतीय नागरिक असलेली व्यक्ती किंवा भारतीय संस्था अर्ज करु शकते.

अर्जासाठी संपर्क: केंद्र सरकार मार्फत सदर पुरस्कारासाठी देण्यात आलेल्या पुढील लिंकवर ऑनलाईन अर्ज दाखल करावा. https://awards.gov.in

# माळसेलू येथील संतप्त महिलांचा जिल्हा परिषदेवर पाण्यासाठी घागर मोर्चा

## पाणीपुरवठा योजनेवर १.३३ कोटी रूपये खर्चूनही गाव तहानलेले




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ एप्रिल**

तालुक्यातील माळसेलू येथे नळ पाणीपुरवठा योजनेसाठी तब्बल एक कोटी ३३ लाख रूपयांचा निधी खर्च करूनही गावकऱ्यांची पाण्यासाठी भटकंती सुरू आहे. गावात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून बुधवार दि १ एप्रिल रोजी गावातील महिलांनी पाण्यासाठी जिल्हा परिषदेवर घागर मोर्चा काढला. तसेच जिल्हा परिषद प्रशासनाला निवेदन सादर केले.

हिंगोली तालुक्यातील माळसेलू येथे जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनेचे काम मंजूर करण्यात आले आहे. या कामांसाठी १ कोटी ७९ लाख रूपयांच्या अंदाजपत्रकाला मंजूरी देऊन कामांना सुरूवात करण्यात आली आहे. मात्र प्रत्यक्षात काम सुरू असतांना एकही अधिकारी कामांची पाहणी करण्यासाठी आला नाही. त्यामुळे कंत्राटदाराने अंदाजपत्रकानुसार नळ पाणीपुरवठा योजनेचे काम केले नाही. गावात जलवाहीन्या अत्यंत कमी खोलीवर अंथरण्यात आल्या आहेत. शिवाय पाण्याची चाचणीही घेण्यात आली नसल्याचा आरोप गावकरी महिलांनी केला आहे. या कामांवर सध्याच्या स्थितीत १ कोटी ३३ लाख रूपये खर्च झाला आहे. लाखो रूपयांचा निधी खर्च करूनही गावकऱ्यांची पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती सुरू आहे. सध्या वाढत्या उन्हामुळे गावकऱ्यांना भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. महिलांना पाणी आणण्यासाठी कष्ट करावे लागत आहेत. हंडाभर पाण्यासाठी गावकऱ्यांची भटकंती होत आहे. शासनाचा लाखो रूपये निधी खर्च करूनही पाणी मिळत नसल्यामुळे संतप्त महिलांनी जिल्हा परिषदेवर डोक्यावर घागरी घेऊन मोर्चा काढला. यावेळी पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांना महिलांनी जाब विचारला असता त्यांना उत्तरे देता आले नाही. गावात पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे आणि अधिकारी कार्यालयात बसून बिसलेरी बॉटलचे पाणी पित असतांना पाहून महिला अधिकच संतप्त झाल्या. अधिकाऱ्यांनी महिलांना समजावून सांगण्याचा प्रयत्न करीत त्यांना पिण्यासाठी बिसलेरी बॉटल दिल्या परंतु महिलांनी त्या बॉटल्स अधिकाऱ्यासमोरच फेकून देत आमच्या गावाला आधी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करा अशी मागणी लावून धरली. गावातील विहीरीला पाणी नाही मग पिण्याच्या पाण्याच्या टाकीत पाणी कोठून आणणार असा सवालही यावेळी महिलांनी अधिकाऱ्यांना विचारला. गोंधळाच्या परिस्थितीनंतर गावकऱ्यांनी जिल्हा परिषद प्रशासनाला निवेदन सादर केले. पाण्याचा प्रश्न तत्काळ न सोडविल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा महिलांनी दिला आहे. यावेळी अनिल नायक, मनोहर वामन, देवानंद भिसे, भीमराव भिसे, संतोष भिसे, जगन वामन, राहुल भिसे, अशोक भिसे, तुकाराम वामन यांच्यासह महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# घरफोडी व चोरीचे ४ गुन्हे उघड, १० लाख ७० हजारांचा ऐवज जप्त



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ एप्रिल**

हिंगोली ग्रामीण पोलिस ठाणे व नर्सी पोलिस ठाणे अंतर्गत घरफोडी व चोरीच्या घटनांमध्ये स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दोन आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून १० लाख ७० हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यांतर्गत नर्सी फाटा येथील शंभू ट्रेडींग कंपनी आडत दुकान, साई ट्रेडींग कंपनी आडत दुकान व लिंबाळा मक्ता येथील सुधन वेअर हाऊस येथील शेतीमाल तुर, सोयाबीन, हळद, हरभराचे कट्टे चोरीस गेले होते. या प्रकरणाचा तपास पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन यांनी स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविला होता. हिंगोली शहरात पेट्रोलिंग करीत असतांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या गोपनीय माहीतीवरून शेख रेहान शेख शकील वय २१ रा आजम कॉलनी हिंगोली याने व त्याचे इतर साथीदारासह मिळून चोरी केल्याची माहीती मिळाल्यानंतर पथकाने मोठ्या शिताफीने आरोपी शेख रेहान शेख शकील याला अटक केली. पोलिसांनी अधिक चौकशी केली असता हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यांतर्ग तीन गुन्हे केल्याची कबुली त्याने दिली असून चोरीतील मुद्देमाल व गुन्ह्यात वापरलेले वाहन असा एकूण ५ लाख ४० हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नर्सी नामदेव पोलिस ठाण्यांतर्गत तळणी शिवारातील शेत आखाड्यामधील तुर व हळदीचे कट्टे चोरल्याची घटना घडली होती. याप्रकरणी नर्सी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला. पथकाने गोपनीय माहीतीच्या आधारे आरोपी सय्यद साजीद सय्यद मुजीब वय २८ रा मस्तानशहा नगर हिंगोली यास अटक केली त्याची अधिक चौकशी केली असता त्याने त्याच्या इतर साथीदारांसह मिळून गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. पोलिसांनी आरोपींकडून चोरीतील मुद्देमाल व गुन्ह्यात वापरलेले वाहन असा एकूण ५ लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदरील कार्यवाही पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, पोनि मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि दिलीप मोरे, जमादार पांडुरंग राठोड, संदीप जाधव, नितीन गोरे, निरंजन नलवार, धनंजय क्षीरसागर, ज्ञानेश्वर पायघन, शिवाजी इंगोले, मारोती काकडे, प्रदीप झुंगरे यांनी केली आहे.

# कळमनुरीत राज्यसभा खा. रामराव वडकुतेंचा भव्य नागरी सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**कळमनुरी, १ एप्रिल**

नवनिर्वाचित राज्यसभा खा. रामराव वडकुते यांचा कळमनुरी येथे भव्य नागरी सत्कार करण्यात आला.

भारतीय संसदेच्या राज्यसभेवर नुकतीच बिनविरोध निवड झालेले खासदार रामराव वडकुते यांचा भव्य नागरी सत्कार सोहळा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंगोली विधानसभेचे आ. तान्हाजीराव मुटकुळे तर प्रमुख पाहुणे म्हणून उमरखेड-महागाव विधानसभेचे आ. किसनराव वानखेडे उपस्थित होते.

याप्रसंगी व्यासपीठावर भाजपा हिंगोली जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी विधान परिषद सदस्य प्रज्ञाताई सातव, धनगर समाजाचे जेष्ठ नेते शिवदास बिरगड, हिंगोलीचे माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, आणि कपिश्वर सहकारी साखर कारखान्याचे (बाराशिव) अध्यक्ष अतिश दांडेगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या सर्व मान्यवरांच्या हस्ते खासदार रामराव वडकुते यांचा कळमनुरीवासीयांच्या वतीने यथोचित सन्मान व सत्कार करण्यात आला तसेच समाजातील विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी देखील नूतन खासदार रामराव वडकुते यांचा सन्मान केला.

सत्काराला उत्तर देतांना खा वडकुते म्हणाले की, हिंगोली जिल्ह्याच्या विकासासाठी मी कटीबध्द असून येत्या काळात जिल्ह्यात विकासाची कामे करणार असल्याचे आश्वासन दिले. भाजप हा सर्वसामान्यांचा विकास करणारा पक्ष आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गुलाब भोयर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार राहुल मेने यांनी मानले. यावेळी मोठ्या संख्येने तालुक्यातील भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.



**हिंगोली- शहरातील जिल्हा सामान्य रूग्णालयातील पिण्याच्या पाण्याच्या टाकीजवळ घाण पाणी साचत असल्यामुळे दुर्गंधी पसरली असून याठिकाणीच बसून रूग्णांच्या नातेवाईकांना बसून जेवण करावे लागत आहे. तसेच घाणीच्या विळख्यात असलेल्या टाकीतून पिण्यासाठी पाणी न्यावे लागत आहे. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### थेट कर्ज योजनेंतर्गत लाभार्थी निवडीसाठी ७ एप्रिलला लॉटरी प्रक्रिया

हिंगोली- महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या., जिल्हा कार्यालय हिंगोली यांना सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाकरिता थेट कर्ज योजनेअंतर्गत ३० लाभार्थी निवडीचे उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. या योजनेअंतर्गत एकूण १११ अर्जदारांनी ऑनलाईन पद्धतीने अर्ज नोंदणी केली असून त्यापैकी ७२ अर्ज पात्र तर ३९ अर्ज अपात्र ठरले आहेत. पात्र अर्जदारांमधून लाभार्थी निवड चिठ्ठीद्वारे (लॉटरी पद्धतीने) करण्यात येणार आहे. यासाठी अपर जिल्हाधिकारी, हिंगोली तथा सदस्य सचिव, जिल्हा लाभार्थी निवड समिती यांच्या अध्यक्षतेखाली बैठक दि. ७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, रिसाला बाजार, हिंगोली येथे आयोजित करण्यात आली आहे. या लॉटरी प्रक्रियेदरम्यान संबंधित पात्र अर्जदारांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, हिंगोली यांनी केले आहे.

### युवक काँग्रेसच्या प्रदेश सचिवदी बंटी नागरे



हिंगोली- स्वर्गीय खासदार राजीव सातव यांच्या तालमीत वाढलेले बंटी नागरे यांची काल युवक काँग्रेसचे प्रदेशअध्यक्ष शिवराज मोरे यांनी भारतीय युवक काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्ष उदयभानू चीब यांच्या मार्गदर्शनाखाली काल महाराष्ट्र प्रदेश युवा काँग्रेसच्या महासचिव व सचिवांची यादी आली व यात हिंगोलीचे युवक काँग्रेसचे माजी विधानसभा अध्यक्ष बंटी नागरे यांना महाराष्ट्र युवक काँग्रेसच्या प्रदेश सचिव पदी निवड झाली आहे. निवडीबद्दल हिंगोली काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुरेशअप्पा सराफ, व वसमत चे माजी नगराध्यक्ष अब्दुल हफिज, हिंगोली जिल्ह्याचे समन्वयक विनायक देशमुख, प्रदेश सचिव डॉ सतीश पाचपुते, हिंगोली शहराध्यक्ष मिलिंद उबाळे, हिंगोली तालुकाध्यक्ष बापूराव पाटील, हिंगोली चे ज्येष्ठ नेते शामराव जगताप, ॲड ऋषिकेश देशमुख, विद्यार्थी काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष जुबेर मामू यांच्यासह जिल्ह्यातील तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बंटी नागरे यांना शुभेच्छा दिल्या.

### चार ठिकाणी जुगार अड्ड्यावर छापे

हिंगोली- अवैध धंद्याविरोधात हिंगोली पोलिसांची जोरदार मोहीम सुरू असून सोमवारी जिल्ह्यात चार ठिकाणी जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापे मारले. यावेळी घटनास्थळावरून २ लाख ८० हजार २९० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला असून आरोपींना ताब्यात घेतले आहे. तसेच अवैध वाहतुक करणाऱ्या आणि वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ४५ वाहन चालकांविरूध्द पोलिसांनी कारवाई करीत त्यांच्याकडून ३९ हजार ५०० रूपयांचा दंड वसूल केला आहे.

# जादुटोणा विरोधी कायद्याची अंमलबजावणी करा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ एप्रिल**

राज्यात अलिकडच्या काळात उघडकीस येत असलेल्या काही भोंदू बुवा-बाबांच्या प्रकरणांमुळे समाजात मोठी चिंता निर्माण झाली आहे. यातून नागरिकांची आर्थिक फसवणुक, मानसिक छळ तसेच लैंगिक शोषण होत आहे. यामुळे अंधश्रध्दा वाढीस व गुन्हेगारी प्रवृत्तीला खतपाणी मिळण्याचा धोका निर्माण झाला आहे. यासंदर्भात जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यात जादुटोणा विरोधी कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, वैज्ञानिक दृष्टीकोनाचा प्रचार व प्रसार करावा, जिल्ह्यातील भोंदूगिरीच्या प्रकरणांवर कार्यवाही करावी अशी मागणी अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्यावतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनावर ज्योती क्षीरसागर, प्रकाश इंगोले, एच टी सूर्यवंशी, डॉ मीरा पोपळघट, बी व्ही विनकरे, आहेर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जिल्ह्यात क्षयरोग मुक्ती अभियानात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल श्रीपाद गारूडी यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ एप्रिल**

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील एनआरएचएम विभागातील लेखा व्यवस्थापक श्रीपाद गारुडी यांनी मागील तीन वर्षापासून सामाजिक बांधिलकी जोपासत क्षय रुग्णांना फूड बास्केट देऊन रुग्णांना आधार दिला. त्याबद्दल जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, सीईओ विवेक गायकवाड यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात क्षयरोग मुक्त ग्रामपंचायत अभियान कार्यक्रमांमध्ये जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या हस्ते आशा स्वयंसेविका, यासह उत्कृष्ठ कामगिरी बजावणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रशस्ती पत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

दरम्यान, जिल्हा परिषदेच्या राष्ट्रीय आरोग्य अभियान कक्षातील लेखा व्यवस्थापक श्रीपाद गारुडी यांनी निश्चय मित्र योजने अंतर्गत सतत मागील तीन वर्षा पासून क्षय रुग्णांना फूड बास्केट देऊन रुग्णांना आधार दिला. तसेच सामाजिक बांधिलकी जोपासत क्षय रोगाना कुटुंबीय म्हणून धीर दिला. वास्तविक पाहता आपले नियमित काम करीत सामाजिक जीवनात काहीतरी करावे हा डोळस उद्देश समोर ठेवत क्षय रुग्णांची सेवा करण्यात फार मोठे योगदान आहे. त्याच कामाची दखल घेत आरोग्य विभागाने गौरव करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार सोमवारी झालेल्या कार्यक्रमात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, जिल्हा परिषदेचे सीईओ विवेक गायकवाड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नितीन तडस, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. देवेंद्र जायभाये यांच्या उपस्थितीत प्रशस्ती पत्र देऊन गौरव करण्यात आला. श्रीपाद गारुडी यांनी अगळा वेगळा उपक्रम राबवित असल्याने त्यांचे सर्वच स्तरातून कौतुक केले जात आहे.

# नाथ जोगी समाजातील महिलांचा सन्मान आणि तरूणांच्या हाताला काम मिळाले पाहीजे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ एप्रिल**

नाथ जोगी समाजातील महिलांना सन्मानाची वागणुक आणि तरूणांच्या हाताला काम मिळाले पाहीजे तसेच भटक्या मित्रांसाठी कायमस्वरूपी आयोग शासनाने स्थापन करावा असा सूर नाथजोगी समाजाच्या परिषदेत निघाला.

भटके विमुक्त विकास परिषद व नाथ जोगी विकास सेवा संस्था हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने नाथजोगी समाज परिषद स्वयंवर मंगल कार्यालय हिंगोली येथे पार पडली या परिषदेचे प्रमुख उद्घाटक गोपालनाथ महाराज हे होते तर प्रमुख वक्ते डॉ संजय पुरी कार्याध्यक्ष भटके विमुक्त विकास परिषद हे होते. गोपाल नाथ महाराज आपल्या आशीर्वाचन देताना म्हणाले की भारत ही नाथांची साधुसंतांची भूमी आहे. दुधातून ज्याप्रमाणे तूप निघते त्याप्रमाणे समाजाच्या परिषदेतून संवाद आणि चर्चेतून समाज हिताचे निर्णय या परिषदेत झाले पाहिजे. तर प्रमुख वक्ते म्हणून बोलताना डॉ संजय पुरी यांनी भटके मुक्त विकास परिषदेच्या कार्याचा लेखाजोखा मांडला तसेच तीन सत्रामध्ये झालेले या परिषदेत समाजाच्या विविध समस्यांवर व प्रश्नांवर चर्चा झाली . या परिषदेत नारायण बाबर साळुंखे, मच्छिंद्र चव्हाण, शिवनाथ शिंदे, दशरथ पांडे, माऊली महाराज भगवान सावंत, साईनाथ शिंदे, रेखा चव्हाण, ललित कासार दिपकराव शिंदे, शाहीनाथ बाबर यांनी भाग घेतला या परिषदेत समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चा होऊन समाजाची भिक्षा मागण्याची व भटकंतीची प्रवृत्ती कमी करून शिक्षणाचा स्वयंरोजगाराचा मार्ग अनुसरला पाहिजे तसेच समाजाने महिलांच्या सन्मानाच्या तसेच युवकांच्या रोजगाराच्या प्रश्नाकडे लक्ष देण्याची गरज आहे. परिषदेचे कार्यवाह नरसिंग झरे यांनी या चर्चेचे संचालन केले तसेच समारोप करताना भटके विमुक्त विकास परिषद अध्यक्ष उद्धवराव काळे यांनी नाथ जोगी समाजाबरोबर इतरही भटक्या मित्रांसाठी कायमस्वरूपी आयोग निती आयोगाच्या शिफारशी तसेच इधाते आयोगाच्या शिफारसी यावर केंद्र सरकारची नीती तसेच महाराष्ट्र शासनाने नाथ जोगी व इतर भटके विमुक्तसाठी सुरू केलेली महामंडळे, नटराज व विश्वकर्मा पुरस्कार व समाज हिताचे निर्णय याबाबत माहिती दिली डॉ सूर्यकांत भोसले ज्ञानेश्वर विसलकर, नारायण बाबर, राहुल शिंदे रामराव सोळुंके इत्यादींनी परिश्रम घेतले.

# पवार पब्लीक स्कूलला ऑलिम्पियाडमध्ये २८ सुवर्णपदके



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ एप्रिल**

शहरातील पवार पब्लिक स्कूल, हिंगोली येथील विद्यार्थ्यांनी आयएमओ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या यशस्वी परंपरेला आणखी एकदा साध्य केले. या परीक्षेत शाळेतील तब्बल २८ विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक पटकावत भव्य यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांनी गणित या विषयांमध्ये उत्कृष्ट प्रावीण्य सिद्ध केले विद्यार्थ्यांच्या या यशामागे शाळेत दिले जाणारे दर्जेदार मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षांची प्रभावी तयारी करून घेतली जात आहे आणि विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षेसाठी सक्षम केले. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांनी ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली आहे. या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच पालकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




नांदेड -मनपा आयुक्त डॉ महेश कुमार डोईफोडे यांनी मनपा स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंह गाडीवाले यांच्याकडे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सालसन २०२५-२६ चे सुधारीत व सालसन २०२६-२७ चे मूळ अंदाजपत्रक मान्यतेसाठी सादर केले. यावेळीआयुक्त महेश कुमार डोईफोडे अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, अतिरिक्त आयुक्त निलेश सुकेवार, नगरसचिव अजितपालसिंग संधू, उपायुक्त नितीन गाढवे उपायुक्त अभिजीत वायकोस, सदाशिव पुरी, आशिष नेरलकर, सुमित मुथा सुमित, अभिषेक सौदे, तुळजाराम यादव, सौ. दिपाली मोरे, सौ. कविता गड्डम, सौ. सरीता बिरकाले, सौ. नीलम यादव गुरुखुदे, अलताफ हुसेन, शीफा तरन्नुम अब्दुल रऊफ, बेबी शाईस्ता मोहम्मद सलमान खान, परवीन बेगम शेख पाशा, सुनिता जोंधळे, राहुल सोनसळे आदी. (छायाचित्र नरेंद्र गडप्पा नांदेड)

# राष्ट्रनिर्माते डॉ. आंबेडकर जयंती महोत्सव जात विरहीत आणि पारंपारिक पध्दतीने साजरा होणार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १ एप्रिल -**

राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी कुणबी मराठा महासंघाचे प्रदेशाध्यक्ष गिरीश जाधव तर सचिवपदी उद्योजक बालाजी इबितदार यांची निवड करण्यात आली आहे. महापुरूषांना जातीच्या चौकटी बाहेर काढून त्यांची जयंती साजरी केली जावी, हा हेतू असून दि.१४ एप्रिल रोजी विविध जातीमधील मान्यवर यात सहभाग घेणार आहेत. पारंपारिक आज अनोख्या पध्दतीने सकाळी ७ ते १२ या वेळात भव्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मिरवणूक काढण्यात येणार आहे, अशी माहिती संयोजक तथा फुले-शाहू-आंबेडकर मेमोरियल ट्रस्टचे अध्यक्ष प्रवीण खंदारे यांनी दिली.



फुले-शाहू-आंबेडकर मेमोरियल ट्रस्टचे अध्यक्ष इंजि.प्रवीण खंदारे यांच्या संकल्पनेतून महापुरूषाची जयंती आगळ्यावेगळ्या पध्दतीने साजरी करण्याचा निर्णय घेतला आहे. पत्रकार परिषदेत माहिती देताना प्रवीण खंदारे यांनी सांगितले कि, राज कॉर्नर येथून सकाळी सात वाजता जयंती महोत्सवाला प्रारंभ होणार असून अनेक मान्यवरांच्या उपस्थतीत जयंती मिरवणूकीला प्रारंभ होणार आहे. विशेष म्हणजे या मिरवणूकीमध्ये डिजे असणार नाही. सुरूवातीला मशाल रॅली, हलगी पथक, मुलींचे लेझीम पथक, दोन उंठ, २० घोडे, आदीवासी ढेमसा नृत्य, जीवंत देखाव्याचा रथ, बैलगाडी व बाबासाहेब आंबेडकरांची भव्य प्रतिमा, मुलींचे ढोलपथक आणि मोठ्या वाहनांमध्ये सामाजिक देखावे असणार आहेत. सकाळी ७ ते दुपारी १२ वाजेपर्यंत या जयंतीची मिरवणूक संपन्न होणार आहे..

राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती महोत्सव २०२६ च्या अध्यक्षपदी कुणबी मराठा महासंघाचे प्रदेशाध्यक्ष गिरीश जाधव, उपाध्यक्ष डिग्रिटी हॉस्पीटलचे संचालक सुयश शिंदे, सचिवपदी उद्योजक बालाजी इबितदार, सहसचिव जलसंपदाचे गजानन मेडके, कोषाध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते महेंद्र देमगुंडे, सदस्य म्हणून लोकशाही टिव्हीचे जिल्हाप्रतिनिधी कमलाकर बिरादार, आयएनएस न्यूज एजन्सीचे प्रविणकुमार देशमुख यांची निवड करण्यात आली आहे.

या जयंती महोत्सवाचा डॉक्टर, इंजिनिअर, प्राध्यापक, वकिल यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सहभाग असणार आहे. नांदेडकरांनी यात सहभाग नोंदवावा, असे आवाहन संयोजक प्रा.डॉ. शुद्धोधन एडके यांनी केले आहे.या पत्रकार परिषदेला प्रा.डॉ. नागराज मगरे,कुलदीप नंदूरकर, नकुल जैन यांच्यासह आदिजण होते.

**जयंती महोत्सवात सहभाग नोंदवावा : गिरीश जाधव**

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यकाळामध्ये त्यांनी कुठलीच जात बघितली नाही अगदी तसेच आपणही कोणत्याही महापुरुषांची जयंती साजरी करताना जातविरहित साजरी करावी सर्वांसाठी हा जयंती महोत्सव खुला आहे, ही डिजेमुक्त,बॅनरमुक्त असल्यामुळे सर्वांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन जयंती समितीचे अध्यक्ष गिरीश जाधव यांनी केले आहे.

**जयंती डिजेमुक्त, बॅनरमुक्त, पावतीमुक्त : बालाजी इबीतदार**

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाचे निर्माते आहेत, त्यामुळे त्यांना एका जातीत बंदिस्त करता येणार नाही, आपल्या सगळ्या भारतीयांचे ते उद्गारकर्ते आहेत,विशेष म्हणजे ही जयंती डिजेमुक्त, बॅनरमुक्त, पावतीमुक्त असणार आहे. म्हणून प्रत्येक नागरिकाने या जयंतीमध्ये सहभागी व्हावे,अशी भूमिका जयंती महोत्सव समितीचे सचिव उद्योजक बालाजी इबीतदार यांनी मांडली.

## राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या प्रदेश संघटक सचिव पदी सचिन जाधव

**किनवट** -राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या संघटनात्मक बांधणीला बळकटी देण्यासाठी पक्षाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, किनवट तालुक्यातील परसराम नाईक तांडा येथील तडफदार कार्यकर्ते श्री. सचिन माधवराव जाधव (नाईक) यांची महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या 'संघटक सचिव' पदी नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडीचे अधिकृत पत्र आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या हस्ते त्यांना प्रदान करण्यात आले.



राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांच्या स्वाक्षरीने हे नियुक्ती पत्र निर्गमित करण्यात आले आहे. सचिन जाधव यांची ही नियुक्ती २५ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आली असून, त्यांच्यावर आता प्रदेश पातळीवरील महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या नियुक्ती पत्रात नमूद केल्यानुसार, पक्षाच्या वाढीसाठी आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसची ध्येयधोरणे सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी सचिन जाधव यांचे मोलाचे सहकार्य लाभेल, असा विश्वास प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांनी व्यक्त केला आहे. पक्षाने माझ्यावर जो विश्वास दाखवून ही मोठी जबाबदारी सोपवली आहे, त्याबद्दल मी प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे साहेब आणि आदरणीय नेतृत्वाचा ऋणी आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसची विचारधारा तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि पक्ष संघटनेच्या मजबुतीसाठी मी अहोरात्र प्रामाणिकपणे काम करेन. कार्यकर्त्यांना सोबत घेऊन संघटन वाढवणे हेच माझे मुख्य उद्दिष्ट असेल. सचिन जाधव यांच्या निवडीमुळे किनवट आणि माहूर परिसरातून त्यांचे मोठे कौतुक होत आहे. आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या हस्ते नियुक्ती पत्र मिळाल्यानंतर कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. या निवडीबद्दल राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील विविध मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र योजनेंतर्गत प्रस्ताव सादर करावेत

**नांदेड** -प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र योजनेंतर्गत जिल्ह्यातील ग्रामीण भागात कौशल्य प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यासाठी पात्र प्रशिक्षण भागीदार (Training Partner TP/ Training Center TC) संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आली आहेत. इच्छुक व पात्र प्रशिक्षण भागीदार, प्रशिक्षण केंद्र (TP/TC) संस्थांनी आपले प्रस्ताव शुक्रवार १० एप्रिल २०२६ रोजी सायं. ५ वाजेपर्यंत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड येथे दोन प्रतित सादर करावेत, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त डॉ. रा. म. कोल्हे यांनी केले आहे. या योजनेअंतर्गत ग्रामीण युवकांना उद्योगाभिमुख कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा प्रमुख उद्देश आहे. जिल्ह्यातील अर्धापूर तालुक्यातील मालेगाव, भोकर तालुक्यातील वाकद, बिलोली तालुक्यात कासराळी, धर्माबाद तालुक्यात येताळा, हदगाव तालुक्यात तामसा, नांदेड जिल्ह्यात धनेगाव, किनवट तालुक्यात गोकुंदा, उमरी तालुक्यात शिंधी (स्थलांतरित वाडी) या ८ ठिकाणी ही केंद्रे स्थापन करण्यासाठी प्रस्ताव मागवण्यात येत आहेत. प्रत्येक ठिकाणी एक केंद्र कार्यान्वित केले जाणार आहे. प्रस्ताव सादर करणारी संस्था ही भागीदारी संस्था, एलएलपी, प्रायव्हेट लिमिटेड कंपनी, पब्लिक लिमिटेड कंपनी, ट्रस्ट किंवा सोसायटी म्हणून विधिवत नोंदणीकृत, मान्यताप्राप्त प्रशिक्षण भागीदार, प्रशिक्षण केंद्र (TP /TC) असणे आवश्यक आहे. संबंधित संस्थेकडे कौशल्य विकास क्षेत्रातील अनुभव, प्रशिक्षण दिल्याचा पुरावा, तसेच उद्योग संलग्नता (Placement/Industry Linkage) असणे आवश्यक आहे.

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. उत्तम गणपती भालेराव व भगवान गणपती भालेराव रा. नांदेड ता. जि.नांदेड यांनी मौ. ब्रम्हपुरी ता. जि. नांदेड सर्वे नं. ३८/२ मधील क्षेत्र ०० हे. ४२ आर जमिन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेंव्हा मौ. ब्रम्हपुरी ता. जि. नांदेड सर्वे नं. ३८/२ मधील क्षेत्र ०० हे. ४२ आर ही जमीन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपांतरण प्रकियेस कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**उपजिल्हाधिकारी (सामान्य)**
**जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड**

**ई-निविदा सूचना क्र. (०१) सन २०२६-२७**
**स्वच्छता विभाग**

मुख्याधिकारी नगरपरिषद भोकर यांच्याकडून घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन, वाहतूक, प्रक्रिया व इतर अनुषंगिक कामे करण्यासाठी दि. ०१/०४/२०२६ ते दि. ०८/०४/२०२६ या कालावधित ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहे. अटी व शर्तीसह सविस्तर निविदा सूचना निविदा प्रपत्र महाराष्ट्र शासनाच्या www. mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. ०८/०४/२०२६ सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत उपलब्ध आहे.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

# माय मराठीचा समृद्ध वारसा जपण्यासाठी ज्ञानवन प्री स्कूलची स्थापना: श्रीवास्तव

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १ एप्रिल -**

जागतिक दर्जाच्या शैक्षणिक सोयीसुविधा आणि आपल्या संस्कृतीचा वारसा यांचा मेळ घालणाऱ्याएका मराठी (सेमी-इंग्रजी) पूर्व-प्राथमिक शाळा शहरातील हनुमानगड भागात आकारास येत आहे. ज्ञानवन प्री स्कूल ही केवळ शाळा नसून बालमनांवर संस्कार व माय मराठीची घट्ट पेरणी करण्याचा मानस संचालिका पूर्णिमा श्रीवास्तव व सरिता कंठेवाड यांनी पत्रपरिषदेत व्यक्त केला.

दि. २ एप्रिल रोजी शाळेचा शुभारंभ होत असून आनंदवन, अंकुरवन, पल्लववन, कुसुमवन अशा चार वर्गांत विद्यार्थ्यांवर संस्कार केले जाणार आहेत. बालस्नेही वातावरण, डिजिटल क्लासरूम, ऑडिओ-व्हिडिओ रूम, स्वतंत्र भोजन कक्ष, प्लेइंग एरिया, आवडी-निवडी जोपासण्यासाठी स्वतंत्र म्युझिक, डान्स व आर्ट स्टुडिओ येथे उभारण्यात आला आहे. पालकांचा सहभाग वाढविण्यासाठी आठवड्यातून एकदा त्यांच्यासमवेत डब्बा पार्टी व गप्पांची मैफल भरविली जाणार आहे.

शिवाय राष्ट्रगीत, प्रतिज्ञेसोबत संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन, मराठी-इंग्रजी भाषेची रोटेशन पद्धतीने क्टिव्ह बोर्डच्या माध्यमातून शिकवणी दिली जाणार आहे. शाळेचा शुभारंभ सोहळा २ एप्रिल रोजी होणार असून यावेळी प्रसिद्ध साहित्यिक देवीदास फुलारी, प्रथितयश लेखिका तथा समाजसेविका ड. दिपा बियाणी, शिक्षणाधिकारी दिलीप बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

शिक्षणप्रिय व मराठीचा अभिमान बाळगणाऱ्या प्रत्येकाने या सोहळ्यास उपस्थित राहावे, असे आवाहन अभिजात मराठी प्रतिष्ठान व ज्ञानवन परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. सदर पत्रकार परिषदेस ज्येष्ठ उद्योजक पंढरीनाथ कंठेवाड यांच्यासह शाळेच्या प्राचार्या, शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

# आ. चिखलीकर यांचे विश्वासू समर्थक नरेंद्र गायकवाड यांची घड्याळाला सोडचिठ्ठी



**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. १ एप्रिल -**

लोहा मतदार संघाचे आ.प्रताप पाटील चिखलीकर यांचे विश्वासू खांदे समर्थक पंचायत समितीचे माजी उपसभापती नरेंद्र गायकवाड यांनी घड्याळाला सोडचिठ्ठी देऊन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व यांचे विश्वासू समर्थक आ.आंनदा बोढांरकर यांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश करुन हाती धनुष्य बाण घेतला आहे.

नांदेड जिल्ह्याचे माजी खासदार राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे नेते लोहा मतदारसंघाचे आ. प्रताप पाटील चिखलीकर यांचे कट्टर समर्थक व विस्वास म्हणून ओळखले जानारे नरेंद्र गायकवाड यांना पंचायत समितीमध्ये उपसभापती पदावर संधी मिळवून दिली होती.

पंचायत समितीमध्ये अनेक जण गुडघ्याला बाशिंग बांधून होते पण नरेंद्र गायकवाड हा तळमळीचा कार्ये कर्ता म्हणुन ओळख निर्माण केली म्हणून त्यांना उपसभापती पदाची संधी मिळवून दिली. पंचायत समितीच्या उपसभापती पदावर विराजमान केले.

त्यांचा मतदार संघात उत्तम संपर्क आहे समाजकारण असो की राजकारण अनेकांना अडचणी निर्माण केल्या जातात पण अडचणीला न डगमगता त्यांनी पॅंथर पॉवर ॲटो युनियनच्या माध्यमातुन दिवस रात्र मित्र मंडळींचा गोतवळा तयार केला .इतर समाजामध्ये सुध्दा गायकवाड यांना मानणारा मोठा वर्ग आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीला सोडचिठ्ठी देत नांदेड येथे शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व दक्षिण मतदारसंघाचे आ.आंनदा बोंढरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

यावेळी शिवसेनेचे आमदार हेमंत पाटील, आ. आनंदराव पाटील बोंढारकर, शिवसेनेचे नांदेड दक्षिण जिल्हाप्रमुख विनय गिरडे, शिवसेनेचे दक्षिण तालुका प्रमुख उध्दव पाटील शिंदे आदी उपस्थित होते.

दक्षिण मतदारसंघातील बळीरामपुर जिल्हा परिषद गट एस.सी प्रवर्गासाठी राखीव असल्याने त्यांना या ठिकाणी संधी मिळुन शकते.या अनुषंगाने या सर्कल मध्ये कामाला सुरुवात केली आहे. या मतदारसंघात आ.आंनद बोंढारकर यांना मानणारा वर्ग मोठा आहे यांच्या नेतृत्वाखाली नरेंद्र गायकवाड यांनी कामाला सुरुवात केली आहे.

# मातंग समाज व सामाजिक संघटनांची शिखर बैठक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १ एप्रिल -**

महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जाती आरक्षणाचे सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार व निर्देशानुसार उपवर्गीकरण करण्याबाबतचा प्रारूप आराखडा शासनास सादर करण्यासाठी नियुक्त केलेल्या न्यायमूर्ती अनंत बदर समितीने आपला अहवाल शासनास दि. १६ मार्च २०२६ रोजी सादर केला आहे व शासनाने तो अहवाल स्वीकारलेला आहे.

न्या. बदर समितीचा अहवाल अधिक काळ शासनाने प्रलंबित न ठेवता आरक्षण लाभ वंचित जात समुहांना सामाजिक न्याय प्रदान करण्यासाठी इतर राज्याप्रमाणे महाराष्ट्र राज्यातही अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण लागू करावे, तसा कायदा पारीत करावा, याविषयाकडे मुख्यमंत्री व राज्य शासनाचे लक्ष वेधण्यासाठी नव्हेतर शासनास भाग पाडण्यासाठी आता महाराष्ट्रात मातंग समाज व तत्सम वंचित जात समुहाकडून आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्यात यावे, याबाबत आरक्षण लाभ वंचित जात समुहाच्या भावना तीव्र असून त्यासाठी आपला संघर्ष तीव्र करण्याचा निर्धार या समुहाकडून व्यक्त केला जात आहे.

या मागणीसाठी नांदेड जिल्ह्यातील मातंग समाज व मातंग समाजातील विविध सामाजिक संघटनांच्या वतीने दि. ७ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे एक दिवसीय प्रचंड धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाची पूर्व तयारीसाठी आज दि. ३१ मार्च रोजी शासकीय विश्रामगृह नांदेड येथे समाजाचे ज्येष्ठ नेते माजी आ. अविनाश घाटे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली.

या बैठकीस लेखक, विचारवंत केशव शेकापूरकर, शिवा कांबळे, सतीश कावडे, परमेश्वर बंडेवार, लालबाजी घाटे, गणेश तादलापूरकर, पंडित वाघमारे आदींसह असंख्य कार्यकते उपस्थित होते. या बैठकीस केशव शेकापूरकर, कॉ. गणपत भिसे यांनी मार्गदर्शन केले.

## बापुराव पांपटवार यांचे निधन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १ एप्रिल -**

उदयनगर येथील प्रतिष्ठीत बापुराव विठ्ठलराव पांपटवार (वय ८५ वर्षे) यांचे दि. ३१ मार्च २०२६ रोजी दुपारी ४-३० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, नगरसेवक संजय, धनंजय व विजय अशी ३ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. बापुराव पांपटवार यांच्या पार्थिवावर बुधवार, दि. १ एप्रिल रोजी सकाळी शांतीधाम गोवर्धनघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व स्तरातून मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

# जलसेवेच्या टँकरचा वापर गुत्तेदाराच्या कामासाठी

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १ एप्रिल -**

मुदखेड शहराला कायमस्वरूपी पाणीपुरवठा योजना कार्यान्वित झाली नसल्याने अनेक नगर वस्तीत सार्वजनिक नळाचे पाणी मिळत नसल्याने नागरिकांना दाहीदिशा भटकंतीची वेळ आली आहे . सत्ताधाऱ्यांनी गाजा वाजा करून नगरपरिषदे अंतर्गत टँकरची जलसेवा स्वखर्चातून सुरू केल्याचा उहापोह खोल ठरला आहे . यामुळे शहरातील नागरिकातुन तीव्र संताप व्यक्त केला जात आहे .

उन्हाळ्याची चाहूल लागताच शहरातील अनेक वस्तीत पाणीटंचाईचा भिषण प्रश्न निर्माण झाला आहे . मुदखेड नगरपरिषद अंतर्गत शहरातील नागरिकांना कायमस्वरूपी शुद्ध पाणीपुरवठा मिळवायासाठी सन २०२१ मध्ये ४२ कोटीच्या योजनेस शासनाने मंजुरी दिली आहे . दोन वेळा मुदतवाढ देऊनही संबंधित कंत्राटदाराने अजूनही काम पूर्ण केलेले नाही . यामुळे शहरातील बहुतांश



वस्तीमध्ये भीषण पाणीटंचाईचा प्रश्न उद्भवला आहे . नगरपरिषदेच्या निवडणुका नुकत्याच पार पडले असेल या निवडणुकीत भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले आहे . यानंतर प्रलंबित पिण्याच्या पान्याचा प्रश्न लवकर निकाली काढला जाईल अशी अपेक्षा नागरिकांना होती . परंतु नगरपरिषदेत प्रभारी मुख्य अधिकाऱ्याकडे प्रभार असल्याने रामभरोसे कारभाराला नागरिक वैतागले आहे .

मुदखेड नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष विश्रांती माधव कदम यांनी शहरातील अनेक वस्तीतील पाणीटंचाईचा प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतला . विशेष कार्यक्रमाचे अवचित्य साधून पाणीटंचाईची धाकता कमी करण्यासाठी नगरपरिषदेच्या टँकरच्या सहाय्याने पाणीपुरवठा करण्याचा उपक्रम हाती घेतला . परंतु सामाजिक बांधिलकीतून जोपासलेला जलसेवेचा प्रश्न अजूनही कायमच आहे . याउलट नगरपरिषदेचे जलसेवेचे टँकर गुत्तेदाराच्या रस्त्याच्या पाणी वापर कामासाठी वापरले जात असल्याने नागरिकांनी खंत व्यक्त केली जात आहे . निवडणूक काळात शहरातील नागरिकांना भरघोश आश्वासनांची खैरात करण्यात आली होती . परंतु सत्ताधाऱ्यांना पिण्याच्या पाण्याचा प्रश्न टँकरद्वारे सोडविता येत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ: भूशास्त्र संकुलाच्या विद्यार्थ्यांची भरारी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १ एप्रिल -**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठच्या भूशास्त्र संकुलाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करत राज्यभर आपला ठसा उमटवला आहे. संकुलातील विद्यार्थ्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) तसेच विविध राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांमध्ये घवघवीत यश मिळवले आहे.

भूवैज्ञानिक परीक्षेत चाणक्य तोरणे यांनी अखिल भारतीय स्तरावर ११ वा क्रमांक मिळवत सुमारे १० लाखांच्या वार्षिक पॅकेजसह यश संपादन केले. तसेच डॉ. पांडुरंग बलवंत आणि राकेश निकम यांची उशर्पीरश्र थरींशी रपव झेशी ठशीशरीलह डींरींळेप येथे वैज्ञानिक पदावर निवड झाली असून त्यांना सुमारे १२ लाखांचे वार्षिक वेतन मिळणार आहे. याशिवाय मुंजाजी भोसले आणि वर्षा शेवाळे यांची सहाय्यक प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाली आहे.

प्रशासकीय क्षेत्रातही संकुलातील विद्यार्थ्यांनी आपला दबदबा निर्माण केला आहे. पोशट्टी मुडशे यांची चझडउमार्फत पोलीस उपनिरीक्षक (PSI) पदावर निवड झाली आहे. भूजल सर्वेक्षण विभागात अनिकेत राठोड, दीपक वाबळे (सहाय्यक भूवैज्ञानिक), सुधाकर लुटे (सहाय्यक



भूभौतिकशास्त्रज्ञ) तसेच अनिल गाडेकर, अभिषेक आदमाने, राहुल मुंडे, करण डव्हळे आणि मनीषा भिलावेकर (कनिष्ठ भूवैज्ञानिक) यांनी यश मिळवले आहे. दरम्यान, २०२४-२५ या वर्षात एकूण १८ विद्यार्थ्यांनी CSIR-NET, UGC-NET, SET आणि GTE यांसारख्या राष्ट्रीय पात्रता परीक्षांमध्ये यश मिळवत संकुलाची मान उंचावली आहे.

१९९६ साली स्थापन झालेल्या या संकुलात भूगर्भशास्त्र, भूभौतिकशास्त्र, पर्यावरणशास्त्र आणि भूगोलशास्त्र या विषयांत पदव्युत्तर शिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण करण्यासाठी Maharashtra Remote Sensing pplications Centre आणि Mineral Exploration and Consultancy Limited यांसारख्या संस्थांशी सहकार्य करण्यात आले आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना इंटर्नशिपसह ३ लाखांपर्यंत मानधनाची संधी मिळते.

भूजल व्यवस्थापन, भूकंपशास्त्र, खनिज संपत्तीचा शोध आणि ज्वालामुखी यांसारख्या विषयांमध्ये सखोल प्रशिक्षण दिल्यामुळे येथे घडणारे विद्यार्थी उद्योग व संशोधन क्षेत्रासाठी सक्षम मनुष्यबळ म्हणून पुढे येत आहेत.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार यांच्यासह संचालक, विभागप्रमुख आणि प्राध्यापकांनी अभिनंदन केले असून, मराठवाड्यातील विद्यार्थ्यांसाठी भूशास्त्र क्षेत्र करिअरची नवी 'सुवर्णसंधी' ठरत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले आहे.

लातूर
# दिनांक
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अवकाळीच्या पार्श्वभूमीवर धग वाढली

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ०१ एप्रिल :** मागच्या काही दिवसांपासून वातावरणातील उष्मा वाढत आहे. त्यातच सध्यस्थितीत अवकाळी पाऊस होणार असल्याचेही सांगितलेजात आहे. अवकाळीच्या पार्श्र्वभूमीवर लातूर शहर व परिसरात धग बऱ्यापैकी वाढल्याचे जाणवत आहे.

दरवर्षी साधारणतः एप्रिल नंतर आणि मे महिन्याच्या सुमारास अवकाळी पावसाचे वातावरण राहायचे. आता मात्र पर्यावरणाच्या असमतोलामुळे कोणता ऋतू कधी येईल याची खात्री नसल्याचे आढळून येते. उन्हाळ्यात पाऊस आणि पावसाळ्यात कडक उन्हाळा अशी परिस्थितीही अनेकदा पाहायला मिळालीच आहे. येत्या काही दिवसात अवकाळी पाऊस,वादळ होणार असल्याचे हवामान विभागाकडून सांगण्यात आलेआहे. त्यामुळे वातावरणात उष्णता आणि सायंकाळनंतर उष्मा काही प्रमाणात कमी होत असल्याचे जाणवते. कधी काढिरात्री उशिरा अचानक सोसाट्याचा वारा सुटत असल्याचे दिसून येते. अचानक वादळी वारा सुरु होतो आणि काही मिनिटानंतर वातावरण पुन्हा पूर्ववत होते,असेही दिसून येत आहे. अवकाळी पावसाच्या शक्यतेच्या पार्श्र्वभूमीवर दिवसा शहर परिसरातील धग बऱ्यापैकी वाढली आहे. उन्हं कमी झाली तरी धगाटा कायम असल्याचे दिसून येते. ही परिस्थिती आणखी काही दिवस कायम राहणार असल्याचे बोलले जात आहे.



## विविध वृत्त...

### सेवालयाच्या विद्यार्थ्यांचे राज्यस्तरीय स्पर्धेत यश



तभा वृत्तसेवा

**लातूर :** सोलापूर येथे झालेल्या पहिल्या राज्यस्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सव स्पर्धेत हासेगावच्या सेवालय बालगृहातील एचआयव्ही संक्रमित अनाथ विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन एका सुवर्णपदकासह अन्य पारितोषिके पटकावत यश संपादन केले आहे.

राज्य शासनाचा महिला व बाल कल्याण विभाग व सोलापूर येथील सिंहगड इन्स्टिट्यूटच्यावतीने पहिल्यांदाच राज्यस्तरी चाचा नेहरू बाल महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात राज्यभरातून ९०० पेक्षा अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. त्यात छत्रपती संभाजीनगर विभागातून निवड झालेल्या हासेगावच्या सेवालय बालगृहातील मुलांनी लातूर जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व केले. लातूर जिल्ह्यातून एकूण ८ स्पर्धक सहभागी झाले होते. त्यात एकट्या सेवालय बालगृहातील ५ मुलांचा समावेश होता.

या महोत्सवात सेवालातील विद्यार्थ्यांनी निबंध, चित्रकला, वक्तृत्व, बुध्दिबळ, कॅरम, खो-खो, सुंदर हस्ताक्षर, मशाल धाव, रिले या स्पर्धांमध्ये सहभागी होत विजय मिळविले आहेत.

सेवालयातील मुले ही एचआयव्ही संक्रमित आहेत. सर्वसामान्यांप्रमाणेच या विद्यार्थ्यांनीही स्पर्धेत सहभागी होऊन चाचा नेहरू महोत्सवात आपली मोहोर उमटविली आहे.

मुलांच्या या यशाबद्दल सेवालय बालगृहाचे संस्थापक प्रा. रवी बापटले यांच्यासह, प्रा. शैलजा बरुरे, प्रा. मनोज मोठे, रचना बापटणे, अधीक्षिका पूजा जयगावकर यांनी कौतुक केले आहे.

### डॉ. संदीपान जगदाळे यांची NCERT च्या संगीत पाठ्यक्रम समितीवर निवड

तभा वृत्तसेवा

**लातूर :** राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत इयत्ता ११ वी व १२ वी साठी संगीत विषयाची नवी पाठ्यपुस्तके तयार करण्याचे काम सुरू असून ही पुस्तके देशभरातील CBSE विद्यार्थ्यांसाठी लागू होणार आहेत. या अत्यंत प्रतिष्ठेच्या प्रक्रियेत National Council of Educational Research and Training (NCERT) यांच्या इयत्ता ११ वी-१२ वी संगीत पाठ्यपुस्तक निर्मिती समितीवर दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथील राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त प्रा. डॉ. संदीपान जगदाळे यांची सदस्य म्हणून निवड झाली आहे.



ही निवड दयानंद शिक्षण संस्था तसेच लातूर जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. डॉ. जगदाळे यांच्या व्यापक शैक्षणिक अनुभव, संशोधनपर दृष्टीकोन आणि संगीत क्षेत्रातील दीर्घकालीन योगदानामुळे राष्ट्रीय स्तरावरील संगीत शिक्षण अधिक समृद्ध होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

छउएठढ (राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद) ही देशातील शालेय शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च शैक्षणिक संस्था असून तिची स्थापना १ सप्टेंबर १९६१ रोजी झाली आहे. नवी दिल्ली येथे मुख्यालय असलेल्या या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट भारतातील शालेय शिक्षणाची गुणवत्ता उंचावणे व एकसमान शैक्षणिक धोरण विकसित करणे हे आहे. अभ्यासक्रम रचना, पाठ्यपुस्तक निर्मिती, शैक्षणिक संशोधन आणि शिक्षक प्रशिक्षण या माध्यमांतून NCERT देशाच्या शिक्षणव्यवस्थेला दिशा देत असते.

डॉ. संदीपान जगदाळे यांनी विविध शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थांमध्ये उल्लेखनीय कार्य करत आपला ठसा उमटवला आहे. ते महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ, पुणे येथे राज्य मंडळ सदस्य म्हणून कार्यरत राहिले असून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे अधिसभा (सिनेट) सदस्य म्हणून त्यांनी महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत लातूर विभागीय समन्वयक म्हणूनही ते कार्यरत आहेत.

याशिवाय बालभारती येथे संगीत अभ्यास मंडळ सदस्य, राज्य मंडळ कला शिक्षण अभ्यास मंडळाचे निमंत्रक (अध्यक्ष), तसेच SCERT च्या अभ्यासक्रम विकसन समितीवर सदस्य म्हणून त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला आहे. महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वंदे मातरम्‍ १५० वर्ष समितीवरही त्यांनी तज्ज्ञ सदस्य म्हणून योगदान दिले आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष ललितभाई शाह, सचिव रमेश बियाणी, प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, संगीत विभाग प्रमुख डॉ. देवेंद्र कुलकर्णी व अधीक्षक संजय व्यास यांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# आखाती युध्दाच्या झळा पोहोचल्या सामान्य लातूरकरांपर्यंत!

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ०१ एप्रिल :** आखाती युध्दाला तोंड फुटून आता एक महिना उलटून गेला आहे. युद्ध जरी अमेरिका - इस्रायल - इराण यांच्यामध्ये सुरु आले तरी त्याची झळ संपूर्ण जगाला बसताना दिसत आहे. अन्य देशांचे सोडा पण त्याची झळ भारतापर्यंत नक्कीच पोहोचल्याचे दृष्टीपथास येत आहे. मागच्या काही दिवसात लातूरमध्ये ऑटोरिक्षा, हॉटेल चालक, मेस चालक या सर्वांनी आपआपल्या व्यवसायाचे दर वाढवले आहेत. त्यामुळे या युद्धाच्या झळा आतासामान्य लातूरकरांपर्यंत येऊन पोहोचल्याचे निदर्शनास येत आहे. स्वयंपाकाच्या गॅससाठीही नागरिकांना अतोनात त्रास सहन करावा लागत आहे.

सुरु असलेले आखाती युद्ध लवकरच संपेल असा आशावाद व्यक्त केला जात होता. अमेरिकेकडून युद्ध थांबविण्याची भाषा केली जात असली तरी इराणने माघार घेण्याची तयारी न दर्शविल्याने दस्तुरखुद्द अमेरिकेचीही गोची झाल्याचे एकंदर परिस्थितीवरून लक्षात येते. युद्ध संपण्याची निश्र्चित तारीख कोणीही सांगू शकत नसल्याने याबाबत संभ्रमावस्था कायम आहे. प्रत्यक्ष युद्ध जरी आपल्या मायभूमीत होत नसले तरी त्याचे प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष परिणाम सगळ्यांना भोगावे लागत आहेत. सामान्यातील सामान्य माणूसही या परिणामांपासून सुटू शकलेला नाही. ज्याप्रमाणे मार्च अखेरीस कोणत्याही व्यवहारासाठी मार्च एंडचे कारण पुढे केले जाते, त्याप्रमाणे युद्धजन्य परिस्थितीचे झाले आहे. सद्यपरिस्थितीत लातूरसह राज्यातील अनेक शहरात ग्राहकांना वेळेत गॅस सिलेंडर उपलब्ध होत नाहीत. अनेक ग्राहकांच्या गॅसची बुकिंगच होत नसल्याच्या तक्रारी आहेत. त्यातच शासन - प्रशासन पेट्रोल -डिझेल तथा इंधनाची कमतरता नसल्याचे सांगत आहेत. जर कमतरता नाही तर नागरिकांना त्याची उपलब्धता सहजगत्या का होत नाही ? हा खरा प्रश्र्न आहे.

लातूर जिल्ह्यात पेट्रोल डिझेलच्या बाबतीत फारशी ओरड होताना दिसत नाही. पेट्रोल सहजपणे मिळाले तरी शहरातील ऑटोचालकांनी मागच्या काही दिवसांपासून शहरातील विविध भागातील आपल्या सेवांचे दर वाढवले आहेत. उदाहरणादाखल सांगावयाचे झाल्यास गंज गोलाई ते राजीव गांधी चौकापर्यंतच्या रिक्षा प्रवासासाठी प्रति प्रवासी वीस रुपये आकारले जात असत. त्यात आता वाढ करण्यात येऊन वीस ऐवजी तीस रुपये घेतले जात आहेत. ऑटोचालकांनी ही दरवाढ नेमकी कोणत्या कारणामुळे केली आहे ? असा प्रश्र्न सामान्य लातूरकरांना पडला आहे. ऑटोचालकांचे सोडा, शहरातील अनेक हॉटेलमधील खाद्यपदार्थांचे दरही वाढविण्यात आले आहेत. चहाच्या दराचीही तीच स्थिती आहे. याशिवाय शहर परिसरात चालविण्यात येणाऱ्या अनेक खाजगी मेस चालकांनीही प्रति ग्राहकाच्या मागे आकारण्यात येणाऱ्या शुल्कात भरीव वाढ केली आहे. प्रत्यक्षात अद्याप म्हणावी तेवढी इंधन टंचाई किमान या क्षणापर्यंत तरी जाणवत नाही.




तरीही सामान्य ग्राहकांच्या खिशातून वाढीव शुल्क वसुली सर्रास केली जात असल्याचे धडधडीतपणे दिसते आहे. या संदर्भात प्रशासनाकडूनच आता योग्य ते निर्देश देण्यात यावेत आणि सामान्यांची होणारी आर्थिक लूट थांबविण्यात यावी, अशी मागणी वाढीस लागली आहे.

ग्रामीण भागात गॅस टंचाईच्या पार्श्र्वभूमीवर पर्यायी इंधन म्हणून जळण अर्थात लाकडाचा वापर वाढला असल्याचे दिसून येत आहे. ग्रामीण भागाप्रमाणे शहरी भागात सहजगत्या लाकडाचा वापर शक्य होताना दिसत नाही. सध्या अनेक घरात चूल किंवा स्टोव्ह अस्तित्वातच नसल्याचे पाहायला मिळते. लातूर शहरातील काही हॉटेल व्यावसायिकांनी गॅस सिलेंडर मिळत नसल्याने पर्यायी इंधन म्हणून डिझेलचा वापर सुरु केल्याचेही ऐकायला मिळत आहे. मात्र, स्टोव्हची इंधन म्हणून डिझेलचा वापर कारण सावधगिरी बाळगणे गरजेचे असल्याचे सांगण्यात आले. एकंदर परिस्थितीवरून आखाती युद्धाच्या झळा आता सामान्य लातूरकरांपर्यंत पोहोचल्या आहेत, हे स्पष्टपणे निदर्शनास येत आहे.

### प्रा.शशिकांत देशमुख 'संगीत साधना' पुरस्काराने सन्मानित

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ०१ एप्रिल :** लातूर येथील आरोह संगीत अकादमीचे संचालक व धाराशिव येथील आर्य चाणक्य महाविद्यालयातील संगीत विभागप्रमुख प्रा. शशिकांत देशमुख यांना आंबेजोगाई येथील स्वर्गीय सौ. कुमुदिनी शंकरराव सोनवळकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ दिला जाणारा ''संगीत साधना पुरस्कार''

ज्येष्ठ पखवाज वादक तालमणी उद्धवबापू आपेगावकर, दगडूजीदादा लोमटे व जेष्ठ तबलावादक उल्हास पांडे यांच्या हस्ते रोख रक्कम व मानपत्र देऊन सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. आंबेजोगाई येथील ''संगीत साधना मंच''च्या वतीने आयोजित रौप्य महोत्सवी २५व्या मासिक संगीत सभेत या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. व्रतस्थपणे संगीताची साधना करणाऱ्या व भारतीय अभिजात संगीतासाठी योगदान देणाऱ्या कलावंतांना योग्य निवड करून हा पुरस्कार देण्यात येणार असल्याचे ''संगीत साधना मंच'' चे प्रवर्तक श्री. विश्वजीत धाट यांनी सांगितले. या विशेष पुरस्काराबद्दल गुरुवर्य पं. शिवदासजी देगलूरकर, श्री प्राणेश पोरे, अष्टविनायक प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री प्रदीपभाऊ राठी, आवर्तन प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री अभय शहा, डॉ. संदिपान जगदाळे, डॉ. रवीराज पोरे प्रा. हरीसर्वोत्तम जोशी इ. सह संगीत क्षेत्रातील अनेक कलावंत व रसिक, श्रोत्यांनी अभिनंदन केले.



### रुग्णसेवेच्या ४६ वर्षांच्या परंपरेला आधुनिकतेची जोड

#### जाजू हॉस्पिटलच्या नूतन वास्तूचा प्रथम वर्धापन दिन उत्साहात साजरा

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ०१ एप्रिल :** लातूर शहरातील जाजू हॉस्पिटलच्या अत्याधुनिक नूतन वास्तूचा प्रथम वर्धापन दिन नुकताच उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व श्री गणेश आरतीने भक्तिमय वातावरणात झाली.

लातूर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी सन १९८० साली डॉ. रमेशचंद्र जाजू व डॉ. वसुधा जाजू यांनी जाजू हॉस्पिटलची स्थापना केली. आज या सेवावृत्तीने रुग्णसेवा देणाऱ्या संस्थेला तब्बल ४६ वर्षे पूर्ण झाली आहेत. या परंपरेचा वारसा आज अस्थिरोग तज्ञ डॉ. चेतन जाजू व स्त्रीरोग तज्ञ डॉ. रचना जाजू समर्थपणे पुढे नेत असून, ते दोघेही गेल्या १६ वर्षांपासून लातूरमध्ये रुग्णसेवा करत आहेत. या काळात त्यांनी अनेक गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया व यशस्वी उपचार करून रुग्णांच्या मनात विश्र्वासाची भावना निर्माण करण्याचे काम केले आहे. जाजू हॉस्पिटलच्या नूतन व अद्यावत



वास्तूमध्ये सर्व स्पेशालिटीवरील उपचारांची सुविधा उपलब्ध आहे. येथे मॉड्युलर ऑपरेशन थिएटर, आयसीयू , अत्याधुनिक लेबर रूम, स्पेशल, डिलक्स व सेमी-स्पेशल रूम्स तसेच प्रगत फिजिओथेरपी व रिहॅबिलिटेशन विभाग उपलब्ध आहे. तसेच आर्थोपेडिक व गायनॉकॉलॉजी क्षेत्रातील नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून रुग्णांना आधुनिक उपचार दिले जात आहेत.

विशेष म्हणजे या हॉस्पिटलमध्ये आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत हाडांच्या तसेच इतर विविध आजारांवर पात्र रुग्णांना मोफत उपचार दिले जात असून, रुग्णांना एकही रुपया खर्च करण्याची गरज भासत नाही. महात्मा फुले व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या योज़नाही हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असून या सुविधेचा लाभ आतापर्यंत असंख्य रुग्णांनी घेतला आहे. प्रथम वर्धापन दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर, डॉक्टर, सल्लागार, मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह, हितचिंतक व नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी हॉस्पिटलचे व्यवस्थापक वसीम कादरी तसेच सर्व कर्मचारीवर्गाने परिश्रम घेतले.

### विश्व मैदान राष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविणारे केंद्र ठरेल : आमदार विक्रम काळे

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ०१ एप्रिल :** विद्यार्थ्यांमधील क्रीडागुणांना चालना देत त्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील संधींचे दालन खुले करून देणारे एमआयटी शिक्षण संकुलातील 'विश्र्वमैदान' हे आगामी काळात उत्कृष्ट खेळाडू घडविणारे महत्त्वाचे क्रीडा केंद्र ठरेल, असा विश्र्वास महाराष्ट्र विधान परिषदेचे शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी व्यक्त केला.



माईर एमआयटी शिक्षण संस्था समूह, लातूर यांच्या वतीने आयोजित 'विश्र्वमैदान २०२६' आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी आ. विक्रम काळे बोलत होते. यावेळी क्रीडा व युवक सेवा विभागाचे उप संचालक महादेव कसगावडे, माजी रणजी क्रिकेटपटू विशाल गिते, आंतर राष्ट्रीय नेमबाज जागृती चंदनकेरे-बोपचंडे, आंतर राष्ट्रीय बेसबॉल खेळाडू ज्योती पवार, माईर एमआयटी शिक्षण संस्था समुहाचे विश्र्वस्त तुळशीराम दा. कराड, कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, संचालक प्रा. तेजस कराड, स्पर्धा संयोजिका डॉ. वर्षा सांगळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना आमदार विक्रम काळे म्हणाले की, पारंपरिकरीत्या क्रीडा हा विषय कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांपुरताच मर्यादित मानला जातो. स्पर्धांचे नियोजनही तेच करतात आणि खेळातही तेच सक्रिय असतात. दुसरीकडे वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे, अशी अपेक्षा पालक आणि समाजाकडून ठेवली जाते. मात्र, वैद्यकीय शाखेतील विद्यार्थ्यांच्या व्यस्त दिनचर्येतूनही त्यांच्या अंगी असलेले क्रीडा कौशल्य पुढे यावे, यासाठी डॉ. हनुमंत कराड यांनी 'विश्र्वमैदान' सारखी आगळीवेगळी स्पर्धा सुरू केली, ही अत्यंत स्वागतार्ह बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

# गोपीनाथ मुंडे यांचा विचार आणि वारसा पुढे घेवून जाणारे आम्ही आहोत : ना. राम शिंदे

## ना. राम शिंदे यांची आ. कराड यांच्या संवाद कार्यालयास सदिच्छा भेट

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ०१ एप्रिल :** महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती ना. राम शिंदे आणि राज्यसभेचे नवनिर्वाचित सदस्य खा. रामराव वडकुते यांनी लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या संवाद संपर्क कार्यालयास सदिच्छा भेट दिली असता त्यांचा आ. कराड यांनी यथोचित सत्कार करून स्वागत केले.

लातूर येथील एका कार्यक्रमासाठी महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती ना. राम शिंदे, राज्यसभेचे नवनिर्वाचित सदस्य खा. रामराव वडकुते आणि माजी आमदार रमेश शेंडगे हे आले असता त्यांनी लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या लातूर येथील अंबाजोगाई रोडवर असलेल्या संवाद या संपर्क कार्यालयास सदिच्छा भेट दिली यावेळी दोन्ही मान्यवरांचा आ. कराड यांनी यथोचित सत्कार करून स्वागत केले. ना. राम शिंदे आणि आ. रमेशअप्पा कराड यांच्यात विविध विषयावर चर्चा झाली.

सत्करप्रसंगी उपस्थितांशी संवाद साधताना ना. राम शिंदे म्हणाले की, रमेशआप्पा आणि मी अनेक वर्षापासून चांगले मित्र आहेत, लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचा विचार आणि वारसा पुढे घेऊन जाणारे आहोत. ज्यावेळी मी विधानसभेत होतो त्यावेळी रमेशआप्पा विधान परिषदेचे सदस्य होते तर आता मी विधानपरिषदेत आहे तर आप्पा विधानसभेत आहेत अवघ्या ६२२ मतांमुळे मी विधानसभेत जाऊ शकलो नाही मात्र येत्या काळात निश्र्चितपणे सुधारणा करू असे त्यांनी बोलून दाखविले.

याप्रसंगी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, जिपचे माजी अध्यक्ष राहूल केंद्रे, लातूर मनपाचे विरोधीपक्ष नेते देविदास काळे, जिप सदस्य महादेव साळुंखे, पद्माकर चिंचोलकर, महेंद्र गोडभरले, पंस उपसभापती शरद दरेकर, अनिल भिसे, दशरथ सरवदे, वैभव सापसोड, उद्धव काळे, सुकेश भंडारे, सतीश आंबेकर, विजय काळे, विष्णू गोरे, वसंत करमुडे, मनोज कराड, राजकिरण साठे, हनुमंत गव्हाणे, सुधाकर काळे, गोपाळ पडिले, आदिनाथ मुळे, विजय चव्हाण, रमाकांत फुलारी, चंद्रकांत कातळे, भागवत गीते, अच्युत कातळे, सुरेखा पुरी, अंजली काळे, हेमांगी येळे, ललिता कांबळे, सिद्धेश्र्वर मामडगे, रवींद्र पाटील, लक्ष्मण गव्हाणे, संजय सावंत, माणिक आलुरे,




संजय विरुळे, राजेंद्र काळे, आत्माराम जाधव, उत्तम चव्हाण, अहमद शेख, देवराव मोहिते, संतोष चव्हाण, लहूराजे सव्वाशे, रमेश खाडप, व्यंकट रसाळ, नारायण राठोड, विठ्ठल कस्पटे, मारुती शिंदे, लक्ष्मण खलंग्रे, विठ्ठल डोंगरे, गणेश डुबते, राम पटणे, नानासाहेब कसपटे यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.